ISBN 978-81-939072-0-7

ॐ

# आध्यात्मज्योती संत बहिणाबाई

डॉ. सौ. वीरा मांडवकर

Reference Book

Published by a Government

Recognized National Level Publisher

under Peer Review System

ResearchGate

See discussions, stats, and author profiles for this publication at: https://www.researchgate.net/publication/337150899

# □□□□□□□□□□□□□□□ □□□ □□□□□□□□ (Spiritual Light Saint Bahinabai)

**Book** · March 2019

CITATIONS
0

READS
971

1 author:



Veera Mandavkar
Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal

**35** PUBLICATIONS **0** CITATIONS

SEE PROFILE

All content following this page was uploaded by Veera Mandavkar on 10 November 2019.

The user has requested enhancement of the downloaded file.

ISBN 978-81-939072-0-7

Published by a Government Recognized National Level Publisher under Peer Review System

# आध्यात्मज्योती संत बहिणाबाई

## डॉ.सौ. वीरा मांडवकर

डॉ. यशवंत मोरेश्वर दोंदे सार्वजनिक शैक्षणिक ट्रस्ट द्वारा संचालित

डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५ ४०१

**भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८ / ९४०३०१४८८५**

E mail : marathipradhyapak@gmail.com

***सहयोगी वितरक***

सेवा प्रकाशन

'पद्मनिलया', ४२, शिवाजी नगर, यवतमाळ ४४५ ००१

सेवा प्रकाशन

विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४ ६०६

**मूल्य एकशे ऐंशी रुपये**

ISBN 978-81-939072-0-7
**ग्रंथप्रकार संदर्भग्रंथ** REFERENCE BOOK
**आध्यात्मज्योती संत बहिणाबाई**
Adhytmajyoti Sant Bahinabai
© **डॉ. सौ. वीरा मांडवकर**
© Dr. Mrs. Veera Mandavkar
**प्रथमावृत्ती** २२ मार्च, २०१९ **(तुकाराम बीज)**
**प्रकाशन क्र.** १७
**प्रती १०००**
**आकार डेमी**
**पृष्ठसंख्या** १२८
**मुखपृष्ठ फोर कलर**
**संगणक / मुखपृष्ठ रचना डॉ. पवन मांडवकर**
**प्रकाशक / मुद्रक / वितरक**
**डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर**
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५ ४०१

पत्रव्यवहार — डॉ. पवन मांडवकर, पद्मनिलया',
४२, शिवाजी नगर, यवतमाळ ४४५ ००१
**भ्रमणध्वनी** ९४२२८६७६५८ / ९४०३०१४८८५
E mail : marathipradhyapak@gmail.com

**(अभ्यासकांना सूचना - या पुस्तकातील मते ही लेखिकेची आणि विविध अभ्यासकांच्या मतांचा परामर्श घेऊन मांडलेली असली तरी नवनवीन संशोधन आणि स्थल, काल तसेच वाचकांच्या दृष्टीने त्यात वेगळेपणा असू शकतो. हीच मते ग्राह्य धरावी, असा आमचा आग्रह नसून संशोधक व अध्ययनकर्त्यांनी निष्कर्ष मांडताना संदर्भ मूलतः तपासून घ्यावेत, ही विनंती.)**

मूल्य १८० रुपये

# आध्यात्मज्योती संत बहिणाबाई

१. प्रस्तावना / ५
२. बहिणाबाईंचे लौकिक चरित्र / ८
३. बहिणाबाईंचे माहेर : देवगाव / ४१
४. बहिणाबाईंचे सासर : शिऊर / ४४
५. संत बहिणाबाईंची गुरुपरंपरा / ४७
 ५.१. गुरुमहिमा / ४७
 ५.२. गुरुपरंपरा / ४९
  ५.२.१. मत्स्येंद्रनाथ (मच्छिंद्रनाथ) / ५०
  ५.२.२. गोरक्षनाथ (गोरखनाथ) / ५१
  ५.२.३. गहिनीनाथ / ५२
  ५.२.४. निवृत्तिनाथ / ५३
  ५.२.५. ज्ञानेश्वर / ५४
  ५.२.६. सच्चिदानंदबाबा / ५५
  ५.२.७. विश्वंभर / ५६
  ५.२.८. राघवचैतन्य / ५७
  ५.२.९. केशवचैतन्य / ५८
  ५.२.१०. बाबाजीचैतन्य / ५९
  ५.२.११. तुकाराम महाराज / ६१
  ५.२.१२. विठोबा उर्फ विठ्ठल / ६३
  ५.२.१३. दीनकवी / ६५
६. बहिणाबाईंच्या व्यक्तित्वाची जडणघडण
आणि त्यांच्या वाङ्मयनिर्मितीवर पडलेला त्याचा प्रभाव / ६८
७. संत बहिणाबाईंचे आध्यात्मिक व तत्वज्ञानपर अभंग / ७८
 ७.१. बहिणाबाईंचे ब्रम्हकर्मपर अभंग / ७९
 ७.२. बहिणाबाईंचे वेदोत्पत्तीपर अभंग / ८१
 ७.३. बहिणाबाईंचे वेदनिष्ठापर अभंग / ८३
 ७.४. बहिणाबाईंचे वेदमहात्म्यपर अभंग / ८५
 ७.५. वेदांचा मथितार्थ सांगणारे बहिणाबाईंचे अभंग / ८६
 ७.६. योगसाधनांचा पुरस्कार करणारे अभंग / ८७

७.७. बहिणाबाईंचे कर्ममहात्म्यपर अभंग / ८९
७.८. बहिणाबाईंचे वेदान्तपर अभंग / ९२
७.८.१. मायाब्रम्हनिरूपण / ९२
७.८.२. मायेची आवरणशक्ती / ९४
७.८.३. मायेची विक्षेपशक्ती / ९५
७.९. ईश्वर, जग व जीव यांच्यातील संबंध दर्शविणारे अभंग /९८
७.९.१. सगुण ब्रम्ह / ९८
७.९.२. सगुणनिर्गुण एकच / ९९
१. कर्ममार्ग / १०१
२. ज्ञानमार्ग / १०३
o सिद्धावस्थापर अभंग / ११०
o 'वज्रसूचि-उपनिषद' यावरील भाष्यपर अभंग / १११
o जीवन्मुक्तावस्थापर अभंग / ११३
३. भक्तिमार्ग / ११४
o देवाशी भांडणपर अभंग / ११८
८. बहिणाबाईंच्या आध्यात्मिक व तत्त्वज्ञानपर अभंगांतून आढळणारी वैशिष्ट्ये / १२२

संदर्भ/ १२५

# आध्यात्मज्योती संत बहिणाबाई

## १. प्रस्तावना :

'संतकृपा जाली । ईमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।।३।।
जनार्दन येकनाथ । खांब दिल्हा भागवत ।।४।।
तुका जालासे कळस । भजन करा सावकास ।।५।।
बहेणि फडकती ध्वजा । निरोपण केले वोजा ।।६।।'
('संत बहेणाबाईंचा गाथा' अभंग क्र. १४३)

या ओळींतून संतपरंपरेचा लेखाजोखा ज्यांनी मराठी सारस्वतात अजरामर केला, त्या संत बहिणाबाई. वारकरी संप्रदायाचा इतिहास मोजक्या शब्दांतून आपल्यापुढे मांडणाऱ्या संत बहिणाबाई. संत तुकारामांच्या एकमेव स्त्रीशिष्या संत बहिणाबाई. प्रपंचात राहूनही परमार्थ साधण्याची त्यांची कला. ओज, माधुर्य, विचारसौंदर्य, वाक्चातुर्य अशा अनेक गुणांनी परिपूर्ण असे त्यांचे वाङ्मय. तरीही हे वाङ्मय संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकारामांच्या साहित्याप्रमाणे जगाच्या कानाकोपऱ्यात पोचू शकले नाही.

बहिणाबाईंचे अभंग म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसा. वयाच्या तिसऱ्या वर्षी बिजवराशी झालेला विवाह, त्याच्यासोबतच परागंदा होऊन करावी लागलेली भटकंती, तामसी नवऱ्याने केलेला छळ अशा संकटांमुळे गाईवासरांत रमून जात, जीवनाची दिशा शोधत निघालेल्या बहिणाबाईंना आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखविला, तो जयरामस्वामींनी. स्वप्नामध्ये संत तुकारामांचा अनुग्रह प्राप्त झाला आणि त्यांचे जीवन पूर्णतः बदलून गेले. त्यांचे संघर्षमय जीवन त्यांच्या अभंगांतून आर्ततेने उतरले. जीवनातील स्थित्यंतराचा भावनोत्कट शब्दबद्ध आविष्कार म्हणजे त्यांचे अभंग.

संतचळवळीचा लेखाजोखा पडताळताना लक्षात येते की 'यादवकाळात विदग्ध प्रबंधकाव्यनिर्मितीची बरोबरी करू शकेल, अशी गुणदृष्ट्या समृद्ध भावकविता अभंगरूपाने साक्षात झाली आणि तिने आत्माविष्काराचे स्वातंत्र्य, व्यक्तिविकासाचे स्वातंत्र्य आणि विचारदर्शनाचे

स्वातंत्र्य यांची मुहूर्तमेढ रोवली.'[१] या भावकवितेच्या निर्मितीमध्ये स्त्रीसंतही मागे नव्हत्या. त्यात केवळ परमार्थमार्गावर चालणाऱ्या संत स्त्रियाच होत्या, असे नाही. संसारी स्त्रियाही या काव्यनिर्मितीत सहभागी झाल्या होत्या; पण प्राचीन मराठी संतकवयित्रींमध्ये खऱ्या अर्थाने संसार केला तो बहिणाबाईंनी. महदंबा लहान वयात वैधव्य आल्याने चक्रधरांच्या सान्निध्यात आली. मुक्ताबाईंना संसार करण्याची संधीच मिळाली नाही. जनाबाई नामदेवांच्या घरी वाढली. प्रापंचिक जबाबदारी या अर्थाने तो संसार नव्हताच. नामदेवांच्या घरी एक दासी म्हणूनच ती राहिली. झाडणे, पुसणे, दळणकांडण अशी दैनंदिन कामे तिने केली, एवढाच तो संसार. कान्होपात्रा एक गणिका होती. त्यामुळे तिच्या संदर्भात संसार संभवतच नाही. प्रपंच आणि परमार्थ हे दोन्ही साधले बहिणाबाईंनी. त्यासाठी त्यांना फार संघर्ष करावा लागला. प्रपंच-परमार्थ समान चालवून त्यांनी आपली उन्नती साधली. भागवत धर्माची 'फडकती ध्वजा' होण्याची प्रतिष्ठा त्यांना लाभली.

त्या काळात परमार्थ साधणे तसे फार खडतर होते. ब्राम्हणकुळी जन्माला आलेल्या बहिणाबाईंनी आपला आत्मविकास साधला, तो तुकोबांसारख्या शूद्र कुळीच्या संताला गुरुपद देऊन. या कारणासाठी त्यांना असंख्य यातना सहन कराव्या लागल्या. हा सारा इतिहास त्यांनी आपल्या अभंगांत नोंदवून ठेवलेला आहे. बहिणाबाईंचे चरित्र म्हणजे एक अद्भुत गाथा आहे. चमत्कृती वाटावे, असे अनेक प्रसंग त्यांच्या जीवनात आले. त्या आपले तेरा जन्म सांगतात. आपल्याला संत तुकारामांनी स्वप्नदृष्टांत देऊन गुरुपदेश दिला, असेही त्या सांगतात.

बहिणाबाईंच्या आत्मकथेत त्यांनी आपले जीवनचरित्र सरळ, निर्मळ मनाने सांगितले आहे. तेथे जशी आत्मनिंदा नाही, तसा स्वतःचा अतिरिक्त गौरवही नाही. 'सर्वसामान्य माणसाने लिहिलेल्या आत्मकथेला वा आत्मचरित्राला थोडाबहुत का होईना 'स्व'चा गंध आल्यावाचून राहत नाही. स्वतःचे व्यक्तित्व उन्नत करण्याची एक सुप्त भावनाही कोठेतरी असतेच; परंतु बहिणाबाईंची आत्मकथा वाचताना त्याचा लवलेशही दिसत नाही. आजच्या साहित्याच्या दृष्टीने वस्तुनिष्ठ निवेदन हा आत्मचरित्राचा महत्त्वाचा भाग समजला जातो. त्या दृष्टीने ही आत्मकथा खरोखरच अपूर्व म्हणावी लागेल. येथे स्वतःच्या भक्तिभावाचा डोलारा नाही, की स्वतःला भोगाव्या लागणाऱ्या संघर्षमय सांसारिक जीवनाविषयी हळवा सूर नाही. अत्यंत

संयमाने बहिणाबाईंनी हे निवेदन केले आहे. मराठीमध्ये बहिणाबाईपूर्वी कोण्याही स्त्रीने आपली आत्मकथा इतक्या साद्यंतपद्धतीने लिहिलेली नाही.'[२]

लहान वयात बिजवराशी विवाह, संसारासाठी गावोगाव वणवण हे सोसून त्यांनी गाठलेली आध्यात्मिक उंची थक्क करणारी आहे. आत्मसाक्षात्कारानंतर त्यांनी रचलेली अभंगसंपदा पाहून एक साक्षात्कारी व्यक्ती म्हणून त्यांचे मोठेपण मनात कायमचे ठसते. 'एकही इयत्ता न शिकलेल्या बहिणाबाईंनी साडेतीनशे वर्षांपूर्वी साडेसातशे अभंग रचले. काव्यातून आपले आत्मचरित्र प्रकट केले. वैयक्तिक जीवनावर आजही कोणी प्रामाणिकपणे लिहिण्याचे धारिष्ट्य करीत नाही; मात्र बहिणाबाईंनी त्या काळात आपल्या जीवनचरित्रात त्यांना आलेले सर्व चांगले वाईट अनुभव काव्यगाथेमधून लिहून ठेवले.'[३] हे सर्व अनुभव त्यांच्या 'लौकिक चरित्र' ह्या मुद्यात वर्णन केले आहेत.

येथे चिमुकल्या 'बहिणा'पासून 'संत बहिणाबाई'पर्यंतचा प्रवास आणि त्यांच्या उर्वरित आध्यात्मिक पातळीवरील जीवनाचा परामर्श 'बहिणाबाईंचे लौकिक चरित्र' या शीर्षकाखाली अभ्यासिलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांची गुरुपरंपरा, त्यांच्या व्यक्तित्वाची जडणघडण आणि त्यांच्या वाङ्मयनिर्मितीवर पडलेला त्याचा प्रभाव या मुद्यांचीही सांगोपांग चर्चा येथे केलेली आहे.

# २. बहिणाबाईंचे लौकिक चरित्र :

'रामदासांनंतर समर्थ संप्रदाय जसा अगदी निष्प्रभ झाला, तसे काही लगेच तुकारामांच्या पश्चात वारकरी संप्रदायाचे झाले नाही. तुकाराम भागवत धर्ममंदिराचे कळस झाले, तर त्यांची शिष्या बहिणाबाई त्या कळसावर ध्वजेप्रमाणे फडकली.'[४] भागवत धर्ममंदिराच्या कळसावरील ध्वजेपर्यंतचा बहिणाबाईंचा प्रवास अत्यंत खडतर होता. हा प्रवास जगापुढे आणण्यासाठी त्यांच्या विविध रचनांनाच पुरावे म्हणून उपयोग करावा लागतो. अत्यंत भावपूर्ण रचना आणि प्रामाणिक कथन हे त्यांच्या अभंगांचे वैशिष्ट्य डोळ्यांपुढे ठेऊन त्यांचे लौकिक चरित्र त्यांच्या अभंगांच्या आधारे मांडावे लागते.

जुन्या संत कवी-कवयित्रींनी उपदेशात्मक ओव्यांसोबतच स्वचरित्रवर्णन करणाऱ्या ओव्याही लिहिल्या आहेत. अशा काही मोजक्याच संत कवी-कवयित्रींपैकी बहिणाबाई ह्या एक होत. शके १५५० म्हणजेच इ.स. १६२८ साली संत बहिणाबाई यांचा जन्म झाला. वाजसनेयी शाखेचे यजुर्वेदी देशस्थ ब्राम्हण असलेल्या माता जानकी व पिता आऊजी कुलकर्णी यांच्या घरी हे कन्यारत्न जन्माला आले. एका सर्वसामान्य घरात जन्माला आलेली ही मुलगी पुढील आयुष्यात आपल्या अलौकिक गुणांनी संतसज्जनांच्या पंक्तीत बसणार हे कदाचित पूर्वसंचितच होते. औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील देवगाव (रंगारी) येथे 'लेखक' म्हणजेच 'ग्रामलेखक कुलकर्णी' असलेले आऊजी अपत्यप्राप्तीसाठी तळमळत होते. त्यासाठीच त्यांनी लक्षतीर्थावर नित्य स्नान करून शिवाचे अनुष्ठान करण्याचा क्रम सुरू केला. साधन लक्षतीर्थच ते. अगस्त्य मुनींनी हिमालयातून दक्षिणेत आल्यावर देवगावी चातुर्मासात मुक्काम केला होता. गावाच्या पश्चिम दिशेला वाहणारी शिवनद म्हणजे मोठे तीर्थ. या पवित्र स्थळाला अगस्ती मुनींनी 'लक्षतीर्थे वास करतील व तेथे स्नान, दान, जप व अनुष्ठान करणाऱ्यास सिद्धी प्राप्त होईल' असा वर दिलेला आहे, अशी कथा प्रचलित आहे. त्याचाच प्रत्यय येऊन आऊजीचे अनुष्ठान फळास आले. स्वप्नात एका पवित्र ब्राम्हणाने दर्शन दिले. एक कन्या, दोन पुत्र यांचा लाभ होईल, ही सुवार्ताही सांगितली. त्यानंतर एकाच वर्षाने बहिणाबाईंचा जन्म झाला.

'अगस्ती राहोनी देवगावी जाण । शिवनदीस्नान करी सदा ।।

बहेणि म्हणे ऐसे स्थळ देवग्राम । तेथे माझा जन्म जाला असे ।।'

(अभंग क्र. २, ओ. ९, १०)

अनेक वर्षांनी लाभलेल्या या अपत्यामुळे आऊजी आणि जानकी यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. संसारवेलीवर उमललेले हे पहिलेवहिले फूल. आऊजींनी तिच्या बारशाचा मोठा समारंभ केला. ब्राम्हण जेऊ घातले. कौतुकाने मुलीचे नाव 'बहिणा' ठेवले. ह्या आनंदाला द्विगुणित करणारी एक घटना घडली, ती म्हणजे आऊजी वेरूळच्या वाटेने जात असताना त्यांना एक सोन्याची मोहोर सापडली. मुलीच्या पायगुणाने हा धनलाभ झाला, याची त्या उभयतांना खात्री पटली.

'मोहर बांधली पितांबरी-गाठी । सापडली वाटी वेरुळाच्या ।।
घरा येऊनीया आनंदे बोलती । कन्या आम्हाप्रती लाभाईत ।।'

(अभंग क्र. ४, ओ. ३, ४)

पुढे वीरेश्वर नामक ब्राम्हणाने बहिणेची कुंडली मांडली असता त्यात ही कन्या मातापित्याला कल्याणकारकच असल्याचे सांगितले. बहिणेचा देवभक्तीकडे असलेला कल वर्तविल्या गेला. दीर्घायुष्य असल्याचे सांगितले गेले. अशातऱ्हेने बहिणेने जन्माला आल्यापासूनच इतरांना आनंद देण्याचे कार्य सुरू केले होते. वीरेश्वर ब्राम्हणाला त्याच्या योग्य भविष्यकथनाचा उचित मोबदला मिळाला. त्याला वस्त्र व गाय दान देऊन त्याचा सन्मान केला गेला.

लहानगी बहिणा मातापित्यांच्या छत्रछायेत व लाडाकौतुकात वाढू लागली. कितीही लाडकी मुलगी असली तरी योग्य वेळी तिचे कन्यादान करणे व तिला पतिगृही पाठवणे हे प्रत्येक आईवडिलांचे आवडते कर्तव्य असते. आज एकविसाव्या शतकात मुलगी अठरा वर्षांची झाल्यावर पालकांना तिच्या विवाहाची समस्या भेडसावते. पण सोळावे शतक म्हणजे बालविवाहाचे प्रस्थ असलेला काळ. त्यानुसार बहिणीला तिसरे वर्ष लागले आणि आऊजी व जानकी मुलीसाठी वरसंशोधन करू लागले. बहिणाबाईंसाठी फारसे प्रयत्न करावे लागले नाहीत. आऊजींच्या घरी त्यांचा एक नातेवाईक सखा आला. विवाहेच्छू होता. लहानग्या बहिणाला पाहून त्याने तिच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. कन्यादानाच्या पुण्याची घाई झालेल्या त्या दाम्पत्याने तात्काळ होकार दिला. बालपणीच लग्न होणाऱ्या त्या काळात ही गोष्ट विचित्र वाटत नाही; पण हा जोडा कसा होता, हे पाहिल्यास त्यातील विसंगती

जाणवल्याशिवाय राहणार नाही. बहिणाला नुकतेच तिसरे वर्ष लागलेले आणि तिचा पती हा तीस वर्षांचा बिजवर. अशी ही विचित्र जोडी. पण त्या काळात कुणालाही काहीही वावगे वाटले नाही. उलट रीतसर विवाह होऊन सर्व गावास आमंत्रित करून थोरामोठ्यांच्या आशीर्वादाने हा विवाहसोहळा संपन्न झाला. बहिणा त्यावेळी अजाण होती. लग्नाविषयी विचार करण्याचे तिचे वय नव्हते. पुढे मोठी झाल्यावरही तिची याविषयी तक्रार दिसत नाही. सत्तावीस वर्षे वयाने मोठा भ्रतारही तिला भाग्याचाच वाटतो. म्हणूनच जाणत्या वयात लिहिलेल्या चरित्रात्मक अभंगातही ती त्याविषयी तक्रार करीत नाही, तर नवऱ्याविषयी म्हणते,

'द्वितीय समंधी वरुषा तिसाचा । नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ।।
बहेणि म्हणे त्यासी कन्यादान केले । आंदन दिधले सर्व काही ।।'
(अभंग क्र. ६, ओ. ३, ४)

बहिणाच्या भ्रताराचे नाव रत्नाकर उर्फ गंगाधर होते. आऊजी हे मौनस गोत्राचे तर रत्नाकर गौतम गोत्रातील होते. रत्नाकर पाठक हे शाक्तपंथी होते. बहिणाच्या लग्नानंतर आऊजींनी पुन्हा शिवअनुष्ठान केले असता त्यांना मुलगा झाला. बहिणाच्या पायगुणानेच हा मुलगा झाला, या भावनेने ती आईवडिलांची अधिक आवडती झाली. बहिणाच्या लग्नानंतर चार वर्षानंतरसुद्धा लग्नासाठी घेतलेले कर्ज आऊजी फेडू शकले नाही, त्यावरून त्यांचे गोत्रजांशी वैमनस्य उत्पन्न झाले. गोत्रज ऋणाच्या बदल्यात शेतमळा लिहून मागू लागले. संकटात सापडलेल्या आऊजींनी जावयाला मदतीचे आवाहन करणारे पत्र पाठवले. त्यात 'आता तूच आमचा सखा, तूच आमचा सोयरा, तूच आमचा जावई व तूच आमचा मित्र आहेस. आमचा अंत बघू नकोस. आम्हाला ह्या भाऊबंदकीच्या बंदिवासापासून मुक्त कर'[५] असे लिहिले होते.

यावरून सासरे व जावई यांच्यातील संबंध चांगले असावेत, असे दिसते. सासऱ्यांचा निरोप मिळताच जावईबुवा त्यांच्या मदतीसाठी धावून आले. दोघांनी मिळून विचारविनिमय केल्यावर त्यांना सुटकेचा कोणताच मार्ग दिसला नाही. शेवटी त्यांनी पलायन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ऐन मध्यरात्री सर्व मंडळी देवगाव येथील घर सोडून गोदातीरी आले. प्रवरासंगमी गोदावरीत स्नान करून सिद्धनाथांचे दर्शन त्यांनी घेतले. कुठे जायचे, काय करायचे, हे काहीही ठरवले नव्हते. सगळे केवळ

पायीपायी वाट फुटेल तिकडे निघाले होते. गोदातीरी आल्यावर मात्र तेथील वातावरण पाहून बहिणा फारच प्रभावीत झाली. कायम तेथेच वास्तव्य करावे, अशी ऊर्मी तिच्या मनात दाटून आली; परंतु पतीदेवांचा तेथे राहण्याचा मानस नसल्यामुळे त्यांच्यासोबत बहिणेलाही आवडलेले स्थळ सोडून पुढे जावे लागले.

स्वग्रामाचा त्याग केलेला, उदरनिर्वाहाची सोय नाही, कुठे जावयाचे याचा पत्ता नाही, अशा स्थितीत भिक्षा मागत मागत ही मंडळी पुढेपुढे चालली होती. नानाप्रकारच्या संकटांना तोंड देत कष्टांचा सामना करीत, प्रसंगी उपाशीतापाशी अशी मजल दरमजल करीत ते महादेववन येथे आले. महादेववन पाहून नीरानरसिंहपूरला नरसिंहदर्शन घेतले. तेथून पुढे भीमातीरी पंढरपुरात येऊन पोचले. मुळातच ईश्वरभक्तीकडे ओढा असलेल्या बहिणेला अर्थातच ते स्थळ अतिशय प्रसन्न वाटले. प्रत्यक्ष पांडुरंगाची मूर्ती पाहिल्यावर त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. 'वाटले मनास महासौख्य । पांडुरंग-मूर्ति देखोनी पवित्र । संतोषले नेत्र इंद्रियेसी ।' अशा सौख्यदायक स्थळी वास करावा, असे बहिणेला वाटले.

'जीव जावो परी पंढरीचे स्थळ । न संडावे जळ ऐसे वाटे ।।
बहेणि म्हणे पंचरात्री पंढरीस । केला आम्ही वास पुण्ययोगे ।।'
(अभंग क्र. ९, ओ. ११, १२)

याप्रमाणे तेथे पाच दिवस राहून तेथील नामसंकीर्तनाचा आस्वाद घेतला. चैत्रपोर्णिमेस शंभूमहादेवाची यात्रा पाहिली. शंकराचे ध्यान पाहून बहिणाबाई संतोषल्या. आपल्या जीवनातील अडचणी, संकटे दूर करण्यासाठी त्यांनी शंकरास आळविले. तेथेही पाच दिवस मुक्काम केला. पुढे ते शनिशिंगणापुरास आले. यावेळी बहिणाबाई नऊ वर्षांच्या होत्या. तेथे वास्तव्य करण्याचा रत्नाकर पाठक व मंडळींचा विचार होता; परंतु त्या भागात ब्राम्हणवस्ती विशेष नसल्यामुळे ते ठिकाण आपल्याला राहण्यास योग्य नाही, असा विचार त्यांनी केला. राहण्यास योग्य ठिकाण म्हणून त्यांनी रहिमतपूर या गावाची निवड केली; कारण तेथे ब्राम्हणांचा मोठा समुदाय होता. रहिमतपूर येथे भिक्षा मागून उदरनिर्वाह चालू असताना तेथील ग्रामोपाध्यांचा काशीस जाण्याचा विचार झाला. आपल्या माघारी आपली जबाबदारी कोणावर सोपवावी, याचा ते विचारच करीत होते. बहिणाबाईंचे पती अत्यंत कर्मठ वृत्तीचे होते. देवाची त्यांच्यावर कृपाही होती. आपल्या अनुपस्थितीत आपली वृत्ती चालविण्याची जबाबदारी ही व्यक्ती नक्कीच पार पाडू शकेल, हा विश्वास

ग्रामोपाध्याय यांना वाटला; म्हणूनच सर्व गोष्टी रत्नाकर पाठकांच्या हवाली करून ग्रामोपाध्याय काशीस निघून गेले. योगायोगाने या उपाध्यायांचे नाव रत्नाकर ज्योतिषी होते.

अशाप्रकारे रहिमतपूरला बहिणा व त्यांच्या कुटुंबीयांनी एक वर्ष वास्तव्य केले. त्यानंतर उपाध्यायबुवा काशीहून परत आले. पुढे बहिणा अकरा वर्षांची झाली. बालपणापासूनच अध्यात्म, सत्संग यांचा प्रभाव असलेली बहिणा अकरावे वर्ष लागल्यानंतर संतसहवासासाठी अधिकच अधीर बनली. आपली अवस्था पतीच्या कानी घातल्यानंतर ते सर्वजण अतिपवित्रक्षेत्र कोल्हापूर येथे आले. तेथे बहिरंभट नामक यजुर्वेदी व्युत्पन्न ब्राम्हण राहत असे. त्याने दोन शास्त्रांचे अध्ययन केले होते. त्यांच्या घरी अग्निहोत्र असून पुष्कळ विद्यार्थी पठणास येत असत. अशा व्युत्पन्न ब्राम्हणाच्या घरी बहिणा व तिचे कुटुंबीय बिऱ्हाड करून राहू लागले. (या बहिरंभटांचा बहिणाबाईंनी अभंगात ‘हिरंभट’ असा उल्लेख केलेला आहे.) बहिरंभटाच्या घरी जे विद्यार्थी येत, त्यांना शिकवताना बहिणेच्याही कानी वेदपाठ पडू लागले. बहिणेला खऱ्या अर्थाने तेथे येण्याचे सार्थक वाटले. तिच्या धार्मिक मनाला अजून काय हवे होते? ‘सदा निजध्यास आत्मचर्चा’ अशी आत्मविद्येची चर्चा ऐकण्यात तिचा वेळ जाऊ लागला. तशातच कोल्हापुरात जयरामस्वामी नामक गोसावी नित्य हरिकथा ऐकवीत असत. भागवताचे पारायणही करीत असत. बहिणेच्या तृषार्त मनाला ही मोठी मेजवानीच होती. ती नित्य हरिकथाश्रवणास जाऊ लागली.

बहिणाबाईंच्या जीवनातील मागील काही प्रसंग पाहता लक्षात येते की, पंढरीस विठ्ठलदर्शनाने बहिणेचा सुप्त भक्तीचा भाव जागृत झाला. कोल्हापुरातील वातावरणात त्याला खतपाणी मिळाले. त्याला ज्ञानाची दिशा मिळाली. या मंगलमय वातावरणात त्यांचा एकूणच भक्तिमार्गाकडील ओढा अधिकच वाढला.

बहिणाबाई अठरा वर्षांच्या झाल्या आणि त्यांच्या आयुष्यात एक अत्यंत आनंददायक अशी घटना घडली. बहिरंभटांनी कसलेसे व्रत केल्यामुळे त्यांच्या यजमानाने त्यांना एक सवत्स कपिला गाय दान केली. जिला पाहिल्याबरोबर मनाला आनंद मिळेल अशा त्या गाईचे वर्णन करताना बहिणाबाई म्हणतात,

‘काळी ते कपिला काळे तिचे वस्त्र (वच्छ) । प्रदक्षणे पुच्छ निवेदिली ।

सुवर्णाची शृंगे रुपियाचे खूर । वर पीतांबर पांघुरिला ।
सर्व उपचार गोदान दिधले । पहावया आले सर्व जन ।।'

(अभंग क्र. १४, ओ. ३, ४, ५)

बहिरंभटाला गाय मिळाली, त्याच्या अकराव्या दिवशी त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात एक ब्राम्हण आला. त्याने बहिरंभटास सांगितले, 'तुझ्या ओसरीत जो ब्राम्हण राहतो आहे, त्याला ही गाय सवत्स दान कर.' बहिरंभटाने या स्वप्नावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे रत्नाकर पाठकास गाईचे दान केले. बहिणाचा आनंद गगनात मावेनासा झाला. बहिणाला आता दुसरे काही सुचेना. या गायवासरांची सेवा करण्यात बहिणा गढून गेली. साहजिकच या मुक्या प्राण्यांनाही तिचा लळा लागला. सर्व कुटुंबीयांच्या हातून गोसेवा घडू लागली. बहिणीचे आईबाबा गाईसाठी चारा आणावयास जात. बहिणा त्यांना प्रेमाने खाऊ घालत असे. न्हाऊमाखू घालत असे. काळजीपूर्वक त्यांची शुश्रूषा करीत असे. वासरालातर बहिणीचा इतका लळा लागला होता, की ते गाईजवळ न राहता बहिणीच्याच जवळ जाई. बहिणा दोहायला आली, तरी तिला विरोध करीत नसे. बहिणीच्याच हाताने गवत खाणे, तिच्याच हाताने पाणी पिणे अशा सवयी वासराला लागलेल्या होत्या. रात्री झोपताना बहिणा त्याला जवळ हवी असे. बहिणा दूर गेली की ते दुःखाने ओरडू लागे. अशाप्रकारचे जगावेगळे प्रेम त्या बहिणीला - वासरात निर्माण झाले होते. त्यांच्यात फक्त प्रेमच नाही, तर बहिणीचे गुणही वासरात दिसू लागले होते. बहिणीची आध्यात्मिक आवड वासरात प्रतिबिंबित होऊ लागली. बहिणा जेव्हा कथाकीर्तने ऐकायला जाई, तेव्हा वासरूही तिच्यासवे येऊन कथाकीर्तनाचा आस्वाद घेत असे. इतकेच नव्हे, तर पुराण ऐकताना तिच्यासोबत तोही हुंकार देई.

'रात्रीच्या अवसरी वत्स निजे सेजे । पुराणी ते फुंजे श्रवणकाळी ।
कथेपासी जाय सवे तेहि येत । उभेची निवांत कथा ऐके ।।'

(अभंग क्र. १४, ओ. १९, २०)

परस्परांतील हे अलौकिक प्रेम पाहून लोकांमध्ये कुजबूज सुरू झाली. बहिणा व तिचे वासरू कौतुकाचा व चेष्टेचा विषय होऊन बसले. कोणी त्याला योगभ्रष्ट वत्स म्हणीत असे. बहिणीसोबत राहून हा योगभ्रष्ट योगी पुन्हा पुण्य गोळा करतो आहे, असे लोकांस वाटे; तर कोणी त्याला मागच्या जन्मीचा ऋणाईत म्हणत असत, जो या जन्मी बहिणीचे ऋण फेडतो

आहे. अशाप्रकारे लोकांच्या बोलण्याचे भान नसलेली बहिणा वासराच्या वात्सल्याने भारलेली होती. वासरू थोडेजरी नजरेआड झाले, तरी पाण्याविना मासोळीसारखी तडफडत होती. दळणकांडण करतानाही बहिणीला वत्स जवळ हवा असे.

या सर्व गोष्टींचा रत्नाकर पाठकाला त्रास होऊ लागला. आपली पत्नी या गाईच्या व वासराच्या सेवेत दिवसरात्र असते, ही असूया त्याच्या मनात निर्माण झाली होती. पुढे वासराचे लडिवाळ वागणे पाहून त्याच्याही मनाला पाझर फुटला. त्याला वासराबद्दल माया वाटू लागली. बहिणीचे वासरावरील प्रेम त्याला खुपेनासे झाले.

'म्हणे असो तुज नाही मूलबाळ । हाचि तुझा खेळ जाण मनी ।
तुजही आवडी कथा-पुराणाची । संगती फुकाची तुज जाली ।।'
(अभंग क्र. १४, ओ. २९, ३०)

बहिणीच्या जीवनातील हे गायवासराचे आगमन आणि त्यांचा तिच्या जीवनावर पडलेला प्रभाव ही एक चमत्कारिक गोष्ट आहे. एका मुक्या प्राण्याचे बहिणाबाईंच्या अध्यात्मओढीत बरोबरीने सहभागी होणे, हे अविश्वसनीय असले, तरी बहुतेक संतांप्रमाणे बहिणाबाईंच्याही आयुष्यात असे काही चमत्कार घडलेले दिसतात. अनेक प्रसंगांत या गायवासरांनी आपले असामान्यत्व दाखवून दिले आहे. उदा. जयरामस्वामी वडगावकर बहिणीच्या गावी घरोघरी जाऊन कथाकीर्तने करीत. गावकरी ते नित्यनेमाने ऐकायला जात असत. बहिणाही आईबाबांसमवेत कीर्तने ऐकायला जाऊ लागली, तेव्हा वासरूही तिच्या पाठोपाठ जात असे. आई व बहिणा जेथे बसत, तेथे वासरूही येऊन उभे राहू लागले. इतकेच नव्हे तर कीर्तनाच्या ठिकाणी त्या वासराने कधी नैसर्गिक विधीचेही भान सोडले नाही.

'हागेना ते मुते उभेचि श्रवणे । आइके कीर्तन नामघोष ।
आरती जालिया नमस्कार होती । आपणही क्षिती ठेवी डोके ।
देखोनीया जन हासती सकळ । परि ते प्रेमळ आल्हादची ।
म्हणती योगभ्रष्ट पूर्वील हरिभक्त । गोवेषे विरक्त पहा कैसे ।।'
(अभंग क्र. १४, ओ. ३६ ते ३९)

एके दिवशी मोरोपंत नामक गृहस्थांकडे जयरामस्वामींचे कीर्तन होते. तो एकादशीचा पवित्र दिवस होता. नेहमीप्रमाणे दोन प्रहरी कीर्तन सुरू झाले. बहिणाही आईबाबांसोबत कीर्तनास आली होती. सोबत

वासरूही होते. जयरामगोसावी शिष्यगणांसह हरिगुण गाण्यात तल्लीन झाले. टाळ, मृदंगादी वाद्यांचा घोष चालला होता. जयरामस्वामींच्या कीर्तनाला अलोट गर्दी जमली होती. या गर्दीत माणसांनाच जागा नाही, तर जनावरांची अडचण कशाला, असे म्हणून लोकांनी बहिणाबाईंच्या बाजूला उभ्या असलेल्या वासराला बाहेर काढले. वासराला दूर नेलेले पाहून बहिणा कावरीबावरी होऊन रडू लागली. तिकडे वासरूही रडूओरडू लागले. हा गोंधळ पाहून जयरामस्वामी कीर्तन करावयाचे थांबले. काय प्रकार आहे, याची त्यांनी चौकशी केली; तेव्हा लोकांनी त्यांना खरी हकिकत सांगितली. जयरामस्वामींना अतिशय आश्चर्य वाटले. विश्व ब्रम्हमय जाणणाऱ्या जयरामस्वामींना वासराचे असामान्यत्व तात्काळ लक्षात आले.

'साक्ष अंतरीचा तो स्वामी जयराम । वत्स-आंतर्याम वोळखिले ।
म्हणे आणा त्यासी वत्साचे आंतरी । काय नाही हरी आत्मवेत्ता ।।
कथेलागी होतो जीव कासावीस । पशू की तयास म्हणो नये ।।'
(अभंग क्र १४, ओ. ५३ ते ५५)

असे म्हणून जयरामस्वामींनी त्या वासरास आत आणावयास सांगितले.

जयरामस्वामींनी पुढे कथा सुरू केली. सर्वांसोबत वासरूही तल्लीनतेने ऐकू लागले. कथा संपल्यावर स्वामींनी बहिणीला आणि वासराला जवळ बोलाविले. एकमेकांवर मायेचा वर्षाव करणाऱ्या या जोडीकडे त्यांनी प्रेमार्द्र नजरेने पाहिले. कृपादृष्टीने डोक्यावर थोपटले. बहिणेला हा स्वतःचा मोठा सन्मानच वाटला. तिने आदराने स्वामींच्या चरणावर मस्तक ठेवले. तिला पाहून वासरानेही स्वामींसमोर लोटांगण घातले. स्वामींनी त्याच्याही मस्तकावरून हात फिरवला आणि आशीर्वाद दिला. ही मुलगी आणि हे वासरू दोघेही पुण्यशील आहेत, असे जयरामस्वामींना वाटले. तिच्या लहान वयात श्रवणाची असलेली आवड याचे त्यांनी कौतुक केले. आप्तांची चौकशी केली. एका साधारण मुलीचे स्वामींकडून अशाप्रकारे होणारे कौतुक कथेला आलेल्या बऱ्याच लोकांना रुचले नाही. या निष्पाप मायेत वाईट अर्थ शोधणारेही त्यात बरेचजण होते. जगाच्या या अनिष्ट प्रवृत्तीपासून दूर, मनात कुठलेही कपट नसलेले जयरामस्वामी व बहिणाबाई यापासून अनभिज्ञ होते.

दोन प्रहरी सुरू झालेली कथा संपवून घरी परत यायला बहिणा व तिच्या मातापित्यांना मध्यरात्र उलटली. आल्यावर वत्सास दूध

पाजून बहिणा कामाला लागली. सडासंमार्जन करू लागली. तिच्या भ्रतारानेही स्नान केले. स्नानावरून आल्यावर नीराबाई नामक एक हलक्या कानाची चुगलखोर स्त्री तेथे आली. तिने कथेतील वृत्तांत रत्नाकर पाठकास अतिशय वेगळ्या स्वरूपात रंगवून सांगितला. त्यात वासराचे बाहेर काढले जाणे, बहिणीचे रुदन, जयरामस्वामींनी मस्तकावर हात ठेवून दिलेला आशीर्वाद या गोष्टींचा समावेश होता; पण मनातल्या किल्मिषाने या साध्या गोष्टीचा वाईट अर्थ रत्नाकर पाठकाच्या मनात भरविला गेला. नीराबाईच्या तोंडून ही हकिकत ऐकताच रत्नाकर पाठकाचा क्रोध अनावर झाला. 'जातीचा भिक्षुक आला बहुत राग । धावला सवेग गृहाप्रती ।।' बहिणीच्या तापट नवऱ्याच्या डोक्यात रागाने घर केले होते. त्याभरात त्याने बहिणीला मारायला सुरुवात केली. हे पाहून गोठ्यातली गाय रडू लागली. वासरूही कासावीस होऊन ओरडू लागले. बहिणीचे आईवडील, बंधू हताश होऊन पाहत होते. जमदग्नीचा अवतार धारण केलेल्या रत्नाकर पाठकाच्या मारण्यात खंड पडला नाही. शेवटी धीर करून आईने विचारले, 'हिने काय अपराध केला आहे?' यावर उत्तर देण्याऐवजी त्यांच्या क्रोधाग्नीत भरच पडली; व तो अधिक आवेशाने बहिणीस बडवू लागला. शेवटी मारून थकल्यावर त्याने बहिणीची हातपाय बांधून मोट वळली व गायवासरांजवळ ठेवून दिली.

बहिणीला स्वतःचा अपराध काय आहे, तेच कळेना. तरीही पतीच्या हातचा मार मुकाटपणे खाऊन ती शेवटी देवाला आळवू लागली. 'पतीच्या हातून देहान्त होण्याची वेळ आली तरी तू शांत बसला आहेस?' असे ती गाऱ्हाणे गाऊ लागली.

बहिणीच्या भ्रताराचा हा क्रूरपणा पाहून बहिरंभट इतके संतापले, की बहिणीच्या कुटुंबातील लोकांना 'माझ्या घरातून चालते व्हा. हा चांडाळ आपल्या पत्नीचा केव्हा जीव घेईल, याचा नेम नाही' असे सांगून त्यांची कानउघाडणी केली.

'आले मना तव मारिले बळकट । बांधोनिया मोट टाकियेली ।।
हिरंभट म्हणे व्हा तुम्ही बाहेरी । हा दिसे हत्यारी चांडाळ की ।।'
(अभंग क्र. १६, ओ. १, २)

यावर बहिणीच्या कुटुंबीयांनी बहिरंभटाची कशीबशी समजूत काढली. 'आजच्या दिवस येथे राहू द्या. उद्या सकाळी काहीतरी व्यवस्था करतो' असे म्हणून त्यास थोपविले. बहिणीची हीनदीन अवस्था

पाहून गायवासरांना अतिशय दुःख झाले. चारापाणी वर्ज्य करून ते दीनवाणे बहिणीकडे पाहत बसले. त्यांना पाहून भ्रताराचे मन थोडे द्रवले व त्यांनी तिची मोट सोडून बहिणीला मोकळे केले. बहिणी गायवासराजवळ जाताच मातेला पाहून पुत्राने जवळ यावे, तसे ते बहिणीच्या जवळ आले. तिला प्रेमाने चाटू लागले. बहिणीने त्यांना चारापाणी दिले; पण दुःखाने व्याकूळ झालेल्या गायवासराने तिच्या हातूनही चारापाणी घेतले नाही. तेव्हा बहिणीनेसुद्धा अन्नपाण्याचा त्याग केला.

परस्परांवरील प्रेमामुळे चाललेल्या या अन्नत्यागाची बातमी बाहेर फुटली. गावातील लोकांच्या चर्चेचा विषय झाली. लोक येऊन पाहून जाऊ लागले. जयरामस्वामींना हे कळल्यावर तेही बहिरंभटाच्या घरी पोचले. पूर्ण चौकशी केल्यानंतर या सगळ्याला कारणीभूत बहिणाबाईंचा पतीच आहे, हे त्यांच्या ताबडतोब लक्षात आले. त्यांनी बहिणाबाईंच्या पतीची कानउघाडणी केली.

‘योगभ्रष्ट इची साधने बळकट । तू रे ईस कष्ट करू नको ।।
स्वधर्मेची तुझी करील हे सेवा । उद्धरील जीवा आपुलिया ।।
तुझे काही पदरी पूर्वील सुकृत । तेणे हा सांगात प्राप्त जाला ।।
गाई आणि वत्स हे इचे सांगाती । अनुष्ठानी होती ऐक्यभावे ।।’
(अभंग क्र. १७, ओ. ८ ते ११)

अशाप्रकारे जयरामस्वामींनी केवळ बहिणाबाईंच्या पतीची केवळ समजूतच काढली नाही, तर त्याला जाणीव करून दिली, की त्याचे कोणतेतरी पुण्य म्हणून बहिणाबाई त्याची पत्नी झाली. बहिणाबाई, गाय व वासरू हे पूर्वजन्मी एका जागी अनुष्ठानास बसले असता, दोघांच्या अनुष्ठानात काही अंतराय निर्माण झाला. त्यांचे अनुष्ठान अपूर्ण राहिले. त्या दोघांना पुढचा गायवासराचा जन्म प्राप्त झाला. बहिणाबाईंनी मात्र ते अनुष्ठान पूर्ण केल्यामुळे या जन्मी त्यांची चित्तशुद्धी झाली, असे सांगून बहिणा, गाय व वासरू यांचे त्याच्या जीवनातील महत्त्व समजावून सांगितले. या प्रसंगाचे वर्णन मीरा सशीतल यांनी www.samachar.com या संकेतस्थळावर थोडक्यात पण अत्यंत मार्मिकपणे केले आहे.

'Grief-stricken, Bahina falls unconscious for three days on hearing about the calf’s death. On regaining consciousness, she finds herself surrounded by her family, but Bahina was a changed person. She had experienced

enlightenment in her unconscious state and had seen Lord Vithal before her. She had also seen Saint Tukaram. She becomes a devotee of Lord Vitthal and spents her time singing Tukaram's abhangas. On hearing this, Jayaram Swami tells Ratnakar that his wife Bahina was no ordinary woman but a saint and Yoga-brastha (a former yogi under a temporary lapse) and that he was very fortunate in having her as a wife.'[६]

बहिणाबाईच्या पतीची थोडीफार समजूत पटली, पण वासराने मात्र झाला प्रकार फारच मनाला लावून घेतला. मागील जन्मीचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्यासच जणू त्याचा जन्म झाला असावा, अशाप्रकारे बहिणाबाई व जयरामस्वामी यांची भेट झाली आणि स्वतःलाही जयरामस्वामींचा आशीर्वाद प्राप्त करून घेऊन जणू कार्य संपल्याप्रमाणे ते मरणप्राय पडून राहिले. दुसऱ्या दिवशी पहाटे बहिरंभट सहजच फिरत फिरत अंगणात आले. नेहमीच्या सवयीप्रमाणे श्लोक म्हणू लागले. 'मुकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।' एवढे म्हटल्यावर काय आश्चर्य! यापुढील ओळी वासराच्या तोंडातून मनुष्यवाणीने बाहेर पडू लागल्या. 'यत्कृपा तमहं वंदे परमानंद माधवम् ।' या ओळी म्हटल्याबरोबर त्याने मान टाकली. बहिणाबाई धावत त्याच्याजवळ गेल्या; परंतु त्याचे प्राणोत्क्रमण झाले. बहिणाबाईंनी दुःखातिरेकाने हंबरडा फोडला.

'प्राणासवे प्राण जाऊ पाहे माझा । प्राक्तनासी दुजा प्रयत्न नाही ।।
गाय हुंबरडे दोहीवरी मान । टाकी परी जाण शब्द कैचा ।।'
(अभंग क्र. १९, ओ. ७, ८)

दुःखाने बहिणाबाई मूर्च्छित पडल्या. वत्स परलोकी गेल्याच्या वार्तेने जयरामस्वामी पुन्हा तेथे आले. या अलौकिक वासराची त्यांनी स्वतः अंत्ययात्रा काढली. दिंडी, पताकांसह काढलेल्या या अंत्ययात्रेत संतगण, भक्तगण सहभागी झाले होते. पुढच्या एकूणच प्रसंगांचे वर्णन बहिणाबाई अतिशय हृद्य शब्दांत करतात.

'मग सर्व श्रेष्ठ संत साधुजन । करीत कीर्तन वत्स नेले ।।
दिंडी पताकाने मिरविले वत्स । गाय सवे तुच्छ मानी देह ।।
हुंबरडा हाणोनी चाले मागे मागे । गाय अंतरंगे महादुःखी ।।
पुरूनिया वत्स आले सर्व जन । करूनिया स्नान गेले गृहा गेले ।।
गाय वत्सापासी जाउनी हुंबरे । मागुती ते फिरे गृहासी ये ।।'
(अभंग क्र. २० ओ. ३ ते ७)

बहिणाबाईंना वासराच्या मृत्यूचा इतका धक्का बसला की, मूर्च्छित झालेल्या त्या पुन्हा शुद्धीवर आल्याच नाहीत. सर्व मंडळी अंत्ययात्रा आटोपून घरी आली तरीही बहिणाबाई बेशुद्धच होत्या. वासरू मेलेले आणि आवडत्या बहिणीची ही अवस्था पाहून गाय अजूनच सैरभैर झाली.

वत्साच्या मृत्यूनंतर चौथ्या दिवशी कार्तिक वद्य प्रतिपदेला एक चमत्कार घडला. बेशुद्धावस्थेतील बहिणाच्या स्वप्नात एक ब्राम्हण आला आणि तिला म्हणाला, 'सावध सावध विवेक धरी बाई । सावध सावध सावध तू मनी ।।' बहिणा मूर्च्छेतून थोडीशी जागी झाली. एकाच क्षणात तिच्यात अद्भूत बदल घडून आला. डोळे उघडताच दृष्टीपुढे पांडुरंग दिसू लागला. जयरामस्वामी दिसू लागले. स्वप्नातला ब्राम्हण दिसू लागला. नामस्मरण होऊ लागले. पूर्वी ऐकलेल्या हरिकथा आठवू लागल्या. तुकारामांचे अभंग कानात घुमू लागले. त्या अभंगांचा अर्थ मनात घोळू लागला. बहिणा अतिशय व्याकूळ झाली. मनापर्यंत पोचलेल्या या अभंगांच्या कर्त्याला भेटण्याची मनापासून ओढ लागली.

यावरून त्या काळात तुकोबांचे अभंग किती प्रसिद्ध झाले होते हे लक्षात येते. याशिवाय बहिणाबाईंची महत्ता यातून दिसून येते. कारण प्रत्यक्षात कधीही तुकोबांचे दर्शन न होताही केवळ जयरामस्वामी आदी संतसज्जनांकडून ऐकलेल्या अभंगांवरून त्यांना तुकारामभेटीची ओढ लागावी. यामागे त्यांच्या पूर्वजन्मीचे काही संचित असल्याची शक्यता आहे. 'एवढ्या अल्पवयात इतकी अंतशुद्धी होऊन तुकोबांचे अभंग कानी पडताच त्यांच्या दर्शनाचा ध्यास मनाला सारखा लागून राहावा, हे भावी पारमार्थिक उत्कर्षाचेच पूर्वचिन्ह होय; यावरून पूर्वजन्मी बहिणाबाईंची आध्यात्मिक उन्नती पुष्कळच झालेली असली पाहिजे, हे उघड दिसते.'[७]

आता बहिणाबाईंना सद्गुरूची ओढ लागली. आपल्यातल्या आध्यात्मिक आकर्षणाचा साक्षात्कार त्यांना झाला. या सर्वांवर उपाय म्हणजे सद्गुरूच आहे, अशी त्यांना खात्री पटली.

'मच्छ जैसा जळावाचुनी चरफडी । तैसी ते आवडी तुकोबाची ।।
अंतरीचा साक्ष असेल जो प्राणी । अनुभवे मनी जाणेल तो ।।
तृषितासी जैसे आवडे जीवन । तैसा पिंडप्राण विणतया ।।
बहेणि म्हणे हेत तुकोबाचे पायी । ऐकोनिया देही पदे त्याची ।।'
(अभंग क्र. २२ ओ. १ ते ४)

मासा व जळ यांच्या उदाहरणावरून बहिणाबाई तुकोबांविषयीची भेटीची तळमळ व्यक्त करतात. वासरू गेल्याचे दुःख आणि संसाराविषयीची ओढ नाहीशी झाल्याने बहिणा फक्त तुकोबांपुरती उरली. त्रिविधताप शांत करणारा, वासना निःशेष करणारा, जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका करणारा, संचिताला दग्ध करून, संसारश्रम निवारण करणारा सद्गुरू तुकोबा मला अजूनही का भेटत नाही, या विचाराने ती उदास झाली. शेवटी स्वतःलाच ती दोष देऊ लागली. आत्यंतिक निराशेच्या घोर अंधकारात बहिणा तडफडत होती. 'हा काळ म्हणजे भक्ताची परीक्षा घेणारा काळ असतो. या काळात त्याची मनःस्थिती नैराश्याच्या काळोखाने व्यापून गेलेली असते. त्याची मनःस्थिती अतिशय व्याकूळ आणि आर्त होऊन जाते. कधीकधी हा काळ अधिकच लांबत जातो. या अवस्थेला अभ्यासक भक्ताच्या आयुष्यातील 'आत्म्याची काळोखी रात्र' असे म्हणतात.'[८] ही काळरात्र कसोटीची असते. आध्यात्मिक विकासातील ही काळरात्र एक अपरिहार्य टप्पा असतो. चार दिवस तिची ही तडफड चालली. शेवटी बहिणाने मनापासून सद्गुरूला मारलेल्या हाकेला प्रतिसाद मिळाला. नामसंकीर्तनाच्या घोषात तुकारामांनी स्वप्नात येऊन दर्शन दिले. 'मी तुझ्या पाठीशी आहे' असे आश्वासन दिले.

तुकोबांच्या या दृष्टांताने बहिणेचे सारे जीवनच पालटून गेले. या स्वप्नभेटीत तुकोबांनी तिला अमृतदूध प्राशन करावयास दिले. त्यामुळे तिच्या शरीरात मारहाण व उपासमारीमुळे आलेले विकलत्व नाहीसे होऊन नव्या चैतन्याने तिचे रूप झळाळू लागले. जयरामस्वामीही बहिणेमधील हा इष्ट बदल पाहून चकित झाले. आनंदीही झाले. बहिणा केवळ अठराव्या वर्षी सद्गुरूच्या कृपाप्रसादाने परिपूर्ण झाली. त्यांना तुकोबांमध्ये पांडुरंगाचे स्वरूप दिसू लागले. आपले देह व्यापारही तुकोबाच करीत आहेत, असा भास होऊ लागला. तुकोबा व त्यांच्यात अद्वय निर्माण झाले.

'श्रीसमर्थ रामदास, रंगनाथ, जयराम, वामन, आनंदमूर्ती, केशवस्वामी इत्यादी अनेक ब्राम्हण संत महाराष्ट्रात त्यावेळी विद्यमान असता व त्यापैकी जयरामस्वामींशी तर बहिणाबाईंचा चांगला परिचय असता या ब्राम्हण स्त्रीने यांपैकी कोणाचेही शिष्यत्व न स्वीकारता तुकोबांचे शिष्यत्व पत्करले यांवरून त्यांच्या मनात जातिभेदमूलक श्रेष्ठत्व-कनिष्ठत्वाच्या कल्पनेचा लवलेशही नव्हता, हेच सिद्ध होते.'९ बहिणाबाईंनी तुकारामांना गुरू मानले आणि स्वप्नातच त्यांचा अनुग्रहही घेतला, ही गोष्ट सर्वांना कळल्यावर

बहिरंभट म्हणाले, 'साक्षात्कारानंतर बहिणेचे रूप पूर्ण पालटून गेले आहे. तुकोबांशी चित्त लावून ती एकलकोंडी बनली आहे. तिचा भ्रतारही तिच्याकडे वेडावल्या नजरेने पाहतो आहे. आश्चर्याने त्याला काही कळेनासे झाले आहे.'

'भ्रतार हा तिचा वेडावला राहे । उगाची तो पाहे तियेकडे ।।
छांदस होउनी बैसली घरात । तुकोबासी चित्त लाउनिया ।।'
(अभंग क्र. २८ ओ. ९, १०)

बहिरंभटाच्या तोंडून जयरामस्वामींनी ही हकिकत ऐकल्यावर त्यांना संतोष वाटला. बहिणेची स्थिती पाहण्याकरिता ते बहिरंभटाकडे आले. त्यांना पाहून बहिणाबाईंना अतिशय आनंद झाला. या मनोहर भेटीनंतर जयरामस्वामी घरी गेले असता, तुकोबांनी त्यांना मनोमय दर्शन दिले. इतकेच नव्हे तर त्याच वेळी बहिणाबाईंनाही दर्शन देऊन तिच्या मुखात कवळ घातला आणि सांगितले, 'तुम्ही आता इथे राहू नका. ज्ञान मिळवण्यासाठी नवीन ठिकाणी जा.' बहिणाबाईंना मिळालेली आज्ञा मानून त्या लगेच जाण्यास निघतील, असे सर्व लोकांस वाटायला लागले. जाण्याआधी त्यांचे एकदा दर्शन घ्यावे, असा विचार करून दर्शनासाठी लोकांच्या रांगा लागल्या. साहजिकच मत्सरी स्वभावाच्या भ्रताराला हे आवडले नाही. त्याच्या मनात न्यूनगंड उत्पन्न होऊन तो मनातल्या मनात संतापू लागला. बहिणाबाईंना 'गोसावीण' म्हणून निंदा करीत 'आम्हाला कोणी विचारीत नाही' असे बडबडू लागला. बहिणाबाईंसारख्या महान व्यक्तीच्या पतीस्थानी असूनही त्याविषयी अभिमान न बाळगता स्वतःच्या मानाचा विचार करणाऱ्या संकुचित नवऱ्याने आपल्या थोर पत्नीला नाही नाही ते बोलण्याची संधी दवडली नाही.

'म्हणे ही बाईल मरे तरी बरी । ईस का पामरे भेटताती ।।
काय आता घुमे येईल आंगासी । देव इचे पोसी पोट कैसे ।।'
(अभंग क्र. ३१ ओ. ३, ४)

तुकारामांना 'शूद्र' म्हणून त्यांचा अपमान करीत माझ्या पत्नीला बिघडविले, असा दोष रत्नाकर पाठक देऊ लागला. माझ्या संसाराचा सत्यानाश केला, स्वप्नात दृष्टांत देऊन कधी भक्ती होत असते का? हे सगळे भिक्षुकीचे चाळे आहेत, असे म्हणून त्याने आपल्या रागाला वाट करून दिली. यावर कडी म्हणजे पत्नीचा त्याग करून तो वनात जाण्याची भाषा करू लागला. सासूसासऱ्यांना नमस्कार करून म्हणाला, 'माझी पत्नी तीन महिन्यांची

गरोदर आहे आणि तिला देवपिसे लागले आहे, म्हणून हिच्यावर उपचार करा. मला आता हिचे मुखावलोकनही करण्याची इच्छा नाही.'

'न पाहे मी मुख सर्वथा इयेचे । हीनत्व आमचे कोण फेडी ।।
भंडिमा सोसून कोण राहे येथे । ऐसिया स्त्रियेते कोण पाळी ।।'
(अभंग क्र. ३४ ओ. ५, ६)

बहिणाबाईंच्या भ्रताराच्या या वर्तनावरून तो अगदी अरसिक आणि ग्राम्य असून पारमार्थिक वृत्तीचा त्याच्या ठायी लवलेशही नव्हता, हे उघड दिसते. वयाच्या तिसाव्या वर्षी बहिणाबाईंशी त्याचे दुसरे लग्न झाले. पुढे लहानशा वयात नवरेपणाच्या जोरावर ज्याने निर्दयपणे त्यांना मारले, झोडले, त्याने लोकांकडून मानाची अपेक्षा करणेही चूकच आहे.

नवऱ्याचा हा निर्णय ऐकून बहिणाबाई कोसळून पडल्या. सद्‌गुरुध्यान तुटले आणि पुढील विचारांनी मनाचा ताबा घेतला. स्वप्नात का होईना, सद्‌गुरूंनी अंगीकार करून परमार्थ मार्ग सुकर केला, म्हणून बहिणाबाई समाधान मानीत होत्या; पण उलट पतीनेच त्यांचा त्याग करायचे ठरवले. बहिणाबाईंपुढे आता अत्यंत जटील असा पेच निर्माण झाला. काय करावे? पतीचा त्याग करून परित्यक्तेचे जीवन जगावे की स्वहिताचा, आत्मसुखाचा, परमार्थाचा, ज्ञानसंपन्नतेचा मार्ग पत्करावा? दोन्ही गोष्टी बहिणाबाईंसाठी अत्यंत महत्त्वाच्या होत्या. त्या काळात पतीचा त्याग करणे किंवा पतीच्या विरोधात जाणे समाजसंमत नव्हते. हा धाडसी निर्णय घेणे बहिणाबाईंच्या आवाक्याबाहेरचे होते. आपल्या पतीचा स्वभाव माहीत असल्यामुळे कितीही विनवण्या केल्या, तरी ते आपल्या निश्चयापासून परावृत्त होणार नाही, हे त्या जाणून होत्या. बहिणाबाईंचे आईवडीलही जावयापुढे हतबल झाले होते. अशावेळी आजूबाजूला सर्व असूनही बहिणाबाई अगदी एकाकी पडल्या होत्या. 'एकटी एकट पडले वनी । नाही तो शेजार सज्जनाचा ।।' असे त्यांना वाटू लागले. शेवटी सर्व बाजू बंद झाल्यावर त्यांनी पांडुरंगाला साकडे घातले. पांडुरंगाला सखासहोदर संबोधून त्याची आराधना केली. 'तुझी भक्तीपण घडू दे आणि पतिव्रताधर्म पाळता येऊ दे' असे दोन्ही साध्य करण्याविषयी त्या पांडुरंगाला मार्ग काढायला विनवतात.

या कठीण प्रश्नावर पांडुरंगालाही जणू उत्तर सुचत नाही. म्हणून तोही शांतच उभा राहतो. त्याच्याकडूनही निराशा झाल्यावर बहिणाबाईंना आता सगळीकडे अंधार झाल्यासारखा दिसतो. शेवटी

आत्महत्येशिवाय पर्याय नाही, असाही विचार त्या करायला लागतात. वर्षानुवर्षे चालत आलेल्या संस्कृतीचा, बालपणापासून मनावर झालेल्या संस्कारांचा शेवटी विजय होतो. बहिणाबाई परमार्थमार्गाचा त्याग करून पतीच्या इच्छेला मान देण्याचे ठरवितात. असा पती जो त्यांच्यापेक्षा वयाने थोर असूनही विचारांनी लहान होता. त्यांच्या गुरूंचा - तुकाराम महाराज व जयरारामस्वामींचा - अपमान त्याने केला होता. बहिणाबाईंना निर्दयपणे मारझोड करून वासराच्या मृत्यूस अप्रत्यक्षपणे कारणीभूत झाला होता. अशा पतीचे सर्व गुन्हे पदरात घेऊन बहिणाबाई त्याच्याशीच एकनिष्ठ राहणार होत्या. एवढेच नव्हे तर पतीच्या सेवेतच सर्व सुख आहे, हे स्वतःस पटवून देत होत्या.

'घेईन उदंड सेवासुख हेही । साक्ष या वेदही आहे मज ।।
भ्रताराची सेवा पतिव्रता करी । तरी ते उद्धरी उभयकुळे ।।'
(अभंग क्र. ३८ ओ. २, ३)

वेदांचा दाखला देऊन उभयकुळांचा उद्धार करणाऱ्या पतिव्रता धर्माचे पालन त्या करतात.

'भ्रतार गेलिया वैराग्य घेउनी । पांडुरंगा जनी जिणे काय ।।
प्राणेविण देह काय पावे शोभा । रात्रीविण प्रभा चंद्राचिये ।।'
(अभंग क्र. ३६ ओ. १, २)

पत्नी ही पतीची अर्धांगिनी असते. पतीशिवाय आपण अपूर्ण आहोत, ही भावना बहिणाबाईंनी व्यक्त केली आहे. पती सोडून गेल्यास आपल्या जीवनास काहीच अर्थ नाही. रात्रीला जशी चंद्रामुळे शोभा येते, तशी पत्नीला पतीमुळे. पत्नी म्हणजे शरीर आहे, तर पती त्यातला आत्मा. पती म्हणजे पाणी, पत्नी त्यातील मासोळी. अशाप्रकारे दोघांनाही एकमेकांशिवाय अर्थ नाही, असे पटवून देऊन बहिणाबाई यातून शिकवतात -

'प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेचि गगन झेलियेले ।।'

'जगातील इतर देशांतील स्त्रिया व हिंदू स्त्रिया यांच्या स्वभावात जे मोठे अंतर आहे, ते हेच होय. नवऱ्याने लहानपणापासून इतका छळ केला, ताडन केले, कटूशब्दांची लाखोली वाहिली व शेवटी मुखावलोकन न करण्याच्या उद्देशाने तो अरण्यात निघाला, तरी ती साध्वी त्याच्या संबंधाने एकही तिरस्कारव्यंजक शब्द न उच्चारता उलट त्याला 'ब्रह्मसनातन स्वामी माझा' असे म्हणते. तिच्याविषयी स्वसंस्कृतिनिंदक नवमतवाद्यांशिवाय कोणाच्या मनात आदरभाव उत्पन्न होणार नाही?'[१०]

बहिणाबाईंनी आपला निर्णय पतीला सांगितला. आपली द्विधा मनःस्थितीही सांगितली; परंतु पतीचा निर्णय काही बदलला नाही. पत्नीचा त्याग करून तो वनात जायला निघणार, तोच त्याच्या शरीरात एकाएकी दाह होऊ लागला. कोणालाच काही कळेना. एकसारखा सात दिवस त्याच्या शरीराचा दाह होत होता. सर्व उपाय करून झाले. वैद्य, अंगारे, धुपारे कोणाचाच उपयोग झाला नाही. वेदनांपायी एक महिनाभर त्याने अन्नही ग्रहण केले नाही. बहिणाबाई त्याची अहोरात्र सेवा करीत होत्या. रत्नाकर पाठकाला ह्या वेदना अगदी असह्य झाल्या. मरण आले तर बरे होईल, असे वाटू लागले. त्याच्या सहनशक्तीचा अंत झाल्यावर अचानक त्याला आठवले, की आपण पांडुरंगाची, तुकोबांची निंदा केली, त्याचे प्रायश्चित्त तर आपणांस भोगावे लागत नसेल ना? हाही उपाय करून पाहावा, या हेतूने त्याने तुकारामांची प्रार्थना करावयास सुरुवात केली. 'तुम्ही खरोखरच महान असाल, तर काहीतरी चमत्कार दाखवा आणि माझी व्यथा दूर करा.'

अशाप्रकारे तुकारामांची प्रार्थना करताच कोणी एक वृद्ध ब्राम्हण पतीजवळ येऊन त्यास म्हणाला, 'अरे, तुला मृत्यूची इच्छा का झाली? आपल्या सद्‌गुणी धर्मपत्नीचा त्याग करायचे तू का ठरवलेस?'

'स्वधर्माविरहित वर्तेल हे जरी । तरी तिचा करी त्याग वेड्या ।।
हे आहे विरक्त निश्चये हरिभक्त । तुवाही निश्चित व्हावे तैसे ।।'
(अभंग क्र. ४० ओ. ५, ६)

'तुझी पत्नी जर स्वधर्माचा त्याग करून वागली, तर निश्चित तिचा त्याग कर. तुझ्या पत्नीला आत्मज्ञान प्राप्त झाले आहे. संसारातील मोहमायेपासून दूर असे हिचे विरक्त मन आहे. हरिभक्तीतच हिचा जीव गुंतला आहे. अशा स्त्रीला सोडले, तर तुझा जन्म निरर्थक आहे. तिच्यासोबत तिच्याच मार्गाने विरक्तीकडे वाटचाल केलीस, तर निश्चितच तुझे कल्याण होणार आहे.'

ब्राम्हणाचे वचन ऐकून रत्नाकर पाठक पश्चात्तापदग्ध झाला. ब्राम्हणाच्या पायाशी लोटांगण घालून त्याने आतापर्यंतची आपली सर्व पापे कथन केली. आपल्या पापांना क्षमा नाहीच, हे तो मनोमन जाणून होता. म्हणूनच ब्राम्हणाला विनवणी करीत तो म्हणाला, 'महाराज, मला जीवदान द्या. मला जीवदान दिल्यास हा जीव मी तुमच्याच सेवेसाठी खर्ची घालेन. आपल्या पत्नीस कधीही अधिकउणे बोलणार नाही. पूर्णतः हरीला शरण जाईल.'

रत्नाकर पाठकाला जाणीव झाली की, ‘आपण केवळ आपल्या पत्नीचाच छळ केला नाही, तर एका संतश्रेष्ठाचाही अनादर केला. त्याचे मन पश्चात्तापाने दग्ध झाले. त्याने तुकाराम महाराजांची मनातल्या मनात क्षमा मागितली व तेव्हा कुठे त्याच्या वेदना कमी झाल्या. तो आपल्या पत्नीकडे गेला. तिचीही त्याने क्षमा मागितली व आपणच माझे गुरू आहात, अशी करुणा भाकली.’[११]

बहिणाबाई हे सर्व संभाषण ऐकत होत्या. त्यांना कळून चुकले, आपला पती आता बदलला आहे. त्यांनी पतीला नमस्कार केला. त्याक्षणी तो ब्राम्हण अदृश्य झाला. बहिणाबाईंचे पती सर्व व्याधींपासून मुक्त झाले. त्याचा मरणप्राय देह आरोग्यसंपन्न झाला. बहिणाबाईंच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यांची द्विधा मनःस्थितीतून सुटका झाली होती. मनासारखा मार्ग त्यांना अनुसरता येणार होता. शिवाय पतीचीही साथ त्यात मिळणार होती. बहिणाबाईंना खात्री झाली, की तुकारामांनीच येऊन आपल्याला दुःखातून सुखात आणले. ब्राम्हणाच्या रूपात येऊन पतीचे मन वळविले. त्याला योग्य मार्ग दाखवून देहूला जाऊन राहण्याची बुद्धी दिली. शेवटी गुरूच आपल्या शिष्याच्या कामी आले.

या घटनेनंतर रत्नाकर पाठक बहिणाबाईंशी अतिशय चांगल्या तऱ्हेने वागू लागला. आपले भविष्य कळल्याने त्याने आपल्या सासूसासऱ्यांना ‘आता हरिभक्तीतच आमचे आयुष्य जाणार असल्याने तुम्ही आपल्या मूळ गावी म्हणजे देवगाव येथे जाऊन राहावे.’ असा सल्ला दिला.

रत्नाकर पाठकाचा सल्ला न मानता तुकारामांचे दर्शन घ्यावे, या हेतूने सासूसासऱ्यांसकट सर्व मंडळी कोल्हापूर सोडून देहूला आली. देहूच्या दर्शनाने बहिणाबाई हरकून गेल्या. ‘देहू गाव ही पुण्यभूमी आहे. तिथं पांडुरंग नांदतो आहे. कटीवर कर आहेत. वामांगी रखुमाबाई उभी ठाकली आहे. समोर पारावर गरुड उभा आहे. श्रीहरीच्या उत्तरेला पिंपळ डोलतो आहे. दक्षिणेला हरेश्वर ध्यानस्थ बसला आहे. समोरून गंगामाई इन्द्रायणी वाहात्येय. शेजारी बल्लाळाचं वन आहे. त्यांत नानापरींची झाडं आहेत. फुलं फलताहेत, डोलताहेत. त्या वनात लक्ष्मीनारायण उभा आहे. या सगळ्यांचं अधिष्ठान आहे सिद्धेश्वर. गणराय दारावर उभे राहून विघ्नांचं निवारण करताहेत अन् मदतीला आहेत बहिरव आणि मारुतिराय!’[१२] असे देहूचे सुंदर वर्णन गो.नी. दांडेकरांनी केले आहे. बहिणाबाई आणि कुटुंबीय सर्वप्रथम

इंद्रायणीत स्नान करून पांडुरंग दर्शनाला आले. बहिणाबाईंच्या तीव्र इच्छाशक्तीमुळे त्यांना पांडुरंगासोबतच तुकारामांचे दर्शन घेता आले. पांडुरंगाची आरती तुकाराम महाराज रोजच करीत असत. आतापर्यंत स्वप्नात ज्यांचे दर्शन घेतले, ज्यांची पूजा केली, ते तुकाराम महाराज प्रत्यक्ष समोर पाहून बहिणाबाईंचा आनंद गगनात मावेनासा झाला. विशेष म्हणजे आतापर्यंत स्वप्नात त्यांनी जसे रूप पाहिले होते, तशीच हुबेहूब छबी त्यांच्यासमोर उभी होती. त्यामुळे आपल्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे त्यांना वाटले.

मध्यान्हकाली क्षुधाशमनार्थ बहिणाबाईंचा पती गावात भिक्षा मागण्यास गेला असता कोंडाजी नामक ब्राम्हणाने त्याला भोजन करण्याची विनंती केली. त्यावर 'माझ्यासोबत अनेक जण आहेत' असे सांगून त्याने नकार दिला असता कोंडाजीने त्या सर्वांना इकडेच भोजनास घेऊन या आणि याच वस्तीत एखादी राहावयास जागा पाहून घ्या, असे सांगितले.

बहिणाबाई व त्यांच्या कुटुंबीयांनी जागा पहावयास सुरुवात केली. रत्नाकर पाठकाला शोधता शोधता एक चांगला प्रशस्त वाडा दिसला. म्हणून त्याने त्या वाड्याच्या मालकास विचारावयाचे ठरविले. त्या वाड्याच्या मालकाचे नाव मंबाजी गोसावी असे होते. हा मंबाजी अतिशय धूर्त व कपटी इसम होता. सर्गीया देहूत तो कुप्रसिद्ध होता. रत्नाकर पाठक नवखा म्हणून त्यास हे माहिती नव्हते. जागा मागावयास जाताच मंबाजी अतिशय क्रोधिष्ट झाला आणि रत्नाकर पाठकाला मारावयास निघाला. जागा तर दिलीच नाही, उलट अद्वातद्वा बोलून त्यास हाकलून लावले. शेवटी हे कुटुंब तुकोबांच्या देऊळवाड्यात आनंदओवरीत राहू लागले. दुपारी सगळेजण कोंडाजीच्या घरी जेवावयास गेले. कोंडाजीने विचारपूस केल्यानंतर रत्नाकर पाठकाने सर्व वृत्तांत कथन केला. बहिणाबाईंची भक्तिपरायणता पाहून कोंडाजीदेखील प्रभावीत झाला. 'तुम्ही येथे राहिल्यास तुम्हाला हरिकथेचा लाभ मिळेल आणि उदरनिर्वाहाचाही प्रश्न सुटेल', असे कोंडाजीने सांगितले. बहिणाबाईंना तर 'आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन' अशी स्थिती झाली. दैव एवढे अनुकूल कधीच झाले नव्हते. तुकोबांच्या सहवासात राहावयास मिळाले, हे मोठे भाग्य बहिणाबाईंना लाभले. पांडुरंगाच्या देवळात तुकोबा स्वतः त्रिकाल कथा व आरती असे कार्यक्रम करीत असत. त्याचे श्रवण बहिणाबाईंकडून होऊ लागले.

अशातऱ्हेने सर्व चिंता समाप्त होऊन बहिणाबाई हरिभक्तीत मन रमवू लागल्या. त्यांचे हे सुख मंबाजीच्याने पहावले गेले नाही. तो रत्नाकर पाठकास म्हणाला, 'तुम्ही दोघेही पतीपत्नी विरक्त दिसता, मग माझे शिष्यत्व का पत्करित नाहीत?' रत्नाकर पाठकाने नकार दिल्यावरही मंबाजीने त्याच गोष्टीचा घोषा त्यांच्याजवळ लावला. तेव्हा रत्नाकर पाठकाने 'तुमच्या अनुग्रहाची आम्हांस गरज नाही. आम्ही दुसऱ्या गुरूचा उपदेश याआधीच घेतला आहे', असे सांगितले. मंबाजीस हे खरे वाटेना. तेव्हा रत्नाकर पाठकाने कोल्हापुरात घडलेला सर्व वृत्तान्त मंबाजीस कथन केला. स्वतःला गोसावी म्हणविणाऱ्या, पण तुकारामांचा द्वेष करणाऱ्या मंबाजीचा हे ऐकून अतिशय जळफळाट झाला.

'स्वप्नीचा अनुग्रह गुरु केला शूद्र । तोही बळिभद्र ज्ञानहीन ।।
तुम्हास वाळीन ब्राह्मणाचे पंक्ती । तुम्ही गुरुभक्ती नका सांगू ।।'
(अभंग क्र. ४६ ओ. ९, १०)

'स्वप्नातल्या गुरूकडून कधी कोणाचे समाधान झाले आहे का? जोपर्यंत सद्गुरूसेवा घडली नाही, गुरूने प्रत्यक्ष मस्तकावर हात ठेवला नाही, तोपर्यंत मनुष्य अनुग्रहशून्यच म्हटला पाहिजे. त्यातही तुम्ही गुरू कोणता केला, तर शूद्र असा तुकाराम. या शूद्राला काही ज्ञानतरी असेल का? त्यामुळे तुम्ही अनुग्रहाच्या गप्पा करूच नका. तुम्ही शूद्राचे शिष्य म्हणविता ही गोष्ट ब्राम्हणांस कळवून तुम्हाला वाळीतच टाकतो.' अशाप्रकारे मंबाजीने बहिणाबाई व त्यांच्या कुटंबीयांस धमकाविले. एवढेच नव्हे तर त्यांच्याशी त्याने उघड उघड द्वेष मांडला.

एके दिवशी बहिणाबाई, वाटेत मंबाजी भेटला असता, त्यास नमस्कार करू लागल्या. मंबाजीने त्यांच्या नमस्काराचा स्वीकार तर केलाच नाही उलट त्यांचा अपमान करण्यासाठी तो म्हणाला, 'तुम्ही सोनार किंवा गोळक आहात काय? तुमच्या ठायी ब्राम्हणाचे कोणतेच गुण दिसत नाहीत. त्यामुळे तुम्ही आमच्या दृष्टीने शूद्रच आहात. तुम्ही जर कोणाच्या घरी जेवण केले तर मी तुम्हाला दिवाणीत खेचल्याशिवाय रहाणार नाही.'

मंबाजीच्या या धमकीमुळे बहिणाबाई घाबरून गेल्या. त्यांनी तात्काळ ही वार्ता आपल्या भ्रताराच्या कानी घातली. ते दोघे लगेच कोंडाजी व देहूचे कुळकर्णी, महादजीपंत यांच्याकडे गाऱ्हाणे सांगावयास गेले. त्यांना मंबाजीचा स्वभाव माहिती होता. त्यामुळे ते म्हणाले, 'हा मंबाजीचा केवळ

दुष्टपणा आहे. वास्तविक असे करण्याची त्याला काहीच गरज नाही.' मंबाजीचा छळ दिवसेंदिवस वाढतच होता. ब्राम्हण असून शूद्र गुरू केला याच गोष्टीवर भर देत तो विविध प्रकारे बहिणाबाई व त्यांच्या कुटुंबीयांस त्रास देत होता.

बहिणाबाई व कुटुंबीयांना संरक्षण देण्यासाठी महादजी कुळकर्णी यांनी आपल्या वाड्यात त्यांना राहावयास जागा दिली. त्यामुळे मंबाजी अधिकच चिडला. बहिणाबाई व त्यांच्या कुटुंबीयांस देहूमधून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करू लागला. यामुळे बहिणाबाईंना सतत मिळणाऱ्या तुकोबांच्या संकीर्तनास मुकावे लागले. त्यांच्या भजनात विघ्न ओढवले. बहिणाबाईंना याचे फार दुःख झाले. शेवटी आपल्या नशिबातच शांतपणे भक्ती करणे लिहिलेले नाही, असा त्यांनी प्रारब्धाला दोष दिला.

बहिणाबाईंचा कठीण काळ अजून संपला नव्हता. मंबाजीचे छळसत्र अजून चालूच होते. अप्पाजी गोसावी या नावाचे एक विख्यात राजयोगी त्यावेळी पुण्यात रहात होते. त्यांना मंबाजीने पत्र लिहिले की, 'तुकोबा हा जातीने शूद्र असूनही तो देवळात नेहमी कथा करत भजन कीर्तन करतो. सर्व लोक त्याला नमस्कार करतात. रामेश्वर भटासारखे विद्वान ब्राम्हणदेखील त्याला नमस्कार करतात. आम्हास हा मोठा अधर्म वाटतो. हे वर्तन अगदी वेदबाह्य आहे. तरी त्या धर्माचे पालन न करणाऱ्या तुकोबास आपण शासन करावे. शिवाय देहूत एक नवीन जोडपे रहावयास आले असून त्यांनी देखील या तुकारामाचे शिष्यत्व पत्करले आहे. हे नवराबायको स्वतःस ब्राम्हण म्हणवितात; पण खरे ते सोनार आहेत. गावचे कुळकर्णीदेखील या जोडप्यास मान देतात. हा स्वधर्माचा उघड उघड उपमर्द आहे. आपण यास आळा घालाल या उद्देशाने हे पत्र लिहीत आहे.'

मंबाजीचे हे लांबलचक पत्र पाहून अप्पाजींना काहीतरी भयंकर घडले असावे असे वाटले; पण व्यस्ततेमुळे योग्य वेळी आपण या पत्राची नक्कीच दखल घेऊ असे उत्तर त्यांनी मंबाजीस पाठविले. अप्पाजी गोसावींकडून या प्रश्नाचा निकाल लवकर लागणार नाही हे पाहून मंबाजीला धीर धरवेना. त्याने येनकेन प्रकारेण बहिणाबाई व त्यांच्या पतीचा छळ मांडला. यामुळे चिंतेत पडलेल्या बहिणाबाई पांडुरंगाचा धावा करू लागल्या.

मंबाजीचे शंभर अपराध पूर्ण झाल्याशिवाय जणू त्याला शिक्षा मिळणार नव्हती. म्हणून त्याला बहिणाबाईंची आवडती कपिला गाय

चोरून नेण्याची बुद्धी झाली. त्याने त्या गाईला आपल्या घरात बांधून ठेवले आणि बहिणाबाई व रत्नाकर पाठकाचा राग तिच्यावर काढून तो तिला सोट्याने बडवू लागला. असे करून तो आपले स्वतःचेच नुकसान करून घेतो आहे, हे त्याला कळलेही नाही. सतत तीन दिवस गाईला चारापाणी काहीही न देता बांधून ठेवले. त्यामुळे गाय बिचारी उपाशी पोटी सारखी ओरडत होती. वर सोट्यांचा प्रसाद मिळत असल्यामुळे तिच्या हालांना पारावार नव्हता. इकडे गाय दिसत नसल्यामुळे बहिणाबाई अतिशय दुःखी झालेल्या होत्या. तुकोबांनाही त्यांच्याविषयी सहानुभूती वाटत होती.

तिसऱ्या दिवशी तुकाराम महाराज झोपेतून जागे झाले, तेव्हा त्यांच्या पाठीवर माराचे वळ स्पष्ट दिसत होते. त्यांची पाठही सुजली होती. तुकोबांनी विठोबाला साकडे घातले. त्यांच्या स्वप्नात गाय आली आणि 'मला सोडवा' म्हणून विनवू लागली. तिच्यासाठी तुकारामांनी विठोबाकडे धावा केला. बहिणाबाईंनाही अंतर्यामी काही क्लेश होऊ लागले. तोच एक चमत्कार झाला. मंबाजीच्या घराला आपोआप आग लागली. आजूबाजूचे लोक येऊन आग विझवू लागले. आग विझवल्यानंतर त्यांना मंबाजीच्या घरात गाय सापडली. तीन दिवस ज्या गाईची शोधाशोध चालू होती, ती अशा अवस्थेत सापडलेली पाहून लोकांना मोठे आश्चर्य वाटले. सततच्या माराने व उपासमारीने ती गाय मृत्युपंथाला लागली होती. भयाने व वेदनेने व्याकुळ होऊन ती बिचारी हंबरडे फोडीत होती. तिला सोडवून बाहेर आणले असता, तिच्या पाठीवरचे माराचे वळ सगळ्यांना स्पष्ट दिसले. लोकांनी ती गाय रत्नाकर पाठकाच्या स्वाधीन केली. तुकारामांना समजल्यावर तेही तेथे आले,

'तुकोबा धावोनी करी प्रदक्षिणा । "नमस्कारी गुणा धन्य तुझे ।।
दाखविले स्वप्न मज माय तुवा । न कळेचि धावा केला मग ।।
तुझा माझा एक आत्मा सर्वागत । ते साक्षी निश्चित आली मज" ।।'
(अभंग क्र. ५२ ओ. १६ ते १८)

गाईला प्रदक्षिणा मारून तुकोबांनी नतमस्तक होऊन म्हटले, 'गाईत व आपल्या सर्वांत एकच आत्मा वास करतो, याची साक्ष तू मला स्वप्नात येऊन दिलीस.'

दुष्ट मंबाजीने गाईच्या पाठीवर मारलेले सोट्याचे वळ आणि तुकोबांच्या पाठीवरील वळ हे सारखेच आहेत, हे पाहून तेथे आलेले रामेश्वरभट्ट गहिवरले. गाईने भोगलेल्या वेदना तुकारामांनीही भोगलेल्या

आहेत, हे जाणून त्यांना रडे कोसळले. आसपास जमलेली माणसेही हा प्रकार पाहून दिग्मूढ झाली. बहिणाबाईंना तुकोबांची महानता पुन्हा नव्याने जाणवली. तुकारामांना प्रत्यक्ष पांडुरंग संबोधून त्यांनी आपल्या मनातला आदरभाव व्यक्त केला.

अशातऱ्हेने बहिणाबाईंच्या मार्गातील सर्व अडचणी दूर होऊन त्यांचा भक्तिमार्ग सुकर झाला. पुढे बहिणाबाई आपल्या भ्रतारासह देहू येथेच महादजीपंत कुलकर्णी यांच्या वाड्यात राहिल्या. बहिणाबाई यांचे आईवडील जे देहूस येताना सोबत होते, पुढे त्यांचा काही उल्लेख नाही. त्यावरून ते परत देवगावास जाऊन राहिले असावे, अशी शक्यता आहे. देवगाव येथे आजही बहिणाबाईंचे माहेरचे वंशज राहतात.

पुढे काही कमीजास्त दुःखद प्रसंग त्यांच्या जीवनात येऊन गेले; पण त्याचा भार देवावर टाकून त्या निर्विकार मनाने ईश्वरभक्तीत रंगल्या. त्यानंतर त्यांना कन्यारत्न प्राप्त झाले. तिचे नाव काशी ठेवण्यात आले. कोल्हापूरला असताना आपले जे आवडते वत्स मृत झाले होते, त्याचाच काशीच्या रूपाने पुनर्जन्म झाला अशी बहिणाबाईंच्या मनाला खात्री वाटत होती. त्यामुळे त्या अतिशय मायेने काशीचे संगोपन करू लागल्या.

बहिणाबाई कुलकर्ण्यांच्या वाड्यात रहायला आलेल्या असल्यामुळे त्यांना आता पूर्वीसारखे तुकारामांचे सतत दर्शन होत नसे. त्यामुळे अस्वस्थ होऊन तुकोबांच्या आनंदओवरीत ध्यानस्थ बसावे, अशी त्यांच्या मनाला ओढ लागली. पतीची परवानगी घेण्याची हिंमत होत नसल्यामुळे त्यांनी मनातली इच्छा मनातच ठेवली. काही दिवसांनंतर रत्नाकर पाठकांना कामासाठी पुण्यास जावे लागले. ती संधी साधून बहिणाबाईंनी इंद्रायणीमध्ये स्नान केले. पांडुरंगाचे दर्शन घेतले. त्यांचे मन तेव्हा सात्विक वृत्तीने पूर्णतः भारलेले होते. त्या भरात त्यांनी तीन अहोरात्र ओवरीत ध्यानस्थ बसून राहिल्या. त्यांना स्थळकाळाचे भान राहिले नाही. तहानभुकेचाही विसर पडला. एकसारख्या ध्यानमग्न बसून त्या जणू ईश्वराशी एकरूप होऊन गेल्या. त्यांना समाधीतून जागे करण्यासाठी प्रत्यक्ष तुकोबांना यावे लागले. आपल्या टाळ-चिपळ्यांचा ध्वनी करून त्यांनी बहिणाबाईंना समाधीतून जागे केले. मस्तकावर वरदहस्त ठेवून तीन सोपे मंत्र त्यांना सांगितले. याशिवाय त्यांना कवित्वाचे वरदान देऊन ते म्हणाले, 'तुला आता

तेरावा जन्म प्राप्त झाला आहे. आतापर्यंतच्या जन्मांत तुझी गती योगमार्गात झाली आहे. आता पुढे तुला जन्म नाही.'

बहिणाबाईंना कळेना आपण स्वप्नात आहोत की जागे आहोत? समाधीचा कैफ अजून उतरला नव्हता. त्यामुळे तेथून उठावे असे त्यांना वाटेना. तरीही कशाबशा उठत इंद्रायणीत स्नान करून त्या सत्वर घरी आल्या. घरी आल्यावर मात्र आश्चर्य घडले. समुद्राला भरती येऊन ज्याप्रमाणे लाटांवर लाटा उसळाव्यात, तशी त्यांना जोराची स्फूर्ती होऊन त्या काव्य करू लागल्या. या प्रसंगाचे वर्णन मीरा सशितल यांनी 'समाचार' या संकेतस्थळावर अतिशय मोजक्या पण मार्मिक शब्दांत केले आहे. त्या म्हणतात, 'One day, in the absence of her husband, Bahinabai goes to pilgrim quarters and meditates continuously for three days. At the end of the meditation, she felt as though Tukaram himself had placed his hand on her head, blessed her and asked her to compose. It was a transcendental event for her. Overjoyed, she went to bathe in the river and as she came out, words flowed from her mouth. With the blessings of Tukoba, she got full inspiration to compose devotional songs. She began composing abhangas on spiritual subjects.'[१३]

बहिणाबाईंचे येथपर्यंतचे चरित्र पाहिल्यास त्यांच्यातल्या प्रतिभेचा, आध्यात्मिकतेचा सुप्तावस्थेकडून जागृतावस्थेकडे होणारा प्रवास दृष्टोत्पत्तीस पडेल. एका सर्वसामान्य संसारी गृहिणीचे असामान्य संत कवयित्री म्हणून नावलौकिकास येणे ही रोमांचक गोष्ट आहे. त्यांनाच अज्ञात असलेली काव्याची देणगी तुकोबाकृपेने प्रगट झाली. संत बहिणाबाईंच्या विचारांना काव्याची दिशा मिळाली.

'तीर्थक्षेत्रांचा सहवास हा बहिणाबाईंच्या जीवनात कायम होता, असे दिसून येते; पण त्यातही खडतर जीवन आणि संकटेही लिहिली होती, असे वाटते. संत तुकारामांच्या संगतीत त्यांच्या कीर्तनातून मिळणारा आनंद उपभोगत असताना संत तुकारामांना छळणाऱ्या महाभागांनी या स्त्रीची योग्यता ओळखली, म्हणूनच काय तिलाही त्यांच्याबरोबर त्रास द्यावयास सुरुवात केली. तिच्या लोकप्रियतेमुळेच पतिदेवाचे मन कलुषित झाले. संकटांची परंपरा सुरू होती, तीच पुढे चालू राहिली. पतित्यागाची टांगती तलवार होतीच; परंतु यातून मार्ग निघाला. पतीच्या आजारपणात त्याची सेवा करून त्याचे मन वळविले. इतकेच नाही तर त्यासही भक्तिमार्गास लावले. खऱ्या

अर्थाने भक्तिमार्गाचा संसार सुरू झाला. संसारात राहूनही भक्तिधर्माची पताका आपल्या गुरूच्या आशीर्वादाने कायम उंच ठेवली.'[१४]

असे हे बहिणाबाईंचे रोमांचक चरित्र पूर्णतः कळू शकत नाही, कारण त्यांनी स्वतःचे चरित्र लिहिले नसून त्यांच्या आत्मचरित्रपर अभंगांतून उपलब्ध माहिती आपल्यासमोर येते; परंतु यापुढील चरित्रात्मक अभंग मात्र उपलब्ध नाहीत. शेवटी एकदम बहात्तराव्या वर्षानंतरचे अभंग उपलब्ध आहेत. त्यामुळे मधल्या काळातील चरित्राचा भाग स्पष्ट होऊ शकत नाही. कदाचित एकदा ब्रम्हज्ञान प्राप्त झाल्यानंतर बहिणाबाईंच्या आयुष्यात पुढे काही विशेष घडले नसावे, किंवा संसारव्यापात गुरफटल्यामुळे लिखाणाचा भर ओसरला असावा. कारण काहीही असले, तरी त्यांच्या जीवनातील मध्यकालीन चरित्राचा भाग उपलब्ध अभंगांच्या आधारे पहावयाचा ठरवला, तर काही तर्क करावे लागतील.

तुकारामांचा प्रत्यक्ष वरदहस्त बहिणाबाईंना शके १५७१ च्या सुमारास लाभला असावा. त्यानंतर लगेचच म्हणजे फाल्गून वद्य द्वितीया शके १५७२ मध्ये तुकोबांचा सदेह वैकुंठगमनाचा अभूतपूर्व प्रसंग घडला. परंतु बहिणाबाईंच्या काव्यात या महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेखही नाही. त्याअर्थी तुकोबांच्या निर्याणप्रसंगी बहिणाबाई देहूस नव्हत्या, हे उघड आहे. त्यापूर्वीच त्यांनी देहू सोडले असावे, याची तीन प्रमुख कारणे संभवतात. पहिले म्हणजे त्या ज्याकरिता कोल्हापूरहून देहूस आल्या, ते सद्गुरूचे दर्शन व त्यांचा वरदहस्त लाभला. आता त्यासाठी तेथे राहण्याची गरज नव्हती. दुसरे म्हणजे देहूस येताच काशीचा जन्म झाला होता, त्यानंतर दीड-दोन वर्षांत बहिणाबाई पुन्हा गरोदर होत्या. देहूसारख्या लहानशा खेडेगावात वाढत्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण होते. तिसरे म्हणजे मंबाजी गोसाव्याचे छळणे कमी होत नव्हते. अशा या कारणांमुळे बहिणाबाई व त्यांच्या कुटुंबीयांनी देहू सोडले असावे आणि त्यांचे मूळ गाव शिऊर येथे येऊन ते स्थायिक झाले असावेत.

रत्नाकर पाठकांची स्थावर मिळकत त्यांचे मूळगाव शिवपूर उर्फ शिऊर येथे होती. सुमारे चौदा वर्षांच्या भ्रमंतीनंतर रत्नाकर पाठक बहिणाबाईंना घेऊन स्वगृही परत गेले. तेथे त्यांनी मूळचा भिक्षुकीचा आणि ज्योतिषाचा व्यवसाय बरीच वर्षे केला असावा. बहिणाबाईंसोबत त्यांचे आईवडील व भाऊ होते. भाऊ बहिणाबाईंच्या पाठचाच असल्यामुळे तोही कर्तासवरता झाला असणार. त्यामुळे बहिणाबाईंचे आईवडील व भाऊ परत

देवगावी गेले असावेत. अद्यापही त्यांचे माहेरचे वंशज औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील देवगाव (रंगारी) येथे नांदत आहेत.

शिऊरला आल्यावर बहिणाबाईंचे दुसरे अपत्य विठोबा याचा जन्म झाला. येथून पुढे बहिणाबाईंचा संसार पती व मुलांसमवेत सुखाचा गेला असावा. निर्याणपर अभंगात त्यांनी पतीचे स्मरण केले आहे. त्याअर्थी ते बहिणाबाईंच्या आधी निवर्तले असावे.त्यांच्या वयातही बरेच अंतर असल्यामुळे शिऊरास ते आले तेव्हा पन्नाशीचे असावेत. रत्नाकर पाठक निवर्तल्यानंतर बहिणाबाईंवर घराची जबाबदारी येऊन पडली असणार. पुढे विठ्ठलाचेही त्या काळानुसार लवकरच लग्न झाले असावे. बहिणाबाईंनी आपल्या सुनेचे नाव रुक्मिणी ठेवले असा उल्लेख आहे. त्यांना दीर्घायुष्य लाभल्याने नातवंडांचेही सुख उत्तरआयुष्यात त्यांना लाभले असावे.

अर्थात हा सगळा तर्काचा भाग आहे. बहिणाबाईंच्या आयुष्याच्या मध्यकालातील चरित्राचे वर्णन करणारे अभंग त्यांनी लिहिले असतीलही; परंतु ते गहाळ झाले असण्याची शक्यता आहे. आपल्या चरित्राचा बारीकसारीक तपशील देणाऱ्या बहिणाबाई या भागाचे वर्णन का करीत नाहीत याचे स्पष्टीकरण मिळत नाही; म्हणूनच जिज्ञासूंना वरील तर्कानुसारच समाधान करून घ्यावे लागते.

मृत्यूपूर्वी अठरा दिवस अगोदर बहिणाबाईंना आपला मृत्युकाल समजला होता. योगायोगाने त्यांची सून रुक्मिणी हिचाही त्याच काळात मृत्यू झाला. विठ्ठल आपल्या पत्नीचे क्रियाकर्म करण्यासाठी शुक्लेश्वर येथे गेलेले होते. बहिणाबाईंनी आपला मृत्युकाल पुत्राला सांगितला नाही, कारण आधीच पत्नीवियोगाने व्यथित झालेले विठ्ठल मातेचाही वियोग होणार, हे ऐकून कोसळलेच असते. पत्नीचे उत्तरकार्य झाल्यावर बहिणाबाईंनी विठ्ठलास पत्र पाठवले. 'आजपासून पाच दिवसांनी म्हणजे अश्विन शुद्ध १ शके १६२२ रोजी आपण देह ठेवणार', असे त्यात लिहिले. गोदातीरी शुक्लतीर्थाला गेलेल्या विठ्ठलांना रुक्मिणीचा तेरावा दिवस होताच परत येण्यास बजावले.

विठ्ठलांना पत्र मिळाले. वाचून ते अतिशय सद्गदित झाले; परंतु आधल्या रात्रीच त्यांना स्वप्न पडले होते, की आपल्या आईचा निर्याणकाल जवळ आला असून तिला नेण्यासाठी वैकुंठाहून विमान आले

आहे. मंगल वाद्ये वाजत आहेत. त्यामुळे आपल्या आईच्या निर्याणसमयी आपण जवळ असावे, या हेतूने ते तात्काळ शिऊर येथे जाण्यास निघाले. जाण्यापूर्वी शुक्लेश्वराजवळ आईच्या समाधीसाठी एक ठिकाण नक्की केले.

घरी पोचताच आईला वंदन करून विठ्ठलाने सांगितले की, 'तुझ्यासाठी शुक्लेश्वराजवळ समाधी-स्थळ ठरविले आहे.' त्यावर बहिणाबाई म्हणाल्या, 'तेथपर्यंत जाण्याइतका अवसर मजजवळ नाही. आता फक्त तीनच दिवसांचा अवधी राहिला आहे. शुक्लेश्वर मोठे तीर्थ असले तरी शिवपूरचे (शिऊर) महत्त्वदेखील काही कमी नाही. रावणाने येथेच अनुष्ठान करून शंकरास प्रसन्न करून घेतले. याच पवित्र स्थानी मी समाधी घेण्याचे ठरविले आहे.' बहिणाबाईंनी विठ्ठलाला असे म्हटले; परंतु विठ्ठलाच्या इच्छेचा अनादर केल्याची रुखरुख त्यांच्या मनाला लागली. त्याला समजाविण्याच्या हेतूने त्या म्हणाल्या, 'आत्मज्ञानरूपी तीर्थात न्हाऊन मी आधीच मुक्त झाले आहे. तेव्हा शुक्लेश्वरी जाता येत नाही, म्हणून वाईट वाटून घेऊ नकोस.'

'आत्मज्ञाना ऐसे तीर्थ कोण दुजे । ज्ञानिया उमजे पूर्व पुण्ये ।।
जेथे हे मानस केले असे शुद्ध । तीर्थ हे प्रसिद्ध वेदशास्त्री ।।'
(अभंग क्र. १७९ ओ. १, २)

'आता तीनच दिवस राहिले आहेत. तुला काही विचारावयाचे असल्यास विचारून घे. मागील बारा जन्म आपण सोबत होतो. आणखी पाच जन्मांनंतर तू मुक्त होशील. माझा आता यापुढे जन्म नाही.' हे ऐकून विठ्ठल विस्मयचकित झाले. ते म्हणाले, 'तू माझी माता आणि गुरू आहेस. माझ्या शंकांचे तूच समाधान करू शकतेस. तुझे बारा पूर्वजन्म कोणते होते, हे कृपाकरून मला सांग.'

बहिणाबाईंनी पुढीलप्रमाणे आपले बारा जन्म कथन केले. एकूण तीनशे एक्कावन्न वर्षांत त्यांचे बारा पुनर्जन्म झाले होते. हे सर्व जन्म स्त्रीचेच होते. पहिल्या जन्मात तापीतीरी बेटाऊद गावी केदार नामक एक शिवभक्त वैश्य होता. त्यास संतती नसल्यामुळे त्याने शंकराचे अनुष्ठान केले. शंकराने स्वप्नांत दृष्टांत देऊन त्यास सांगितले, की ह्या जन्मी तुझ्या नशिबी पुत्रसंतती नाही. एक सुंदर मुलगी तुला होईल. मुलीचे नाव वारुणी असे ठेव. ही मुलगी फक्त तेरा वर्ष जिवंत राहील. केदारवैश्यांची रूपवंती नामक पत्नी पतिव्रता होती. तिच्या उदरात महारुद्राच्या प्रसादाने यथाकाळ एका कन्येच्या

रूपाने बहिणाबाईंचा पहिला जन्म झाला. तिचे नाव वारुणी ठेवण्यात आले. शंकराच्या भक्तीशिवाय वारुणीला काहीच प्रिय नव्हते. तिच्या वयाच्या तेराव्या वर्षी केदारवैश्यांच्या गुरूकडे सेवकाशी वारुणीची ओळख झाली. हा सेवक म्हणजे बहिणाबाईंच्या शेवटच्या जन्मातील पुत्र विठ्ठलच होय. पुढे थोड्याच दिवसांत वारुणी मरण पावली. त्या काळानुसार विवाहयोग्य वय होऊनही ती अविवाहित स्थितीतच मरण पावली. अल्पायुषी असल्याने त्या मुलीचे लग्न न करण्याविषयी त्यांच्या गुरूने सांगितले होते.

बहिणाबाईंचा दुसरा जन्म फल्गू नदीतीरी कुमचक्र गावी सात्त्विक नामक वैश्याच्या पोटी झाला. हा वैश्यही मोठा शिवभक्त आणि विरक्त आत्मवेत्ता होता. त्यांचा गुरू सुवर्णा नामक ब्राम्हण होता. तो आगमाचा ज्ञाता असून पूर्ण आत्मज्ञानी व मंत्रविद्याप्रवीण होता. त्यावेळी बहिणाबाईंचा मुलगा विठ्ठल हा सुवर्णा ब्राम्हणाचा शिष्य होता. सात्त्विक वैश्यास सात पुत्र होते; परंतु कन्या नव्हती. कन्याप्राप्तीसाठी त्याच्या गुरूने त्याला वैष्णवी मंत्रोपासनेचा अनुष्ठानविधी सांगितला. त्याप्रमाणे अनुष्ठान केल्यावर सात्त्विक वैश्यास स्वप्नात 'तुला सुशील कन्या होईल व तिच्या हातून तुला द्रव्यप्राप्ती होईल. ही कन्या तुजपाशी अठ्ठावीस वर्षे राहून ईश्वरसेवा करील', असा दृष्टांत झाला. त्यानंतर बहिणाबाईंनी त्या वैश्याच्या घरी दुसरा जन्म घेतला. तेथेही त्यांची विठ्ठलाशी भेट झाली होती. त्या जन्मी अठ्ठावीस वर्षे ईश्वरसेवा करून त्यांनी देहत्याग केला.

तिसऱ्या जन्मी गोदावरीकाठी ब्रम्हगिरी येथे वर्धमानशेटी नामक एका धनाढ्य वैश्याच्या घरी बहिणाबाईंचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव भामिनी होते. बहिणाबाईंना चार भावंडे असून विठ्ठल हा त्यापैकीच एक होता. बहिणाबाईंच्या जन्मापूर्वी वर्धमानशेटी स्थानभ्रष्ट झाल्यामुळे त्यांनी पांचाळेश्वरी जाऊन मोठे यज्ञानुष्ठान केले होते. त्या अनुष्ठानानंतर लगेचच बहिणाबाईंचा जन्म झाला होता. त्यांचे नाव हेमकळा ठेवण्यात आले होते. कन्या झाल्यामुळे वर्धमानशेटीस खूप आनंद झाला. त्याने भरपूर दानधर्म केला. पुढे हेमकळा वयात आल्यावर शेटीने तिच्या लग्नाचा विचार मांडला. तोच त्याच्या पत्नी भामिनीला स्वप्न पडले, की या मुलीचे लग्न करू नये. स्वप्नाला प्रमाण मानून शेटीने तिच्या लग्नाचा विचार सोडून दिला. हेमकळेने आपले पुढचे आयुष्य रागकळा नामक ब्राम्हणाच्या सेवेत आणि हरिस्मरणात घालविले. रागकळा ब्राम्हणाच्या घरी विठ्ठलही राहत असे. हेमकळा त्याला

आपले हितगूज सांगत असे. वयाच्या चोविसाव्या वर्षी ईश्वरसेवा करीतच हेमकळेने देह ठेवला. अशारीतीने बहिणाबाईंचे तीन जन्म वैश्यांच्या घरात झाले.

चौथा, पाचवा, सहावा व सातवा हे बहिणाबाईंचे जन्म योगभ्रष्टावस्थेत गेले. या जन्मांचा वृत्तांत बहिणाबाईंनी ज्या अभंगांत सांगितला आहे, ते संदिग्ध असल्यामुळे त्यावरून स्पष्ट अर्थबोध होत नाही. हे अभंग असे -

'चौथा जन्म सांगों पाचवा सहावा । आणि सातवा तो योगभ्रष्ट ।। ....
... देखोनी तयासी करी नमस्कार । जाणुनी संस्कार कृपा केली ।।'
(अभंग क्र. १८६ ओ. १ ते ६)

ह्या अभंगांत वर्णिलेली हकिकत कोणत्या जन्माची आहे, हे बरोबर समजत नाही; कारण बहिणाबाई पुढे म्हणतात, 'सातवे जन्मीचा सांगेन वृत्तांत । मागिलाचा प्रांत सांडियेला ।।' याचा अर्थ 'आता सातव्या जन्माचा वृत्तान्त सांगते. त्यापूर्वीच्या चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या जन्माचा वृत्तांत सोडून देऊ.' असे म्हणून बहिणाबाई पूर्वी दिलेल्या अभंगातला कथाभाग पुन्हा सांगतात, ते अभंग असे -

'परी गौळियांचे घरी गायीचे रक्षण । करुनी कीर्तन देह पोषी ।।.....
... बहेणि म्हणे जन्म पुढे उरले साही । प्रसंगेची तेही सांगतसे ।।'
(अभंग क्र. १८६ ओ. ८ ते १४)

या चारही जन्मांत बहिणाबाई अविवाहित राहिल्या असाव्यात असे वाटते. त्यांची आध्यात्मिक उन्नती मात्र एकसारखी चालू होती.

आठव्या जन्मी बहिणाबाई वेरुळ येथील धर्मक्षेत्र नामक एका शास्त्रज्ञाच्या पोटी जन्मास आल्या. धर्मक्षेत्र समर्थ विद्वान होता. त्याला लोक फार मान देत असत. त्याची पत्नी पतिव्रता होती. तिची कन्या म्हणून बहिणाबाईंचा जन्म झाल्यावर त्यांनी वयाची अठरा वर्षे भागवत श्रवणात घालविली. या आठव्या जन्मी बहीणाबाईंचे लग्न झाले होते. त्यांचा भ्रतार मात्र लवकरच निवर्तला. बहिणाबाई म्हणतात, 'ही गोष्ट पारमार्थिकदृष्ट्या माझ्या पथ्यावरच पडली.' त्यामुळे बहिणाबाईंना या जन्मीही आध्यात्मिक उन्नतीला बराच वाव मिळालेला दिसतो.

बहिणाबाईंचा नववा जन्म त्याच ठिकाणी त्याच आईवडिलांच्या पोटी झाला. दहावा जन्म कौशिक नामक अग्निहोत्री

ब्राम्हणाच्या घरी झाला. तेथे त्यांना नित्य हरिकथा वेदांत ऐकावयास मिळत असत. शिवालयाचे नित्य दर्शन, तेथे होणारी सेवा यांमुळे या जन्मी बहिणाबाईंना बरेच आत्मज्ञान मिळालेले दिसते. तेथे काही काळ घालविल्यावर पित्याने त्यांचे लग्न लावून दिले. त्यांचा पती ब्राम्हण असून भिक्षेवर उपजीविका करणारा होता. त्यांच्या घरी गायही होती. या गाईची सेवा बहिणाबाई करीत असत. या जन्मी बहिणाबाई बेचाळीस वर्षे जिवंत राहिल्या. त्यांना तीन पुत्र झाले. त्यातला एक म्हणजे विठ्ठल होय. या जन्मी बहिणाबाईंचा व विठ्ठलाचा गुरू एकच होता. त्याचे नाव केशव होय.

अकराव्या जन्मी बहिणाबाईंनी गोकर्ण व सगुणा यांच्या पोटी जन्म घेतला. त्यांचे नाव सौजिन्या ठेवण्यात आले होते. गोकर्ण हे माध्यंदिन ब्राम्हण असून गोदातीरी प्रवरासंगमी अयाचित वृत्तीने राहत होते. त्यांच्या घरी येणाऱ्या प्रत्येक अतिथीला ते अन्नदान करीत असत. त्यांच्या स्वभावात शांती, क्षमा आदी गुणांचा अंतर्भाव होता. सौजिन्या सात वर्षांची होताच एका ज्ञानी व योगी पुरुषाशी तिचे लग्न झाले. तो विरक्त योगाभ्यासी असून त्याला सर्व सिद्धी अनुकूल होत्या. त्या पुरुषाचे नाव योगेश्वर. सौजिन्येने त्याची उत्तम प्रकारे सेवा करून त्याला संतुष्ट केले. तेव्हा त्याने तिला योगाचे आसन शिकविले. या जन्मीही विठोबा बहिणाबाईंचा पुत्र होता.

बहिणाबाईंचा बारावा जन्म लाखखणी नामक गावी झाला. साडेतीन नद्यांपैकी शिवनदाचे तीरी महाउग्र संगमस्थळी हे गाव असून तेथे एक अनुष्ठानी ब्राम्हण राहत असे. त्याचे नाव रामचंद्र आणि त्याच्या पत्नीचे नाव जानकी होते. या दाम्पत्यास दोन पुत्र आणि तिसरी कन्या म्हणजे बहिणाबाई होती. ही कन्या बाळपणी मुळीच बोलत नसे. त्यामुळे या मुलीस वाचाच नाही असे लोक म्हणत असत. त्या मुलीचे लग्न एका जोतिषी ब्राम्हणाशी करण्यात आले. त्या ब्राम्हणास गणपती प्रसन्न असून तो त्याच्याशी प्रत्यक्ष बोलत असे, असे बहिणाबाईंनी म्हटले आहे. त्या जन्मात पतीची सेवा करून बहिणाबाईंनी बरेच पुण्य प्राप्त केले. त्यांचा पती भक्तिपरायण वृत्तीचा होता. बहिणाबाईही त्याच्या समवेत राहून परमार्थात रमल्या होत्या. या जन्मात बहिणाबाईंनी छत्तिसाव्या वर्षी देह ठेवला. याच जन्मात बहिणाबाई मुक्त व्हावयाच्या होत्या; परंतु काही भोक्तृत्व शेष राहिल्यामुळे त्यांना तेरावा जन्म घ्यावा लागला.

अशाप्रकारे आपल्या बारा पूर्वजन्मांचा इतिहास बहिणाबाईंनी आपल्या तेराव्या जन्मात आपल्या पुत्राला, विठ्ठलाला सांगितला. मागील सर्व जन्मांचा वृत्तांत बहिणाबाईंना आकाशातील प्रतिबिंबाप्रमाणे अगदी स्पष्ट दिसत होता. इतकेच नव्हे तर तेरा जन्मांपूर्वीच्याही अनेक जन्मांची त्यांना आठवण होती.

'विवेक ते शस्त्र अनुभव अंगीचा । असेल तो साचा अर्थ जाणे ।।
अवघेचि ते जन्म ते आठवती मज । अंतरीचे गुज मृत्यू-वेळा ।।
आरसियात जैसे दिसे प्रतिमुख । तैसे जन्म देख दिसती डोळा ।।
लटिकेचि शब्द व्यवहारी मानीती । मूर्ख तयांप्रती बोलो नये ।।
(अभंग क्र. १९० ओ. ३ ते ६)

बहिणाबाई पुढे म्हणाल्या, 'आता वेळ फार कमी असल्यामुळे घाईघाईत जेवढे होईल तेवढे मी सांगते. तरी बऱ्याचशा गोष्टी सांगायच्या राहून जातील. आकाशाचे प्रतिबिंब जसे पाण्यात दिसते, आरशात जसे आपले मुख दिसते, तसे माझ्या डोळ्यांसमोर मला माझे प्रतिबिंब दिसत आहे. तरी बऱ्याच लोकांना या गोष्टी खोट्या वाटण्याचा संभव आहे. अशा मूर्ख लोकांशी आपण बोलूच नये.'

आपण जे सांगतो आहोत, त्यावर व्यवहारी लोक विश्वास ठेवणार नाहीत, याची कल्पना बहिणाबाईंना अगोदरच आलेली होती, म्हणूनच आपल्या पुत्राला त्या अशा लोकांकडे दुर्लक्ष करावयास सांगतात. आपल्याला या गोष्टींचे ज्ञान कसे झाले हे सांगताना त्या म्हणतात, 'बहेणी म्हणे देव कृपा करी जेव्हां । सर्वही ते तेव्हा कळे मनी ।।' भगवंताची कृपा झाली म्हणजे सर्व गोष्टींचे ज्ञान आपोआप होते असा त्यांचा विश्वास आहे.

अशाप्रकारे सर्व इतिहास सांगितल्यावर बहिणाबाई शेवटी विठ्ठलास म्हणतात, 'चालू जन्मातली बहात्तर वर्षांची आयुर्मर्यादा आज या सिद्धासनी पूर्ण झाली. आता माझे देहावसान होण्यास फक्त सोळा प्रहरांचा अवधी राहिला आहे. माझ्या पूर्वजन्मांप्रमाणेच माझा मृत्युकाळही मला अठरा दिवस आधीच समजला होता; परंतु तुला दुःख होईल म्हणून मी त्याची वाच्यता केली नाही. रूक्मिणीचे क्रियाकर्म पूर्ण झाल्यावर तुला पत्र पाठवून बोलावून घेतले, कारण मला हा सर्व वृत्तांत कथन करावयाचा होता. मला ज्या गोष्टी आठवल्या त्या मी तुला कवितारूपाने कथन केल्या. यांत जर काही अशुद्ध आढळले तर ते सवडीप्रमाणे मागाहून दुरुस्त करून घे.'

पुढे त्या म्हणतात, 'मनुष्याने मृत्युसमयी आत्मनिष्ठ बोध राखून सावध असावे असे 'गीते'त भगवंताने सांगितले आहे. ती स्थिती आज मला प्राप्त झाली आहे. माझ्या देहात आता अग्नीचे बळ असून हृदयात जोती तेवत आहेत. माझा मृत्यू शुक्लपक्षात दिवसा आहे. हल्ली उत्तरायण नाही हे एक थोडेसे व्यंग आहे; परंतु सद्‌गुरूची कृपा असल्यावर उत्तरायाणाची काय जरूरी? उत्तराभिमुख आसन घालून प्राण निरोधन करून मी बसले आहे. सद्‌गुरुस्मरणाच्या योगाने पाचही योगांची सिद्धी मला झाली आहे. प्रपंचविमुक्त असलेल्या मनुष्याला उत्तरायणाचे महत्व नाही. ज्याचे मानस सदा प्रपंचाभिमुख असेल त्याला नेहमीच दक्षिणायन असते, हे वेदशास्त्रसंमत आहे. माझाही अनुभव असाच आहे. अजूनही मला काही जन्म आठवत आहेत; परंतु मृत्युकाळ जवळ येत चालल्यामुळे या जन्मांचा वृत्तांत सांगण्यास आता अवकाश नाही. विरक्ती आणि वैराग्य यांच्या योगाने माझी मनोभूमिका शुद्ध झाली असून वृत्ती तदाकार झाल्या आहेत. विवेकाच्या योगाने विदेही दशा मला प्राप्त झाली आहे.

अशाप्रकारे आपली स्थिती विशद करून बहिणाबाई आपल्या पुत्रास पुढे म्हणतात, 'तूही या जन्मात पुष्कळ ज्ञान मिळवशील. यापुढे तुला एकाहून एक श्रेष्ठ जन्म मिळून योगभ्रष्ट स्थितीत तू काही दिवस घालवशील. तुझे तीन जन्म काशीक्षेत्रात होतील. एक जन्म संन्याशाचा असेल. त्या जन्मात थोडेसे चित्तस्थैर्य प्राप्त होईल. पाचव्या जन्मी तुला वयाच्या अठराव्या वर्षी तुला विदेहावस्था प्राप्त हाईल आणि पुढे जन्म होणार नाही.'

'आपुले मरण पाहिले म्या डोळा ।' असे तुकाराम महाराजांनी म्हटले होते. येथे बहिणाबाईंचीही हीच अवस्था झालेली दिसते. मृत्यू म्हणजे शरीरांतर अशी पूर्ण भावना होऊन ज्यांचे मृत्यूभय अगदीच नाहीसे झालेले असेल अशाच मनुष्यांची चित्तवृत्ती मृत्युसमयी स्थिर असते. म्हणूनच बहिणाबाई आपला मृत्युकाळ जवळ आला असतानाही अतिशय शांतपणे आपले आणि विठ्ठलाचे सर्व जन्म व्यवस्थित सांगू शकतात. त्याचप्रमाणे स्वतःच्या मृत्यूचेदेखील वर्णन करतात.

'सद्‌गुरू वोवाळा वोवाळा । उजळुनी निज-ज्योतिज्वाळा ।।
पिंड हारपला पिंडी । तेज व्यापिले ब्रह्मांडी ।।
शांतिसुखाचे आसन । अद्वय बोधाचे पूजन ।।
चिद्‌घन चिदानंदगाभा । सच्चिदानंद निजप्रभा ।।

तेज प्रकाशले लोचनी । बहेणि हारपली चिद्‌घनी ।।'

(अभंग क्र. २०५ ओ. १ ते ५)

अशाप्रकारे आपला शेवटचा प्रवास कथन करून बहिणाबाई समाधिस्थ झाल्या.

बहिणाबाईंचे चरित्र पाहिल्यावर मराठी वाङ्‌मयप्रांतात त्यांच्या पदरी उपेक्षा का आली, हा प्रश्न पडतो. केवळ मराठी वाङ्‌मयातच नव्हे, तर वारकरी संप्रदायातही त्यांचे स्थान कळसाच्या वरील 'फडकत्या ध्वजे'चे असले, तरी म्हणावे तितके महत्त्व त्यांना अद्यापही दिले गेले नाही. 'प्राक्‌कालीन पुंडलीकापासून तो अर्वाचीन निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, एकनाथ, तुकाराम व निळोबा हे मुख्य मान्य संत. 'वेद', 'भगवद्‌गीता', 'श्रीमद्‌भागवत', 'ब्रह्मसूत्रे', 'स्मृति', 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव', 'चांगदेवपासष्टी', 'एकनाथी भागवत', 'भावार्थ रामायण', 'रुक्मिणी स्वयंवर' आणि ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम व निळोबा ह्यांच्या अभंगगाथा हे मान्य ग्रंथ.'[१५] बहिणाबाईंच्या गाथेला का मान्यता मिळू शकत नाही? शासनातर्फे ती प्रकाशित का होऊ शकत नाही? वारकरीही तुकोबांच्या कळसावर आरूढ ध्वजेकडे का नजर टाकीत नाहीत? असे प्रश्न साहजिकच पडतात. बहिणाबाईंची परंपराही पुढे फारशी फोफावलेली दिसत नाही. डॉ. सदानंद मोरे यांच्या मते, 'तुकारामोत्तर वारकरी संप्रदायाला बहिणाबाई पचनी पडली, असे मात्र म्हणता येत नाही. यामागच्या कारणांचा शोध घेतला पाहिजे. पुरुषकेंद्रित समाजरचना, बहिणाबाईंच्याच शिऊर या गावातील शंकरस्वामी यांजकडे नळोबारायानंतर नेतृत्व जाणे, अशी काही संभाव्य कारणे दिसतात.'[१६] असे असले तरी मराठीतील आद्य स्त्री आत्मचरित्रकार संत बहिणाबाईंचे अभंगरूपाने साकारलेले चरित्र अनमोल आणि अद्वितीय असे आहे.

# ३. बहिणाबाईंचे माहेर : देवगाव :

बहिणाबाईंच्या आत्मचरित्रपर अभंगांत त्यांच्या माहेरचे - देवगावचे वर्णन येते, ते देवगाव आजही अस्तित्वात आहे. गेल्या तीनशे वर्षांत त्याची खूप प्रगती झाली, कायापालट झाला असे म्हणता येत नाही. तत्कालीन बहिणाबाईंची पावनभूमी देवगाव आजच्या घडीला कोणत्या स्थितीत आहे, हे पाहणेही संशोधकदृष्टीला गरजेचे वाटते.

महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यात जगप्रसिद्ध वेरुळ लेण्या आहेत. तेथून कन्नडला जाण्याच्या राजमार्गावर एक छोटेसे गाव वसले आहे. नाव त्याचे देवगाव (रंगारी). औरंगाबादपासून तासाभरातच कन्नड तालुक्यात वसलेले हे गाव एस.टी. बस अथवा स्वतःच्या वाहनाने गाठता येते. या गावाची लोकसंख्या सुमारे १२००० असून गावात एक पेट्रोलपंप, दोन हायस्कूल, एक कन्या शाळा आणि एक कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय आहे.

बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणेच गावाच्या नावात देव आहे. सर्व देवांनी येथे वस्ती केली, म्हणून या गावाचे नाव 'देवगाव' पडले, अशी ग्रामस्थांची श्रद्धा आहे. गावाच्या पश्चिमेकडून 'शिवना' अथवा 'शिवानद' नावाची नदी आहे. तिच्या काठावर हे गाव वसले आहे. वेळगंगा व कोकडी या दोन नद्यांचा संगम देवगाव येथे झाला आहे. गावाजवळच असलेल्या 'सातमाळ' डोंगराच्या अस्तित्वाने गावाच्या निसर्गसौंदर्यात भर पडली आहे.

या गावाच्या किंवा क्षेत्राच्या पावित्र्यासंबंधी एक कथा सांगितली जाते. महर्षी अगस्ती ऋषी दक्षिणेकडे जावयास निघाले, तेव्हा त्यांनी देवगावी मुक्काम केला आणि येथे चातुर्मास घालविला. गावाला लागूनच येथील नदीवर एक तीर्थ आहे. अशा या पवित्र स्थळी अगस्ती ऋषी अनुष्ठानार्थ नियमितपणे सूर्योदयास येत असत. या तीर्थाजवळच्या परिसराला 'लाक्षाग्राम' म्हटले जाते. त्या ठिकाणी लक्ष तीर्थांचा निवास आहे, असे मानतात. या ठिकाणी स्नान, दान व जप केल्याने सिद्धी प्राप्त होते, असा वर मिळाला असल्याची श्रद्धा आहे. बहिणाबाईंच्या मातापित्यांनी संतानप्राप्तीसाठी याच लक्षतीर्थावर स्नान करून अनुष्ठान केले होते, असा उल्लेख बहिणाबाईंच्या अभंगात येतो.

नदीच्या काठाकडे पाठ करून बहिणाबाईंचे जन्मस्थळ असलेला वाडा जीर्ण झालेल्या अवस्थेत आहे. 'चार चार फूट रुंदीच्या भिंती

आपले गतकाळाचे वैभव सांगत आहेत. संत कवयित्रीची पहिली वाणी त्याने आपल्या मनात साठवली आहे. याची जाणीव त्याच्याकडे पाहिले म्हणजे होते. याच वाड्याच्या काही अंतरावर विठ्ठल मंदिर आहे. या मंदिराच्या गर्भगृहात विठ्ठल-रुक्मिणीच्या काळ्या पाषाणाच्या मूर्ती आहेत. त्याच्या पाठीमागे महिरप आहे. याच विठ्ठलाला उद्देशून बहिणाबाईंनी काही अभंग त्याच्यासमोर गाईले असतील. आपल्या अभंगवाणीने तृप्त झालेल्या विठ्ठलाच्या आनंदी वृत्तीच्या छटा आजही भक्तांना अनुभवयास मिळताना दिसतात.'[१७] मंदिराच्या साध्या नक्षीच्या प्रवेशद्वारातून आत प्रवेश केला म्हणजे गर्भगृहातील विठ्ठलाची मूर्ती नजरेस पडते. या मंदिराची बांधणी लाकडी असून साध्यासुंदर लाकडी खांबांवर माडी आहे. त्यावरूनही विठ्ठलाचे दर्शन सहजगत्या होते.

बहिणाबाईंच्या जन्मघरात त्यांच्या संगमरवरी कोरीव पादुकांचे मंदिर आहे. येथे बहिणाबाईंच्या पादुका आहेत, म्हणून त्याला मंदिर म्हणतात. वै. सोनोपंत दांडेकर यांच्या प्रेरणेने बहिणाबाईंच्या संगमरवरी पादुकांची स्थापना पंढरपूरचे ह.भ.प. तात्यासाहेब वासकर महाराज यांच्या हस्ते १९६८ साली करण्यात आली. तत्पूर्वीच दांडेकरांचे निधन झाले. वारकरी संप्रदायाच्या वासकर महाराजांनी या पादुकांची स्थापना केली आहे.

बहिणाबाईंच्या जन्मस्थळाला लागूनच प्राचीन शिवमंदिर आहे. या शिवमंदिराचा उल्लेखही बहिणाबाईंच्या काव्यात येतो. मंदिराच्या पडलेल्या खांबांच्या अवशेषांवरून हे मंदिर प्राचीन असल्याची साक्ष पटते. अकराव्या-बाराव्या शतकातील ते असावे. काकडा आरती पासून दिवसभर पूजाअर्चा या मंदिरात सुरू असते.

बहिणाबाईंचे माहेरचे वंशज शिक्षक असलेले श्री. शंकर उर्फ बापूराव गोपाळराव कुलकर्णी, श्री. सीताराम गोपाळराव कुलकर्णी अन्य मंडळी अत्यंत आत्मीयतेने येणाऱ्यांचे स्वागत करतात. त्यांना संपूर्ण माहिती पुरवितात. संपूर्ण कुटुंब एकत्रच राहते. श्री. सीताराम कुलकर्णी यांनी प्रबंधलेखिकेला दिलेल्या संदेशात ते म्हणतात, 'श्रीसंत बहिणाबाई आपल्या अभंगवाणीत सांगतात, देवगाव माझे माहेर सजणी. हे शब्द संतरूपी माहेर घर म्हणजे अखिल भारतातील वारकऱ्यांचे व संपूर्ण जगातील मानवाचे माहेर आहे व माहेर या शब्दाचा अर्थ करणे, ज्या वेळेस ती व्यक्ती माहेरी येईल, त्याची सेवा घडणे, हे आमचे कुलकर्णी परिवाराचे ध्येय आहे.' (दि. २-१०-२००५)

बहिणाबाईंच्या माहेरच्या वंशजांमध्ये आजही लिखाणकाम सुरू आहे. गोपाळराव कुलकर्णी यांनी अठरा पर्वांमध्ये लिखाण केले आहे. त्यांनी महाभारतावर एकूण ६६०९९ ओव्या लिहिल्या आहेत.

# ४. बहिणाबाईंचे सासर : शिऊर :

बहिणाबाईंच्या आत्मचरित्रपर अभंगांत त्यांच्या माहेरचे - देवगावचे जसे वर्णन येते, तसेच त्यांच्या सासरचे म्हणजे शिवूर अथवा शिऊरचेही वर्णन येते. शिवाय समजणाऱ्या वयात वास्तव्य असल्याने शिऊरचे उल्लेख त्यांच्या रचनांमध्ये अधिक येतात. औरंगाबाद जिह्यातील वैजापूर तालुक्यातील हे गावही मुख्य मार्गावर असून देवगावहून पुढे साधारणतः मोटारीने वीस मिनिटांच्या अंतरावर आहे. पूर्वी शिऊर बंगला या परिसरात 'गेस्ट हाऊस' होते. त्यामुळे त्याला 'बंगला' हे नाव पडले. मुख्य स्थळ शिऊर गाव आहे. अगोदर तिथे लोकसंख्या कमी असल्याने त्यास फाट्याचे स्वरूप होते व त्याला शिऊर फाटा म्हटले जायचे. आतामात्र ते एक मोठे गाव झाले आहे.

उत्तर महाराष्ट्राच्या दक्षिण कुशीत वसलेले हे खेडेगाव रम्य अशा तींयाजवळ आहे. तींयाला 'प्रणितातीर्थ' म्हटले जाते. प्रणितातीर्थाच्या काठावर वारकरी संप्रदायाचा मठ आहे. प्रणितातीर्थाला इतिहास आहे. पंचक्रोशीत महत्त्व असलेल्या या तीर्थाच्या पावित्र्याविषयी भक्तीची भावना आहे.

येथे रावणेश्वर महादेवाचे मंदिर आहे. रावणाने प्रणितातीर्थात स्नान करून पूजा बांधली होती, अशी मंदिराविषयी कथा सांगितली जाते. मंदिराला भव्य आवार आहे. उत्तर यादव काळातील हेमाडपंथी पद्धतीची बांधणी आहे. मंदिर सभागृहात अनेक कोनात बांधलेले शिखर आहे. मंदिरांच्या भिंतींना शिल्पविरहित सुरेख नक्षिकाम आहे. तीन बाजूस वर तीन कोनाडे आहेत. 'चौकोनी चौथऱ्यावर मंदिराची बांधणी आहे. त्यानंतर गजशिल्प पट्टीऐवजी तीन एकावर अेक असलेले शिखर आहे. त्याला तीन दिशांना नक्षीदार कोनाडे आहेत. उंच शिखर आहे. सभामंडपांचेही खांब रेखीव आहेत. प्रवेशद्वाराच्या भिंतीवरही मराठा पद्धतीचे शिल्प आहे. गाभाऱ्यात शिवपिंड आहे. याच शिवपिंडीवर बहिणाबाईने भक्तीने अभिषेक केला असेल. आपल्या अभंगवाणीने मंदिराच्या सभामंडपात भक्तिरसाचे पान भक्तजनांना केले असेल, असा हा रावणेश्वर.'[१८]

मंदिरापासून जवळच पाठकांचा वाडा आहे. ज्या वाड्यात बहिणाबाईंची तुकारामभक्ती रुजली, फुलली त्या या वाड्याचे महत्त्व

अनन्यसाधारण आहे. बहिणाबाईंचे समाधी मंदिर दगडी भिंतींनी बांधलेले आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर शेजारी शेजारी दोन समाध्या आहेत. एक बहिणाबाईंची आणि दुसरी त्यांच्या पुत्राची म्हणजे विठ्ठलाची. या समाध्या म्हणजे देवड्या आहेत. म्हणजे छोट्याशा मंदिराच्या प्रतिकृती आहेत. एका चौकोनी चौथऱ्यावर चारही चारही बाजूंनी छोट्या भिंती बांधल्या आहेत. एका बाजूस दरवाजा आहे. आत पादुका ठेवल्या आहेत. वर निमुळते शिखर असून त्यावर कळस आहे. 'साध्या पद्धतीच्या समाधीत बहिणाबाई विसावली आहे. ही समाधीची जागा विचारपूर्वक निवडली आहे. शेजारील त्याच पद्धतीची बांधणी असलेली बहिणाबाईच्या पुत्राची समाधी आई आणि मुलाच्या समाधीच्या रूपात एकाच छताखाली असलेले वास्तव्य दुर्मिळ आहे. असे उदाहरण कदाचित हे एकमेव असावे.'[१९] बहिणाबाईंच्या समाधीजवळ वंशजांपैकी संन्यास घेतलेल्या मोहिनीराज पाठक यांचीही समाधी आहे.

बहिणाबाईंच्या समाधीचा जीर्णोद्धार औरंगाबादचे तत्कालीन न्यायाधीश श्री. बळवंतराव घाटे व श्री. कुबेरकर यांच्या प्रेरणेने शके १८७५ मध्ये वै. सोनोपंत दांडेकरांच्या हस्ते करण्यात आला होता. श्री. घाटे यांना तसा दृष्टांत झाला होता, असे वंशज सांगतात. आतापावेतो समाधी मंदिर १४ फूट लांब, १४ फूट रूंद व १५ फूट उंच होते. वृंदावन ४ फूट ६ इंच लांब व तितकेच रूंद असून ७ फूट उंच होते. आता या वर्षी म्हणजे इ.स. २००५ मध्ये जीर्णोद्धाराचे काम सुरू असून मंदिराचा पाया ११ फूट खोल घेतल्याने समाध्यांचा काही भाग आता ओट्यामध्ये दबला आहे. या मंदिराच्या पूर्वेस हनुमानाचे मंदिर आहे. पश्चिमेस रावणाने स्थापन केलेले रामेश्वराचे म्हणजे महादेवाचे मंदिर, दक्षिणेस दुर्गादेवीचे मंदिर तर उत्तरेस प्रणितातीर्थ आहे.

समाधी मंदिरासमोर विहीर आहे. ही विहीर तीर्थस्थळ मानली जाते. मंदिराच्या आवारात मोठ्या वृक्षाच्या छायेखाली पुरुषभर उंचीचे तुळशीवृंदावन आहे. फारसे नक्षी नसलेले परंतु रेखीव असे वृंदावन आहे. बहिणाबाईंनी तुळशीमाहात्म्यपर जे अभंग रचले, ते या वृंदावनाकडे पाहून सुचले असावेत.

बहिणाबाईंचे सध्याचे वंशज श्री. मधुकरराव पाठक संपूर्ण कुटुंबासह बहिणाबाईंच्याच वाड्यात राहतात. त्यांच्या पत्नी सौ. पुष्पा, अविवाहित कन्या शकुंतला आणि पुत्र विठ्ठल तेथे राहतात. मोठ्या मुलींचे

विवाह झाले आहेत. श्री मधुकरराव पूर्वी शाळेत शिक्षक होते. वडिलांचे पश्चात आता ते भिक्षुकीचा व्यवसाय करतात. पाच गावांची ते भिक्षुकी करतात. गोवत्ससेवेचे व्रत त्यांनी पाळले आहे. वाड्यात गायवासरू सांभाळले आहे. संस्थानाचे विश्वस्त व वंशज श्री. मधुकरराव पाठक येणाऱ्या अतिथींचे आदरपूर्वक स्वागत करतात, त्यांना हवी ती माहिती देतात. इ.स. १९८१ मध्ये पुण्यतिथी महोत्सवाचा व दिंड्यांचा प्रारंभ काशिनाथमहाराज मोगल यांनी केला. सध्या ही सेवा करणारे श्री. मधुसूदनमहाराज मोगल हेही आत्मीयतेने माहिती पुरवितात.

# ५. बहिणाबाईंची गुरुपरंपरा :

## ५.१. गुरुमहिमा :

कोणत्याही व्यक्तीने ग्रंथाध्ययन केले, परोक्षज्ञान मिळविले, योगाभ्यास केला, हे सर्व केल्यावर 'आता आपण ज्ञानाने परिपूर्ण झालो, आम्हाला कोणत्याही गुरूची गरज नाही' असे म्हटले, तर तो अहंकाराच्या जींयात गुरफटून रसातळाला जाणार, यात शंका नाही. सद्‌गरूवाचून जीव कृतार्थ होऊ शकत नाही. सद्‌गुरुप्रसादाशिवाय कोणाचाही परमार्ग सिद्ध झालेला नाही. गुरुकृपेवाचून रजतम धुतले जात नाही. ज्ञानाच्या म्हणजेच आत्मज्ञानाच्या ठिकाणी दृढतम निष्ठा उत्पन्न होत नाही. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

'शब्दजात आलोडिलें । अथवा योगादिक जें अभ्यासिलें ।
ते तैंचि म्हणो ये आपुले । जैं सानुकूळ श्रीगुरू ।।'
(ज्ञानेश्वरी - १०/१७२)

'ज्याची त्यालाच सर्व कमाई करावी लागते, हे खरे; पण श्रीगुरूच्या कृपेचे शिक्कामोर्तब पडल्याशिवाय ती कमाई भगवंताच्या दरबारी मान्य होत नाही. अत्यंत सूक्ष्म व निर्मळ बुद्धीने ज्ञान आकलन झाले, तरी दिव्याच्या पोटी काजळी तसा ज्ञानाच्या पोटी उत्पन्न होणारा अहंकार निःशेष घालविण्यासाठी सद्‌गुरूचे चरण अवश्य धरिले पाहिजे.'[२०]

प्रत्यक्ष श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण यांना गुरूशिवाय तरणोपाय लाभला नाही. तेथे इतर सर्व सामान्यजनांनी गुरूशिवाय मार्गस्थ होण्याचा विचारही करू नये, असा हा गुरुमहिमा आहे. वेद, शास्त्रे, पुराणे व संत या सर्वांनीच गुरूचा महिमा मुक्तकंठाने गायला आहे. 'क्षोत्रिय' म्हणजे श्रुतिशास्त्रनिपुण व 'ब्रम्हनिष्ठ' म्हणजे स्वानुभवसंपन्न अशा सद्‌गुरूला शरण गेले, म्हणजे ब्रम्हविद्येचा अनुभव येतो. अशा गुरूचा लाभ होणे, हे भक्तासाठी परमसौख्याचे होय. परमभाग्याने अशा सद्‌गुरूची गाठ पडताच त्यांना सर्वभावाने शरण जावे आणि देवाप्रमाणे गुरूला भजावे, असा अनादी परिपाठ आहे.

सर्व संतांची चरित्रे पाहिली, तर गुरुप्रसादाचे महत्त्व आणि माधुर्य याची सर्वांनीच वाहवा केली आहे. श्रीज्ञानेश्वरांनी गुरुमूर्तीतच पांडुरंग

पाहिला. तुकोबांनी पांडुरंगातच श्रीगुरू पाहिले. देव आणि गुरू यांचे असे एकरूप होणे म्हणजेच गुरूच्या महत्तेचा अंदाज लावता येण्यासारखे आहे.

सद्गुरूंची लक्षणे सांगताना डॉ. शंकर चतुरकर म्हणतात, 'जो पूर्ण स्वानुभवी व साक्षात्कारी आहे, जो अपरोक्ष ज्ञान प्राप्त करून देण्यास समर्थ आहे, ज्याच्या उपदेशाने माया मावळते, तोच तारक सद्गुरू होय.'[२१]

एकनाथ महाराज श्रेष्ठ गुरूबद्दल म्हणतात,

'एवं गुरूपणाची वदंती । असे बहुपणे नांदती ।।
जो करी अपरोक्षप्राप्ती । त्यातें म्हणती सद्गुरुस्वामी ।।'
(एकनाथांची भारुडे - ३/२७५-८८)

गुरूचे त्यातल्यात्यात श्रेष्ठ गुरूचे वर्णन करावे, तेवढे थोडेच आहे. गुरू निवडणे बऱ्याच अंशी आपल्याच हातात असते. बहिणाबाईंनामात्र स्वप्नसाक्षात्कारातून गुरूचा लाभ झाला. गुरुशिष्याची ही जोडी जणू पूर्वसंचित असल्याप्रमाणे अलौकिक भेटीतून आकारास आले. बहिणाबाईंचे प्रारब्ध थोर, म्हणून तुकोबांसारखे सर्वश्रेष्ठ गुरू त्यांना प्राप्त झाले; किंबहुना बहिणाबाईंची आध्यात्मिक उंचीच तेवढी होती, की त्यांना या सर्वश्रेष्ठ गुरूशिवाय उपाय नव्हता. काहीही म्हटले तरी बहिणाबाईंच्या जीवनातील गुरूचे कार्य हे अनमोल आहे.

## ५.२. गुरुपरंपरा :

बहिणाबाईंची गुरुपरंपरा अतिशय उच्च दर्जाची असून त्या परंपरेत ज्ञानाची उत्तरोत्तर वाढच होत गेलेली दिसते. बहिणाबाईंची गुरुपरंपरा अशी सांगितलेली आहे :

आदिनाथ - पार्वती - मच्छिंद्रनाथ (मत्स्येंद्रनाथ) - गोरक्षनाथ (गोरखनाथ) - गहिनीनाथ - निवृत्तिनाथ - ज्ञानेश्वर - सच्चिदानंदबाबा - विश्वंभर - राघवचैतन्य - केशवचैतन्य - बाबाजीचैतन्य - तुकाराम - बहिणाबाई - विठ्ठल, दीनकवी.

आपल्या पहिल्याच अभंगात बहिणाबाईंनी गुरुपरंपरा विस्ताराने वर्णन केली आहे.

'आदिनाथे उपदेश पार्वतीसी केला । मच्छेंद्रे ऐकिला मंछगर्भी ।।
शिवहृदयीचा मंत्र पै आगाध । जालासे प्रसिद्ध भक्तियोगे ।।
त्याने त्या गोरक्षा केले कृपादान । तेथोनि प्रकट जाण गहेनीप्रती ।।
गहेनीने दया केली निवृत्तिनाथा । बाळपण असता योगरूप ।।
तेथोनी ज्ञानेश पावले प्रसाद । जाले ते प्रसिद्ध सिद्धासनी ।।
सच्चिदानंदबाबा भक्तीचा आगर । त्यासी अभयवर ज्ञाने केला ।।
पुढे विश्वंभर शिवरूप सुंदर । तेणे राघवी विचार ठेविलासे ।।
केशव चैतन्य बाबाजी चैतन्य । जालेसे प्रसन्न तुकोबासी ।।
येकनिष्ठ भाव तुकोबाचे चरणी । म्हणोनी बहेणि लाधलीसे ।।'
(अभंग क्र. १ ओ. १ ते ९)

बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेची सुरुवात नाथसंप्रदायी आहे. या संप्रदायाचा उगम इतर अनेक संप्रदायांप्रमाणे परमेश्वरापासूनच झाला आहे. संतवाङ्मयातूनसुद्धा श्रीआदिनाथ हेच या पंथाच्या उगमस्थानी असलेले दिसतात.

## ५.२.१. मत्स्येंद्रनाथ (मच्छिंद्रनाथ) :

आदिनाथ - पार्वतीनंतर नाथसंप्रदायाचे प्रथम प्रमुख पुरुष म्हणून मत्स्येंद्रनाथांचे नाव समोर येते. त्यांच्या जीवनवृत्तांताविषयी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यांच्या जीवनाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. गोरक्षनाथांचे गुरू, कौलाचाराचे सिद्ध पुरुष, नेपाळी परंपरेप्रमाणे अवलोकितेश्वराचे अवतार इत्यादी माहिती त्यांच्या संदर्भात सत्य असल्याचे सांगितले जाते.

मत्स्येंद्रनाथांच्या जन्मासंबंधी ज्या आख्यायिका सांगितल्या जातात, त्यापैकी एक म्हणजे क्षीरसिंधूच्या परिसरात शंकरांनी पार्वतीला गुह्य ज्ञान सांगितले. मत्स्यरूपात वावरणाऱ्या मत्स्येंद्रनाथांनी तो योगोपदेश ऐकला. तो ऐकताच मत्स्येंद्रनाथ निश्चलकाय झाले. शंकरांनी हे पाहिले. त्यांनी त्या निश्चलकाय मत्स्यावर पाणी शिंपडून त्यास दिव्य मनुष्यरूप दिले. तेव्हापासून पुढे सिद्ध मत्स्येंद्रनाथ प्रसिद्धीस आले.

दुसऱ्या आख्यायिकेनुसार मत्स्येंद्र हे प्रथम ब्राम्हण होते. काही विशेष कारणांमुळे त्यांना 'मत्स्येंद्र' हे नाव प्राप्त झाले. कार्तिकेयाने जेव्हा 'कुलागम शास्त्र' चोरून समुद्रात फेकून दिले, त्या शास्त्राचा उद्धार करण्याकरिता शंकरांनीच मत्स्येंद्राचे रूप धारण केले. समुद्रात प्रवेश करून त्या शास्त्राचे भक्षण करणारे माशाचे पोट विदीर्ण करून त्या शास्त्राचा उद्धार केला. त्यामुळे त्यांचे 'मत्स्यघन' असे नाव पडले.

मत्स्येंद्रांचा काळ नवव्या शतकाचा उत्तरार्ध किंवा दहाव्या शतकाचा पूर्वार्ध असा आहे. मत्स्येंद्रनाथांनी 'कौलज्ञाननिर्णय' नावाचा ग्रंथ लिहिला. अभ्यासक डॉ. बागची यांनी 'कौलज्ञाननिर्णया'शिवाय अजून चार पुस्तके मत्स्येंद्रनाथांनी लिहिली, असे सांगितले आहे. एक हजार वर्षांपूर्वीच्या जुन्या बंगाली वाङ्मयात मत्स्येंद्रनाथकृत काही पदे आढळतात.

## ५.२.२. गोरक्षनाथ (गोरखनाथ) :

बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील पुढचे गुरू म्हणजे मत्स्येंद्रनाथांचे शिष्य गोरक्षनाथ. यांचा उल्लेख ज्ञानेश्वरांनी अठराव्या अध्यायात गौरवाने केला आहे.

'तेणे योगाब्जिनीसरोवरु । विषयविध्वंसैकवीरु ।।
तियें पदीं कां सर्वेश्वरु । अभिषेकिला ।।'
(ज्ञानेश्वरी - १८/१७५५)

गोरक्षनाथांचा काळ बाराव्या शतकाचा मध्य असा आहे. उत्तर हिंदुस्थानातील नेपाळी किंवा तिबेटी परंपरेप्रमाणे मात्र त्यांचा काल नवव्या शतकाचा उत्तरार्ध किंवा दहाव्या शतकाचा पूर्वार्ध असा आहे.

गोरक्षनाथांनी आपल्या गुरुप्रमाणेच सर्व भारतखंडभर संचार करून धर्मजागृती केली. त्यांची स्मृती जागवणारी निरनिराळी स्थाने थेट हिंदुस्थानपासून महाराष्ट्रापर्यंत पसरली आहेत. नेपाळमध्ये त्यांची मठमंदिरे असून नेपाळमधील गुरखे लोक मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ यांना देवस्थानी मानतात. अजूनही तेथे मत्स्येंद्रांचा यात्रोत्सव दरवर्षी सात दिवस साजरा केला जातो. उज्जयिनीचा राजा भर्तृहरी हा गोरक्षनाथांचा शिष्य होता. गोरक्षनाथांचे देऊळ हरिद्वारजवळ गोरखपूर येथे आहे. गोरखपूर या नावावरून गोरखनाथांच्या चळवळीचे ते एक केंद्रस्थान होते हे कळून येते. महाराष्ट्रात नेवाशाजवळ (अहमदनगर जिल्हा) एका डोंगरात त्यांची समाधी आहे. मत्स्येंद्रगडावर 'गोरखचिंच' म्हणून एक चिंचेचा वृक्ष दाखविला जातो. गोरक्षनाथांची मठमंदिरे काठेवाडात बंगाल, नेपाळ, महाराष्ट्र व सिंहलद्वीपमध्ये असून ती सर्व त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष पटवितात. ज्ञानेश्वरांचे पणजे त्र्यंबकपंत यांना गोरक्षनाथांचा उपदेश प्राप्त झाला होता.

डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या मते गोरक्षनाथांनी एकूण अठ्ठावीस पुस्तके लिहिली. त्यातील 'अमनस्क', 'अमरोघशासनम्', 'गोरक्षपद्धती', 'गोरक्षसंहिता', 'सिद्धसिद्धांतपद्धती' हे संस्कृत ग्रंथ अधिक महत्त्वपूर्ण आहेत. हिंदीमध्ये डॉ. बडथ्वाल यांनी 'गोरखबानी' या नावाने जो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे, त्यात गोरखनाथांच्या चाळीस हिंदी पुस्तकांचा उल्लेख असून त्यात 'सबदी', 'गोरखबोध' इत्यादी पुस्तके महत्त्वाची आहेत. गोरक्षनाथांनी केलेला उपदेश बव्हंशी हिंदी व संस्कृत या भाषांमध्ये सापडतो.

काहींच्या मते गोरक्ष हे हिंदी भाषेतील पहिले कवी होत. ते फार मोठे सिद्ध पुरुष होते. हठयोगाचे जनकत्वही त्यांच्याकडेच जाते. मराठीतही गोरक्षनाथांच्या नावावर काही ग्रंथ आहेत. त्यापैकी 'अमरनाथसंवाद', 'गोरक्षगीता' हे योगविषयक अनुभवाचे विवरण करणारे ग्रंथ आहेत.

## ५.२.३. गहिनीनाथ :

बहिणाबाईंच्या गुपरंपरेतील गोरखनाथांनतरचे गुरू म्हणजे गहिनीनाथ. हे गोरखनाथांचे शिष्य व निवृत्तिनाथांचे गुरू होते. ज्ञानेश्वरांचे आजे गोविंदपंत व आजी नीराबाई यांना गहिनीनाथांचा अनुग्रह होता. गहिनीनाथांचा संचार महाराष्ट्रभर होता. ब्रम्हगिरी पर्वतावर गोदावरीच्या उगमाजवळ गहिनीनाथांचा मठ आहे. निवृत्तिनाथांशी त्याची भेट ब्रम्हगिरी पर्वताच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर पडली होती. तेथेच निवृत्तिनाथांना अनुग्रह झाला. वैराग्याने तापलेल्या निवृत्तिनाथांना गहिनीनाथांनी प्रेमबोधाने निवविले. त्यामुळे ते शांत झाले. निवृत्ती किंवा वैराग्यमार्गापेक्षा प्रेमबोधाचा मार्ग श्रेष्ठ आहे, असे ते सांगत.

गोरक्षांच्या एका ग्रंथरचनेत 'गोरक्षगीता' नावाच्या एका ग्रंथाचा उल्लेख आला आहे. 'हे गोरक्षगीता । गहिनीनाथ संवाद ।' असा सुरुवातीचा या ग्रंथातील उल्लेख पाहता गोरक्षनाथांचा उपदेश गहिनीनाथांनी आपल्या शिष्यांकरिता लिहून ठेवल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे या ग्रंथाचे कर्तृत्व गोरक्षनाथांपेक्षा गहिनीनाथांकडेच जाते, या ग्रंथात योगाभ्यासाची व तदनुषंगिक येणाऱ्या अनुभवाची वर्णने आहेत. 'ज्ञानेश्वरी'तील सहाव्या अध्यायातील वर्णनाशी याचे फार साम्य आहे. गहिनीनाथांचा भर योगापेक्षा कृष्णभक्तीवर अधिक होता.

## ५.२.४. निवृत्तिनाथ :

बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील गहिनीनाथांच्या नंतरचे गुरू म्हणजे निवृत्तिनाथ. निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू. त्यांचे मूळ घराणे आपेगावचे. तेथील कुलकर्ण्य त्यांच्या घरात वंशपरंपरागत होते. निवृत्तिनाथांच्या पणजोबांचे पणजे हरिहरपंत व त्यांचे पणतू त्र्यंबकपंत यांनी आपले सर्व आयुष्य देशकार्याला वाहिले. त्र्यंबकपंतांच्या दोन पुत्रांपैकी एक हरिपंत देवगिरीकर हे सिंघणांच्या बाजूने लढताना कामास आले. ज्येष्ठ पुत्र गोविंदपंत हे निवृत्तिनाथांचे आजोबा. गोविंदपंत व त्यांची पत्नी नीराबाई यांना गहिनीनाथांचा उपदेश प्राप्त झाला होता. त्यांचे पुत्र म्हणजे विठ्ठलपंत. ते पहिलेपासून धार्मिक वृत्तीचे होते. आळंदीच्या सिद्धोपंत कुलकर्ण्यांच्या मुलीशी - रुक्मिणीशी ते विवाहबद्ध झाले; पण संसारात त्यांचे मन रमत नव्हते. त्यामुळे त्यांनी गृहत्याग करून काशीच्या श्रीपादस्वामींकडून संन्यास दीक्षा घेतली. योगायोगाने श्रीपादस्वामींना विठ्ठलपंतांच्या विवाहाची माहिती कळली. त्यांनी विठ्ठलपंतांस पुन्हा गृहस्थाश्रम चालविण्याची आज्ञा दिली. विठ्ठलपंत आळंदीस परतले. संसारात मन रमवू लागले; परंतु एक संन्यासी गृहस्थाश्रमात परत आल्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली. प्रतिकूल परिस्थितीशी सामना करीत विठ्ठलपंतांनी बारा वर्षे संसार केला. त्यांना चार मुलेही झाली. समाजाने मात्र हा संसार आणि त्याची फळे स्वीकारली नाहीत. त्यांना वाळीत टाकण्यात आले. मध्ये निवृत्तिनाथ कुटुंबीयांपासून दूर गेले. पुष्कळ शोध घेऊनही निवृत्तिनाथांचा शोध लागला नाही. त्या काळात निवृत्तिनाथांनी एका गुहेचा आश्रय घेतला होता. तेथेच वास करणाऱ्या गहिनीनाथांनी त्यांना आपले शिष्य केले व उपदेश दिला. निवृत्तिनाथांमध्ये आमुलाग्र बदल झाला.

समाजाने न स्वीकारल्याने विठ्ठलपंतांनी पुन्हा समाजात येण्याचा मार्ग कोणता, असे आळंदीकर ब्राम्हणांना विचारले असता, त्यांनी देहान्त प्रायश्चित्त सांगितले. विठ्ठलपंत व रुक्मिणी यांनी देहान्त प्रायश्चित्त घेतले. चारही भावंडे पोरकी झाली. निवृत्तिनाथांनी परत येऊन आपल्या भावंडांना उपदेश केला. ज्ञानदान केले. आळंदीच्या ब्राम्हणांनी त्यांना पैठणहून शुद्धिपत्र घेऊन येण्यास सांगितले. निवृत्तिनाथ हे अविनाश, अव्यक्त स्वरूपामध्ये नांदत असल्यामुळे त्यांना शुद्धिपत्राची चिंता नव्हती. ज्ञानेश्वरांना त्याचे महत्त्व होते; कारण त्यांना लोकसंग्रह करून जनजागृती करावयाची

होती. ज्ञानदेवांचे हे मनोगत ओळखून निवृत्तिनाथ भावंडांसह पैठण येथे आले. पैठण हे विद्येचे माहेरघर समजले जाते. तेथील सभेत निवृत्तिनाथांनी आपला वृत्तान्त कथन केला. शेवटी सभेचा निर्णय 'नाही प्रायश्चित्त, उभय कुळ भ्रष्ट' असा दिला गेला. यावर 'आमची गती काय?' असे निवृत्तिनाथांनी विचारल्यावर त्यांना 'अनुतापयुक्त अनन्यभक्ती' हे उत्तर मिळाले. शिवाय वैराग्याचाही मार्ग अनुसरण्याची आज्ञा करण्यात आली. इतरांना संकटप्राय वाटणारी ही आज्ञा या भावंडांना मात्र सुखकारकच वाटली. पैठणला शके १२०९ मध्ये त्यांनी शुद्धिपत्र मिळविले. त्यानंतर विविध ठिकाणी आपले कार्यकर्तृत्व दर्शवून ही चारही भावंडे आळंदीस परत आली. पुढे आळंदीस ज्ञानदेवांनी व नंतर सोपानदेवांनी शके १२१८ मध्ये समाधी घेतली. त्यानंतर शके १२१९ मध्ये निवृत्तिनाथांनी व मुक्ताबाईंनीही समाधी घेतली.

## ५.२.५. ज्ञानेश्वर :

बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील निवृत्तिनाथांनंतरचे गुरू म्हणजे ज्ञानेश्वर. ज्ञानेश्वरांविषयी लिहावे तितके थोडेच ठरेल. क्रांतिदर्शी तत्त्वज्ञ, प्रतिभासंपन्न साहित्यिक आणि नीतीशिक्षक अशा तीनही भूमिका ज्ञानेश्वरांच्या ठायी एकवटल्या आहेत. काव्य आणि तत्त्वज्ञान ही दोन टोके आपल्या असामान्य प्रतिभेमुळे त्यांनी एकत्र आणली. काम, क्रोध, मोह, लोभ यांच्या आहारी गेलेली सामान्य माणसे सत्य, शांती, विवेक, वैराग्य व आत्मिक समाधान या गुणांना पारखी होत आहेत, हे ज्ञानेश्वरांनी पाहिले. अशा स्थितीत अज्ञानी लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी, भोळ्याभाबड्यांच्या धर्मभावनेला अध्यात्मविचारांची ठाम बैठक मिळवून देण्यासाठी, मानवाच्या उद्धारासाठी त्यांनी धर्मजागृतीचे कार्य हाती घेतले. आपले विचार सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्यासाठी सुबोध भाषेत ग्रंथांची रचना केली. 'भगवद्गीता' हा अवघ्या जगाला मार्गदर्शन करणारा ग्रंथ संस्कृतातून असल्यामुळे सर्वसामान्यांपासून दूर होता. ज्ञानेश्वरांनी त्याचे सोप्या मराठीत भाषांतर करून 'भगवद्गीता' 'ज्ञानेश्वरी'च्या रूपाने घराघरात नेऊन पोचवली.

ज्ञानेश्वरांनी गीतेच्या अठरा अध्यायांतील सातशे श्लोकांवर मूळ अध्याय आणि क्रम न बदलता नऊ हजार ओव्यांचे मनोरम भाष्य लिहिले. ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानातील मुख्य सिद्धांत अद्वैताचा आहे. सर्वत्र एकच आत्मतत्त्व भरलेले आहे. त्याखेरीज दुसरे काहीच नाही. ज्ञानेश्वरांचे असे सर्वच विचार तत्कालीन परिस्थितीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे, उपयुक्त होते आणि आजही आहेत. ल.रा. पांगारकरांनी म्हटल्याप्रमाणे ज्ञानेश्वरीत कर्म आहे; पण कर्माची कटकट नाही. भक्ती आहे; पण ती भोळीभाबडी नाही. ज्ञान आहे; पण केवळ शब्दज्ञान नाही.

'अमृतानुभव' हा ज्ञानेश्वरांचा दुसरा ग्रंथ. 'ज्ञानेश्वरी'च्या लेखनानंतर निवृत्तिनाथ त्यांना म्हणाले की, हा ग्रंथ उत्तमच उतरला; पण तो शेवटी टीकापर ग्रंथ. आता मुकुंदराजांप्रमाणे स्वतंत्र ग्रंथनिर्मिती व्हावी. त्यामुळे ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवा'ची निर्मिती केली. 'चांगदेवपासष्टी' ही ज्ञानेश्वरांची आणखी एक रचना. 'अमृतानुभवाचे तर्कशुद्ध सार' असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. याशिवाय ज्ञानेश्वरांची अभंगवाणीसुद्धा तितकीच प्रासादिक आहे. बहिणाबाई ज्ञानेश्वरांचे एकूणच कार्यकर्तृत्व जाणून होत्या. म्हणून त्यांनी 'ज्ञानदेवे रचिला पाया' असे म्हणून त्यांचा गौरव केला आहे.

## ५.२.६. सच्चिदानंदबाबा :

पैठणमधील लोकांना आपल्या विभूतिमत्त्वाचे तेज दाखवून ज्ञानेश्वर भावंडांसह नगर जिल्ह्यातील प्रवरा नदीच्या तीरावर वसलेल्या नेवासे या गावी गेले. नेवाशात प्रवेश करताच एक साध्वी स्त्री आपल्या पतीच्या शवासमोर आक्रोश करीत असलेली त्यांना दिसली. 'हा मृत पुरुष कोण?' असे त्यांनी विचारताच लोकांनी उत्तर दिले की, याचे नाव सच्चिदानंद असून हा या गावचा कुलकर्णी होता. त्यावर ज्ञानेश्वर म्हणाले, 'सच्चिदानंद म्हणजे सत् चित् आणि आनंद. या त्रयीला मृत्यू कसा संभवेल?' असे म्हणून त्यांनी त्या प्रेताच्या अंगावरून हात फिरविला. त्यासरशी त्या प्रेताच्या शरीरात प्राण संचारला. सच्चिदानंद उठून उभा राहिला आणि पुढे ज्ञानेश्वरांना सर्वभावे शरण गेला.

जनसामान्यांना ‘गीता’ कळावी म्हणून निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वरांना हा प्रस्थानयीतला ग्रंथ मराठी भाषेत ओवीबद्ध स्वरूपात लिहिण्यास सांगितले. ज्ञानेश्वरांनी गुरूची आज्ञा मानली. तिथल्या शिवमंदिरात बसून त्यांनी ओवीरूपात टीका सांगण्यास सुरुवात केली. नऊ हजार ओव्यांच्या या ग्रंथाचे लेखन अत्यंत आदरपूर्वक सच्चिदानंदबाबांनी केले.

‘ज्ञानेश्वरी’च्या रचनेनंतर ही भावंडे पंढरपुरास गेली. तिथे नामदेवांसह गोरा कुंभार, चोखामेळा, नरहरी सोनार इत्यादी संतमंडळी ज्ञानेश्वरांच्या संपर्कात आली. पुढे ज्ञानेश्वर महाराज तीर्थयात्रेला निघाले आणि त्यानंतर बहुदा ज्ञानदेवांची व सच्चिदानंदांची भेट झाली नसावी. सच्चिदानंदबाबांबद्दल एवढीच माहिती उपलब्ध आहे.

## ५.२.७. विश्वंभर :

तुकाराम महाराज वगळता बहिणाबाईंच्या पुढील गुरूंची माहिती विशेष उपलब्ध नाही. त्यांच्या गुरूपरंपरेत विश्वंभराचे नाव आलेले आहे. हे विश्वंभर नक्की कोण, याचा उलगडा होत नाही.

संत तुकारामांच्या कुलपरंपरेत विश्वंभर यांचे नाव आहे. तुकारामांची वंशावळ अशी दिली जाते :- विश्वंभर - हरी - विठोबा - पदाजी - शंकर - कान्होबा - बोल्होबा - तुकाराम. तुकारामांच्या गाथेत विश्वंभरबाबांचे नाव बरेचदा येते. उदा. ‘विश्वी विश्वंभर’, ‘मज विश्वंभर बोलावितो’, ‘तुका म्हणे ज्याचे नाव विश्वंभर’ इत्यादी. त्यात कुलपुरुष विश्वंभराची स्मृती तुकारामांच्या मनात दडली असावी, अशी शक्यता आहे. यापेक्षा स्पष्ट उल्लेख ते करीत नाहीत. काही अभ्यासकांच्या मते तुकारामांनी जगन्नियंत्या परमेश्वराला ‘विश्वंभर’ असे संबोधले आहे. ‘केशव भिकाजी ढवळे’प्रकाशित ‘तुकाराम गाथे’त विश्वभराचा उल्लेख असलेल्या अभंगात विश्वंभराला जगन्नियंता परमेश्वर मानलेले आहे.

एकंदरीत तुकोबांच्या गुरुपरंपरेत ‘विश्वंभरां’चे नाव आल्याने साहजिकच बहिणाबाईंच्याही गुरुपरंपेत ते आहेत; परंतु त्यांची निश्चित आणि फारशी माहिती मात्र उपलब्ध नाही.

## ५.२.८. राघवचैतन्य :

संतश्रेष्ठ तुकारामांच्या गुरुपरंपरेतील राघवचैतन्यांचे मूळ नाव रघुनाथ होते. त्यांचा जन्म गिरनार पर्वताच्या परिसरात वसलेल्या एका शौर्यकुळात झाला. त्यांचे वडील यवनांच्या नोकरीत होते. रघुनाथाने पित्याच्या आज्ञेवरून गिरनार पर्वतावर बराच काळ दत्ताची उपासना केली. आपल्या उपासनेला फळ येत नाही, असे पाहून ते निराश झाले. शेवटी त्यांनी पर्वतावरून खाली उडी घेण्याचे ठरविले. गिरनार पर्वतावरून ते खाली उडी घेणार, तोच दत्तात्रयांनी त्यांना दर्शन दिले. रघुनाथांच्या उपासनेवर प्रसन्न होऊन त्यांनी जुन्नरजवळच्या ओतूर गावी जाऊन अनुष्ठान करण्याचा आदेश दिला. 'तिथे तुला व्यासांचा उपदेश होईल' असेही दत्तात्रयांनी सांगितले.

दत्तात्रयाची आज्ञा शिरसावंद्य मानून रघुनाथांनी ओतूरला जाऊन मांडवी नदीच्या तीरावर पार्थिव लिंगाची उपासना सुरू केली. पुढे अन्नवस्त्राचा त्याग करून बरीच वर्षे घोर तप केले. तरीही व्यास ऋषी काही प्रसन्न होईना. शेवटी कंटाळून ते आत्मक्लेशाला प्रवृत्त झाले. पार्थिव लिंगासमोर एका दगडावर त्यांनी डोके आपटून घ्यायला सुरुवात केली. डोक्याला जबर मार बसून त्यांची शुद्ध हरपली. थोड्या वेळाने शुद्धीवर आल्यावर त्यांनी पुन्हा डोके आपटून घेण्यास प्रारंभ केला. त्यांच्या मनाने त्यादिवशी तीव्र पण केला होता, की व्यासांचे दर्शन झाल्याशिवाय माघार घ्यायची नाही. शेवटी व्यासांना त्यांची दया आली. रघुनाथांच्या मनातील निग्रह, जिज्ञासा पाहून अखेर व्यासांनी त्यांना दर्शन दिले. '! नमो भगवते वासुदेवाय नमः' हा गुरुमंत्र दिला. 'राघवचैतन्य' असे त्यांचे नामकरण केले. दत्तात्रयांनीही त्यांना पुन्हा दर्शन देऊन 'चतुश्लोकी भागवता'ची शिकवण दिली आणि संप्रदायप्रसाराची आज्ञा दिली.

व्यासांचे दर्शन व उपदेश प्राप्त झाल्यावर राघवचैतन्य लेण्याद्रीला गेले. तेथे त्यांनी गणेशाची आराधना केली. एके दिवशी त्यांची भेट केशवभट राजर्षी यांच्याशी झाली. राघवचैतन्यांच्या बुद्धी व ज्ञानाने भारावून जाऊन केशवभटांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. पुढे वाई येथे मुक्कामाला असताना त्यांची महमूदशहा बहामनीशी भेट झाली. असाध्य रोगाने ग्रासलेल्या महमूदशहाचा आजार राघवचचैतन्यांनी नाहीसा केला. त्यामुळे बहामनीची राघवचैतन्यावर श्रद्धा बसली. ही वार्ता कर्णोपकर्णी होऊन गुलबर्ग्याकडील

हिंदूमुसलमानांत त्यांच्यासंबंधी आदर वाढला. आळंदीचे पंडित व जोशी त्यांचे अनुयायी बनले. त्यांचा एक शिष्य विश्वनाथ नरसे राजर्षी याला उपदेश दिल्यावर राघवचैतन्यांनी त्यांनाच 'केशवचैतन्य' हे नाव दिले. पुढे अनेक तीर्थयात्रांत केशवचैतन्य हे राघवचैतन्यांच्या बरोबर होते. अशी तीर्थयात्रा करीत ते कल्याणीजवळच्या आळंदला आले. तेथेच त्यांनी समाधी घेतली. या समाधी-स्थळाला सध्या दर्ग्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

राघवचैतन्यांच्या ग्रंथसंपदेत अनेक संस्कृत ग्रंथांचा समावेश होतो. त्यांच्या ब्रम्हस्वरूप, मायाविचार, इशस्तवन, योगनिद्रा, सनातनधर्मविचार, बुद्धिविकास, इंद्रियदमन, त्रिगुणलीला, निराकार मन व जितेपणी मरण, महागणपतीस्तोत्र इत्यादी विषय काव्यमालेत आलेले आहेत. त्यांचे दोन संस्कृत श्लोक हरिकेवीच्या 'सुभाषितहारावली'त प्रसिद्ध झाले आहेत. राघवचैतन्यांचे शिष्य विविध जातीत विखुरलेले आहेत.

## ५.२.९. केशवचैतन्य :

केशवचैतन्य हे एक थोर संत होते. त्यांचा काल इ.स. १५२४ ते १५७२ असा सांगण्यात येतो. त्यांचा जन्म पुण्यात झाला. त्यांचे मूळ नाव विश्वनाथ होते. त्यांचा थोरला भाऊ त्रिंबक हा मुसलमानांच्या सेवेत होता. त्याने विश्वनाथांवर अनेक आपत्ती आणल्या. त्याच्यापासून होणाऱ्या त्रासामुळे विश्वनाथ शेवटी सहकुटुंब त्र्यंबकेश्वराला जायला निघाले. जाताना वाटेत ओतूर या गावी त्यांना राघवचैतन्यांचे दर्शन झाले. विश्वनाथांनी त्यांना संन्यासदीक्षा देण्याबद्दल विनंती केली. स्वामींनी त्यांना पुत्रसंतती नसल्याकारणाने संन्यासदीक्षा देण्याचे नाकारले. तेव्हा स्वामींच्या आज्ञेनुसार विश्वनाथांनी पुत्रप्राप्ती झाल्यावर आणि तो तेरा वर्षांचा झाल्यावर संन्यासदीक्षा ग्रहण केली. तेव्हा स्वामींनी त्यांना 'केशवचैतन्य' हे नाव दिले. 'केशवचैतन्यांनी 'भक्तिप्रकाश', 'गीताभागवतसार', 'परमार्थविचार' इत्यादी ग्रंथ लिहिले आहेत. ओतूर येथे त्यांनी समाधी घेतली. तुकाराम महाराजांना स्वप्नात उपदेश करणारे गुरू केशवचैतन्य हेच होत,'[२२] असे एक वादग्रस्त मत आढळते.

## ५.२.१०. बाबाजीचैतन्य :

बाबाजीचैतन्य हे एक साधू होते. त्यांचा काल इ.स. १५५१ ते १६५० असा सांगितला जातो. तुकारामांना यांनीच स्वप्नात गुरुपदेश दिला. बाबाजीचैतन्यांच्या चरित्राविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. बाबाजीचैतन्य आजन्म ब्रम्हचारी होते. स्त्रियांचे त्यांना वावडे होते. 'गुरुपरंपरा' नावाच्या संस्कृत ग्रंथात त्यांच्याविषयी जी थोडीफार माहिती उपलब्ध झाली आहे, त्यानुसार असे सांगण्यात येते की, भेरी भोकारीची राघव, केशव व कृष्ण उर्फ बाबाजी अशी तीन मुले होती. राघवाने आळंदीला एक वाद जिंकला, म्हणून त्या त्रयीला 'चैतन्य' हे उपनाम देण्यात आले.

'नागेशलीलामृत' या ग्रंथात बाबाजीसंबंधी काही ओव्या आहेत. त्या अशा -

'बाबा चैतन्यसतेज । जाणे निजाचे निजगुज ।
नागनाथाचा प्रिय शिष्य । सुपुण्यद्वज उपासनी ।।
ऐसा वीतरागी प्रबळ । बाबाचैतन्य दयाळ ।
संचार करिता निर्मळ । पावला स्थळ मान्याळ पै ।।
भीमा नदीचे तीरी । मान्याळ नावे पवित्र नगरी ।
तेथे वास्तव्य कांतारी । सुखेसुखान्तरी सुखरूप ।।'[२३]

गाणगापूरहून अकरा मैलांवर मान्यहाळ हे गाव आहे. येथे बाबाजींचा मठ आहे. या मठाला कोणी 'नरसप्पाचा मठ' असेही म्हणतात. या मठात बाबाजींचे बसण्याचे दोन पलंग आहेत. मठातल्या देवासोबतच या पलंगांचीही पूजा केली जाते. या मठासमोर एक मोठे आवार आहे. त्यात बाबाजींची समाधी आहे. तेथे तुपाच्या दिव्याशिवाय अन्य दिवा नेता येत नाही, असा निर्बंध आहे. बाबाजींना स्त्रिया निषिद्ध असल्यामुळे तेथे स्त्रियांना प्रवेश नाही. शेख सुलेमानसाहेब, नरसप्पय्या, तुकाराम, शिवराम कल्याणीकर हे संत त्यांचे शिष्य होते. बाबाजींनी मांडवी नदीच्या काठी तुकारामांना स्वप्नोपदेश दिला, असे सांगण्यात येते.

निरंजन रघुनाथ नावाच्या एका पुरुषाने शके १७०६ मध्ये 'चैतन्य-विजय-कल्पतरू' हा ओवीबद्ध ग्रंथ कृष्णदास बैरागी यांच्या शके १५६८ मधील ग्रंथाच्या आधारे लिहिला असून त्यात राघवचैतन्य व

केशवचैतन्य यांची माहिती दिली आहे. केशवचैतन्य म्हणजेच बाबाजी असा या ग्रंथकाराचा आग्रह आहे; परंतु ही माहिती तितकी विश्वसनीय नाही. बहिणाबाई व निळोबा या तुकारामशिष्यांनी दिलेल्या गुरुपरंपरेत थोडाफार फरक असला, तरी राघव, केशव व बाबाजी या तीनही व्यक्ती निरनिरळ्या होत्या, असे स्पष्ट दिसते. निळोबांनी आपली गुरुपरंपरा अशी सांगितली आहे :- महाविष्णुदासहंस (ब्रम्हा) - नारद - व्यास - राघवचैतन्य - केशवचैतन्य - बाबाजीचैतन्य - तुकाराम - निळोबा. नाथसंप्रदाय व चैतन्यसंप्रदाय भिन्न आहेत, यात शंका नाही.

वा.सी. बेंद्रेलिखित 'तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा' (इ. स. १९६०) या ग्रंथात राघव, केशव व बाबाजी या तीन व्यक्ती निरनिराळ्या होत्या, असे सांगितले आहे. पैकी राघवचैतन्य म्हणजेच लाडले मशायख यांची समाधी किंवा दर्गा आळंद (जि. गुलबर्ग) येथे असून त्यांचे शिष्य केशवचैतन्य यांची समाधी ओतूर (ता. जुन्नर, जि. पुणे) येथे आहे. वा.सी. बेंद्रे यांच्या मते, केशवचैतन्य यांचे शिष्य बाबाजी यांनी तुकारामांना स्वप्नात जो उपदेश दिला, तो ओतुरास गंगावाटेवर दिला. या बाबाजींची समाधी किंवा शेख शहाबुद्दीन यांचा दर्गा मान्यहाळ (ता. जेउरगी, जि. गुलबर्गा) येथे आहे. त्यांनी तुकारामांवर अनुग्रह केल्याचा काळ श्री. बेंद्रे शके १५६१ (इ.स. १६३३) असा मानतात. अर्थात या परंपरेचा बंगालातील चैतन्यप्रभूंशी किंवा त्यांच्या शिष्यमालिकेशी संबंध नाही, असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

पु.मं. लाड ह्यांच्या मते बंगाली चैतन्यप्रभूंचा (इ.स. १४८६ - १५३३) महाराष्ट्राशी संबंध आला होता. 'तुकारामाला गुरुपदेश' ह्या शीर्षकाखाली लिहिलेल्या लेखात (म.सं. पत्रिका ५-२) ते म्हणतात की, दक्षिण यात्रेत चैतन्यप्रभूंबरोबर गोविंददास नावाचे शिष्य होते. त्यांची टिपणे प्रकाशित झाली असून त्यांनी पुण्यास येऊन लोकांमध्ये नामसंकीर्तनाचे नवचैतन्य निर्माण केले.

इ.स. १५१०-१२ च्या दरम्यान चैतन्यप्रभू पंढरपुरात होते व नंतर काही दिवस पुण्यात होते, असे त्यांचे चरित्रकार म्हणतात. सुप्रसिद्ध कन्नड संतकवी पुरंदरदास यांचाही स्फूर्तिदाता तोच असावा. हा सर्व पुरावा अभ्यासून पाहता तुकारामांचा बंगाली चैतन्यमहाप्रभूंशी नुसता नाममात्र संबंध नसून आंतरहेतूनेही या चैतन्यांशी ते संलग्न झाले होते. पु.मं. लाड पुढे म्हणतात, की तुकारामांचे आजेगुरू केशवचैतन्य यांचा ओतुरास समाधी

घेतलेल्या केशवचैतन्यांशी कोणताही संबंध नाही. अशाप्रकारे या तीनही गुरूंविषयी विविध प्रकारची मतेमतांतरे दिसून येतात.

## ५.२.११. तुकाराम महाराज :

बहिणाबाईंनी ज्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेतले आणि ज्यांना दर्शन घेण्यापूर्वीच गुरू मानले, त्या संत तुकारामांची महती थोडक्यात सांगणे कठीण आहे. आपल्या अभंग रचनांमुळे अजरामर झालेल्या तुकोबांनी शूद्र कुळात जन्म घेऊनही विविध जाती, वर्ण आणि धर्मांमध्ये लोकप्रियता मिळवली.

तुकारामांचा जन्म देहू या गावी शके १५२० म्हणजेच इ. स. १५९८ मध्ये शूद्र वाणी जातीत झाला. त्यांचे कूळ मोरे तर आडनाव आंबिले होते. त्यांचे घराणे प्रतिष्ठित व घरंदाज होते. गावची महाजनकी या घराण्याकडे होती. बोल्होबा आंबिले यांचे सावजी, तुकोबा आणि कान्होबा असे तीन पुत्र होते.

तुकोबा तेरा वर्षांचे होईपर्यंत आईवडिलांच्या छत्रछायेत सुखी होते. तुकोबांची यथाकाल दोन लग्ने झाली. पुढे त्यांच्यावर दुःखाचे डोंगर कोसळले. सतराव्या वर्षी आईबाप वारले. पाठोपाठ वडीलबंधू सावजी विरक्त होऊन तीर्थाटनास निघून गेले. वयाच्या एकविसाव्या वर्षी तुकोबांवर आणखी आपत्ती आली. त्यांचे दिवाळे निघाले. दुष्काळात पहिली पत्नी रखमाबाई आणि पुत्र संताजी अन्नान्न करीत मरण पावले. काही व्यापार करावा, तर त्यातही त्यांचे नुकसानच होत होते. दुसरी पत्नी जिजाई उर्फ आवली कर्कशा होती. तिच्यापासून सुख तर सोडाच, पण चार लोकांत निंदानालस्ती होत होती. याप्रमाणे आतबाहेर पोळून निघालेले तुकाराम विरक्त झाले. प्रपंचाचा उबग येऊन त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधू लागले. चित्तवृत्ती देवापायी वाहून ते देहूजवळच्या एखाद्या डोंगरात जाऊन 'एकांतीचे सुख' अनुभवू लागले. 'ज्ञानेश्वरी' आणि 'एकनाथी भागवत' या दोन ग्रंथांचे चिंतनमनन त्यांनी आरंभिले. देहूतील विठ्ठल मंदिराचा जिर्णोद्धार करून निःशंक मनाने विठ्ठलभक्ती करू लागले.

तुकोबा आपल्या मनाने भक्तिमार्गावर चालत असताना त्यांच्यावर एकाएकी गुरुकृपा झाली. स्वप्नात त्यांना गुरुपदेश प्राप्त झाला.

‘सद्‌गुरुराये कृपा मज केली । परि नाही घडली सेवा काही ।
सापडविले वाटे जाता गंगास्नान । मस्तकी तो जाण ठेविला कर ।
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ।’

स्वप्नात तुकोबा गंगास्नानास जात असताना सद्‌गुरुंनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. राघवचैतन्य - केशवचैतन्य ही आपल्या ‘माळिकेची खूण’ सांगितली. आपले नाव ‘बाबाजी’ असल्याचे सांगितले. ‘रामकृष्ण हरी’ हा मंत्र दिला. स्वप्नात सद्‌गुरुंनी भोजनासाठी पावशेर तूप मागितले; पण तुकारामांना त्याचा विसर पडला. आपल्या हातून गुरुसेवेत अंतराय पडल्यामुळेच सद्‌गुरूंनी अंतर्धान पावण्याची त्वरा केली असे त्यांना वाटू लागले.

खरे पाहता स्वप्न म्हणजे मिथ्या. तुकारामांना जरी स्वप्नात उपदेश झाला आणि स्वप्न भंग पावले तरी गुरुपदेश सत्य कारण तो आत्मानुभवाच्या रूपाने फळास आला. गुरुदेव रानडे यांनी आपल्या 'Pathway to God in Hindi Literature' या पुस्तकात तुलसीदासांच्या ‘केशव कही न जाय’ या पदाच्या आधाराने सत्य व मिथ्या याची सांगड घातली आहे. ते म्हणतात की, मृगजळात राहणारी सुसर त्या मृगजळाकडे धाव घेणाऱ्या सर्व सजीव-निर्जीव वस्तूंना गिळून टाकते. यावरून असत्य कारणाचे सत्य परिणाम कसे घडून येतात ते दिसते. तुकोबांची महत्ता त्यांच्या अंगी मूळचीच होती. गुरूने त्यांना ज्ञान दिले. त्यामुळे त्यांनी इतकी उंची गाठली असे म्हणता येणार नाही. तुकोबांनी पारमार्थिक क्षेत्रातली सर्वोच्च अवस्था गाठली ती नामसाधनेच्या बळावर. त्यात गुरुपदेशाचे अंग होते असे मानले तरी ते फारच गौण होते असे म्हणावे लागेल.

तुकारामांचे सुमारे चारहजार पाचशे अभंग प्रसिद्ध आहेत. त्यांची अभंगवाणी अत्यंत रसाळ पण तितकीच निर्भीड आहे. त्यांच्या अभंगांत प्रासंगिक, पौराणिक, आख्यानपर, नामसंकीर्तन एकविधभाव, करुणा, संतांचा व पंढरीचा महिमा इत्यादी अनेक विषयांचा समावेश केलेला आहे. त्यांच्या अभंगवाणीची लोकप्रियता आजही जनमानसात कायम आहे. तिने सामान्यांनाच वेड लावले नाही तर अभ्यासक, जिज्ञासू, ज्ञानी या सर्वानाच तिचा महिमा ज्ञात आहे. ‘त्यांच्या अभंगसागरात कुठेही बुडी मारून वर यावे, तो हातात

मौक्तिकेच सापडतात आणि प्रत्येक वेळी नित्य नविन मौक्तिके!'[२४] 'तुकोबांची वाणी आजही जनमानसाला हलविते कारण जीवनाच्या प्रक्षुब्ध अनुभवातून आणि सूक्ष्म निरिक्षणातून ती प्रकट झालेली आहे.'[२५]

अशाप्रकारची तुकोबांबद्दल अनेक अभ्यासकांनी व्यक्त केलेली मते त्यांच्या एकूणच अभंगांचे महत्व पटवून देतात.

गुरुपदेशानंतर सतरा वर्षे परमार्थसुखात घालवून तुकोबा इहलोकाची आवराआवर करू लागले. वास्तविक त्यांच्या शरीराचा भाव कधीच प्रेतरूप होऊन 'आपुले मरण आपुल्या डोळा' पाहण्याचा सोहळाही त्यांनी अनुभवलेला होता. आता नाशिवंत शरीर त्यागण्याची वेळ आली होती. देव आणि भक्त हा भेद त्यांना मिटवून टाकायचा होता. देहाच्या बंधनाचा अखेरचा तंतू तोडून देवाशी पूर्णतः एकरूप व्हावे, अशी उत्कंठा त्यांना लागलेली होती. त्यांनी देवाला स्वतःस नेण्यास विनवले. देवाने त्यांची विनवणी ऐकली. शेवटी इ.स. १६४९ मध्ये तुकोबा सदेह वैकुंठाला गेले असे सांगितले जाते. 'तुकोबांचे जीवन, त्यांचे धार्मिक आणि सामाजिक कार्य, त्यांची जीवननिष्ठा, समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोण, वाणीतील प्रखरता, धारदापणा, प्रतिकार करण्याची जिद्द, भक्तीचा उमाळा, मानव्याप्रतीची कमालीची करुणा, आत्मशुद्धी आणि अद्वैताचे नेमके विवरण, सदाचार आणि नीतीची पाठराखण, संसार आणि परमार्थाची घातलेली उत्तम सांगड, शिवाजीचे स्वराज्याचे स्वप्न पूर्ण व्हावे, म्हणून शूरांचे साहस वाढविण्यासाठी रचलेले पाइकाचे अभंग, समाजात निर्माण झालेल्या परिवर्तनाचे तत्कालीन वातावरण आणि त्याचा भविष्यकाळात उमटलेला पडसाद हे सर्व पाहू जाता, तुकारामांची भूमिका धर्मसुधारक आणि समाजसुधारक अशी दोन्हींची होती, यात तिळमात्र शंका उरत नाही.'[२६]

## ५.२.१२. विठोबा उर्फ विठ्ठल :

बहिणाबाईंचे पुत्र आणि शिष्य म्हणजे विठ्ठल. त्यांचा जन्म शिऊर येथे झाला. बहिणाबाईंनी विठ्ठलावर आध्यात्मिक संस्कार केल्यामुळे विठ्ठलही संतपदाला पोचले होते. त्यांच्या पत्नीचे नाव रुक्मिणी

होते. रुक्मिणीचे देहावसान झाल्यावर तिच्या उत्तरक्रियेसाठी विठ्ठल गोदातीरी शुक्लतीर्थाला गेले असता, तेथे बहिणाबाईंनी त्यांना पत्र पाठवून त्यात आपल्या मृत्यूचा दिवस कळविला. तत्पूर्वीच विठ्ठलांना स्वप्न पडले होते, की आपल्या आईचा अंतकाळ जवळ आला असून तिला नेण्यासाठी वैकुंठाहून विमान आले आहे. अशातऱ्हेने विठ्ठलांना बहिणाबाईंच्या निर्गमनाची जाणीव आधीच झालेली होती.

आईचे पत्र मिळताच विठ्ठलाने शुक्लेश्वराजवळ समाधी-स्थान निश्चित केले. परत येऊन बहिणाबाईंना शुक्लेश्वराजवळ चलण्याची विनंती केली. बहिणाबाईंनी त्यांना तितकासा वेळ नसल्याचे सांगितले. शिऊरच्या प्रणितातीर्थाजवळ समाधी घ्यावी, अशी मनातली इच्छा त्यांनी बोलून दाखवली.

बहिणाबाईंनी आपल्या मृत्यूला तीन दिवस बाकी असताना विठ्ठलांना आपल्या बारा पूर्वजन्मांचा इतिहास सांगितला. या बारा पूर्वजन्मांमध्ये विठोबा व बहिणाबाई सोबतच होते. हा बहिणाबाईंचा शेवटचा जन्म होता. विठोबांना आणखी पाच जन्म घ्यावयाचे बाकी होते. त्यानंतर त्यांना मुक्ती मिळणार होती. त्यांचा हा जन्म बहिणाबाईंसोबतचा शेवटचा जन्म होता. या जन्मात ते पुष्कळ ज्ञान मिळवणार होते. बहिणाबाईंच्या निवेदनाप्रमाणे यापुढेही त्यांना एकाहून एक श्रेष्ठ जन्म मिळून ते योगभष्ट स्थितीत काही दिवस घालविणार होते. त्यांचे तीन जन्म काशीक्षेत्रात होणार होते. नंतर एक जन्म संन्याशाचा होता, ज्यात त्यांना बरेचसे चित्तस्थैर्य प्राप्त होणार होते. पाचव्या जन्मी वयाच्या अठराव्या वर्षीच त्यांना विदेहावस्था प्राप्त होणार होती व ते जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होणार होते. बहिणाबाईंनी सांगितलेली बारा पूर्वजन्मांची हकिकत विठ्ठलांनी लिहून ठेवली, हे त्यांचे फार महत्त्वाचे कार्य होय. त्यामुळेच बहिणाबाईंच्या अलौकिक चरित्राचा सर्वांना परिचय झाला.

शिऊरला उपलब्ध असलेले बहिणाबाईंच्या रचनांचे हस्तलिखित पुत्र विठ्ठल यांनी लिहिले आहे, असे मानले जाते. परंतु ती विठ्ठलकृत मूळ हस्तलिखिताची दुसरी नक्कल असावी, असे काही अभ्यासक मानतात.

जावडेकर प्रतीतील 'श्लोक ७९ अ' , 'श्लोक ७९ ब' व 'आर्या ७९ क' ह्या रचना बहिणाबाई व त्यांचे पती गंगाधरपंत यांच्याविषयी

असून त्यांचे पुत्र विठ्ठलमहाराज यांनी रचल्या असाव्यात. त्यात बहिणाबाईंच्या पतीचे नाव गंगाधर असे असून त्या दोहोंस नमन केले आहे. हे लिखाण बहिणाबाई स्वतः करणे अशक्यच आणि जर श्रीविठ्ठलांनीच त्यांच्या रचनांचे पहिले हस्तलिखित तयार केले असेल तर ह्या वंदनपर रचनाही विठ्ठलांच्याच असाव्यात.

विठ्ठलांनी आपल्या मातेलाच गुरू मानले. त्यांच्या गुणवर्णनात विठ्ठलांची लेखणी रमली. आपल्या आईवर त्यांनी दोन आरत्या रचल्या. विठ्ठलकृत पहिली आरती म्हणजे एका शिष्याने आपल्या परमप्रिय गुरूची गायलेली थोरवीच आहे. बहिणाबाईंवर रचलेल्या दुसऱ्या आरतीत त्यांच्या निर्याणासंबंधीची माहिती आलेली आहे.

बहिणाबाईंचे दीनकवी व पुत्र विठ्ठल यांच्याप्रमाणेच अन्य शिष्यही असतील, परंतु त्यांचा कुठेही उल्लेख आढळत नाही.

## ५.२.१३. दीनकवी :

विठ्ठलाशिवाय बहिणाबाईंचे आणखी एक शिष्य होते. त्यांचे नाव दीनकवी असे होते. त्यांच्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नसली, तरी त्यांनी 'पंचीकरण' नामक प्रकरण लिहिल्याचे संशोधकांना आढळून आले आहे.

शके १८३७ म्हणजेच इ.स. १९१५ मधील भा.इ.सं. मंडळ वार्षिक इतिवृत्तान्त प्रकाशित द.वा. पोतदारांच्या 'दीनकवीकृत पंचीकरण'मध्ये पृ. २७८-२७९ वर बहिणाबाईंचे शिष्य दीनकवी यांनी केलेल्या गुरुगौरवाचे उल्लेख आहेत. दीनकवींनी बहिणाबाईंची गुरुपरंपरा उपरोक्त ग्रंथात २८ ते ३० या क्रमांकावर आलेल्या रचनांमधून विशद केली आहे. ते म्हणतात,

'राघो चैतन्यें भरी । कैसो चैतन्ये पूर्ण लहरी ।
बाबा चैतन्यापरी । तेचि ते लाधली ।।
बाबा चैतन्य चैतन्यरूप । तुकोबा तो त्यांचा दीप ।
ज्याच्या वचनाचा प्रताप । ब्रह्मरूप जीवे होये ।।

बाप जयाची ते वाणी । वेदवदार्थनिरोपिणी ।
बहिणाबाईचिया ध्यानीं । तेचि मूर्ति ठसावली ।।'

दीनकवी हे बहिणाबाईंचे शिष्य होते. आपल्या गुरुबद्दल असलेला आदर त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रगट होतो. त्यांची गुरुपरंपरा सांगताना दीनकवी राघवचैतन्य - बाबाजीचैतन्य - तुकोबा - बहिणाबाई यांचा उल्लेख करतात. 'तुकाराम म्हणजे चैतन्यरूप आणि त्यांच्याच प्रतापाने बहिणाबाई इतक्या उंचीवर पोचल्या. माझ्याही मनात बहिणाबाईंची मूर्ती ठसलेली आहे' असे सांगून दीनकवी बहिणाबाईंशी त्यांचे कशाप्रकारचे संबंध होते, यावर प्रकाश टाकतात. अनंत जन्मांचे पुण्य म्हणून बहिणाबाईंचे त्यांना दर्शन घडले. दयाळू, ज्ञानी अशा बहिणाबाईंनी बाळपणापासूनच दीनकवींचे गुरुत्व स्वीकारले. दीनकवींना नामजपाचे महात्म्य सांगून परमार्थ मार्ग सांगितला. दीनकवींना बहिणाबाईंचेच इतके वेड लागले होते, की बहिणाबाईंवाचून त्यांना कुठलीही गोष्ट आवडत नसे.

दीनकवींच्या जीवनात घडलेल्या अनेक उलथापालथीही ते रचनांतून उलगडून दाखवतात. एकदा पंढरीची यात्रा आली असता दीनकवींनी त्यात विठोबाची मूर्ती बघितली. मूर्ती पाहून ते अतिशय प्रभावीत झाले. त्यांचे अध्यात्माकडे ओढले जाणे घरच्यांना पसंत पडले नाही. त्यांनी दीनकवींना बळेच व्यापार करायला लावले. त्यांचे मन व्यापारात रमले नाही. पुढे एक अपूर्व घटना घडली. एक गरीब ब्राम्हण 'ज्ञानेश्वरी'चे पारायण करीत असता दीनकवींना ज्ञानेश्वरांच्या रूपात विष्णू दिसू लागले. दीनकवींचे मन प्रापंचिक जगातून उडून गेले. त्यांना बहिणाबाईंच्या शरणी जाण्याचा साक्षात्कार झाला. ते तात्काळ बहिणाबाईंच्या शरणी आले. त्यांना आत्मज्ञान देऊन, सुखाचा मार्ग गवसून देण्याची विनंती केली. काही त्यांनी स्वतः प्रयत्न केले. काही बहिणाबाईंचे मार्गदर्शन लाभले. परिणामी दीनकवी परमार्थमार्गात उच्चस्थानी पोचले. 'मी'पणा निघून गेला. परंपरेने दिलेले त्यांचे विचार, व्यक्तिमत्त्व यांचा नाश होऊन नवे संपूर्ण अनासक्त असे दीनकवी मूर्त झाले. बहिणाबाईंच्या कृपाप्रसादाने त्यांना कवित्वशक्ती आली. जे काही थोडे काव्य त्यांनी केले, त्याला विनयाने ते स्वतःचे 'बोबडे बोल' म्हणून संबोधतात.

पुत्र विठ्ठल आणि दीनकवी यांच्यानंतर बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील पुढच्या व्यक्तीचा उल्लेख आढळत नाही. एकंदरीत आदिनाथ -

पार्वतीपासून सुरू होणारी बहिणाबाईंची गुरुपरंपरा मच्छिंद्रनाथ - गोरक्षनाथ - गहिनीनाथ - निवृत्तिनाथ - ज्ञानेश्वर - सच्चिदानंदबाबा - विश्वंभर - राघवचैतन्य - केशवचैतन्य - बाबाजीचैतन्य - तुकारामांपर्यंत येऊन पोचते आणि त्यानंतर तुकारामशिष्या बहिणाबाईंचे दोन शिष्य - विठ्ठल व दीनकवी यांच्यापर्यंत येऊन थांबते.

# ६. बहिणाबाईंच्या व्यक्तित्वाची जडणघडण आणि त्यांच्या वाङ्मयनिर्मितीवर पडलेला त्याचा प्रभाव :

बहिणाबाईंच्या चरित्राची अधिकृत साधने उपलब्ध नसली तरी त्यांची अभंगगाथा हेच त्यांच्या चरित्राचे मुख्य साधन मानता येईल. अभंगांतूनच आपले लौकिक आणि अलौकिक अनुभव मांडणाऱ्या आणि जीवनातील वैविध्यपूर्ण घटनांचे चित्रण करणाऱ्या बहिणाबाई मराठी सारस्वतात अजरामर झाल्या आहेत.

'बहिणाबाईंनी लिहिलेले आत्मचरित्र हे स्वतः त्यांचे चरित्र समजण्याचे महत्त्वाचे साधन तर आहेच; परंतु तुकोबांभोवती फिरत असल्यामुळे ते तुकारामचरित्राचेही अस्सल साधन आहे, तुकोबांच्या अन्य कोणाही समकालिनाने तुकोबांविषयक इतके चरित्रात्मक तपशील पुरवलेले नाहीत. विशेषतः तुकारामकालीन महाराष्ट्रात तुकोबांचे स्थान काय होते, तेव्हाचे लोक त्यांच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहात, याचा विश्वसनीय वृत्तांत बहिणाबाईंच्या अभंगांमधून मिळतो. बहिणाबाईंनी या नोंदी केल्या नसत्या, तर तुकाराम चरित्रातील महत्त्वाच्या भागाला आपण कायमचे मुकलो असतो.'[२७] अशा तुकोबांना बहिणाबाईंनी गुरू मानले आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व बदलून गेले.

बहिणाबाईंचे चरित्र म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसाच होय. बहिणाबाईंच्या चरित्रात त्यांच्या साधकावस्थेच्या मार्गात अडचणीच जास्त आलेल्या दिसतात. एक सामान्य मुलगी आपली भक्तीची उत्कट इच्छाही पूर्ण करू शकत नाही. त्याकरिता तिला आप्तांकडून, समाजाकडून फार मोठा विरोध सहन करावा लागतो. मात्र हा विरोध आणि त्रास सहन करीत, विरोधाचा सामना करीत अखेर आपल्या इच्छित स्थळी पोचणाऱ्या बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा विजय झालेला दिसतो.

बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर नजर टाकताना लक्षात येते की, त्या आलेल्या परिस्थितीला आपले नशीब मानून ती परिस्थिती निभावून नेणाऱ्या एक स्त्री आहेत. त्यांचा विवाह वयाच्या तिसऱ्या वर्षीच झाला. त्या काळातील चालीरीती पाहता हे बरोबर असेलही; परंतु त्यांचा विवाह एका तीस वर्षीय बिजवराशी झालेला आहे. बहिणाबाईंचे हे वय

म्हणजे न कळणारे वय होय; परंतु पुढेही या प्रकाराबद्दल त्या कुठलीही तक्रार करताना दिसत नाहीत किंवा त्यांच्या काव्यात नाराजीचा सूरही उमटलेला नाही. त्यांचे चरित्र त्यांच्या अभंगांतूनच प्रकटते. त्यांची नाराजी, खेद, तक्रार त्या त्यातून मांडू शकल्या असत्या; पण उलट त्या म्हणतात,

'द्वितीय समंधी वरुषा तिसाचा । नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ।।
बहेणि म्हणे त्यासी कन्यादान केले । आंदन दिधले सर्व काही ।।'
(अभंग क्र. ६, ओ. ३, ४)

बहिणाबाईंच्या आणि त्यांच्या पतीच्या वयात एवढे मोठे अंतर असूनही त्यासंबंधाने नाखुषी न दाखवता, उलट पतीची त्या स्तुतीच करतात, हे उल्लेखनीय आहे. बहिणाबाई आपल्या आईवडिलांना नवसासायासाने झालेल्या प्रथम कन्या, त्यात पायगुणानेही चांगल्या, त्यामुळे आईवडिलांच्या लाडक्या. तरीही आईवडिलांनी अशाप्रकारचा विवाह करून काय साधले, हा प्रश्नच आहे.

पुढे बहिणाबाईंच्या आईवडिलांकडून लग्नात घेतलेले ऋण फेडता न आल्याने कलह निर्माण होऊन त्यांनी गावाचा त्याग केला. बहिणाबाईंच्या भ्रतारासही बोलावून घेतले. अशाप्रकारे बहिणाबाईंचे कुटुंब परागंदा होऊन भटकंती करू लागले. येथेही बहिणाबाई मुकाटपणे आपल्या कुटुंबीयांच्या मागोमाग निघालेल्या दिसतात. गावोगाव भटकंती, भिक्षा मागून उदरनिर्वाह असे कष्टमय जीवन त्यांना व्यतीत करावे लागले. अशा विपरीत परिस्थितीतही गावोगाव होणारे देवदर्शन त्यांना जास्त सुखमय वाटत होते. यावरून त्यांच्या मनातला भक्तिभाव लहानपणापासूनच कसा मूळ धरून होता, हे दिसून येते. त्या म्हणतात,

'गंगा देखोनिया सिद्धेश्वर देव । तेथोनिया जीव निघो नेणे ।।
आवडीचा हेत पूर्वील संस्कार । श्रवणी आदर कीर्तनाचे ।।'
(अभंग क्र. ८, ओ. १, २)

त्यांच्या अभंगात कुठेही कष्टांचे चित्रण दिसत नाही; उलट देवदर्शनाचे सुख जागोजागी प्रकट झाले आहे. शंभूमहादेवास पाहून त्यांच्या मनात येते की कोरान्नाचे कण आपण सहज कुठेही मिळवू शकू; पण हे असे देवदर्शन मिळवण्यासाठी पुण्यच पाठीशी असावे लागते. यावेळी बहिणाबाईंचे वय केवळ अकरा वर्षांचे होते. इतक्या बालवयात भक्ती रुजल्यामुळे पुढील आयुष्यात या भक्तीचे डेरेदार वृक्षात रूपांतर झाल्याचे दिसून येते.

बहिरंभटाकडे वास्तव्य करीत असताना बहिणाबाईंना रोज भागवत-पुराण ऐकायला मिळू लागले. विद्यार्थ्यांना शिकवले जाणारे वेदपाठ, त्यांच्यात चाललेली आत्मविद्येची चर्चा कानावर पडू लागली. आधीच्याच परमार्थसन्मुख मनाला भागवत, वेदपाठाचे संस्कार अधिकच आध्यात्मिकतेकडे बहिणाबाईंना ओढताना दिसतात.

पुढे गायवासराच्या प्राप्तीनंतर त्यांच्यात वात्सल्याचा भाव जागृत झाला. या गोवत्साची सेवा करण्यात बहिणाबाईंच्या आयुष्याला एक नवे वळण मिळाले. त्यांच्या रागीट नवऱ्याला मात्र बहिणाबाईंचे हे सुखही पाहावत नव्हते; पण वासराने लावलेल्या लळ्यामुळे त्याच्याही मनात प्रेमळ भाव निर्माण होऊन त्याने बहिणाबाईंना गायवासराची सेवा करण्याची मुभा मोठ्या मनाने दिली. आपला गायवासराशी असलेला प्रेमळ भाव आपला नवरा खपवून घेतो, हेही बहिणाबाईंना स्वतःवर उपकार केल्यासारखे वाटते. त्यांना मूलबाळ नाही, म्हणून यातच विरंगुळा शोध, असे म्हणून तिचा नवरा तिची टिंगल करतो; पण बहिणाबाईंना त्याचेही काही वाटत नाही. त्या निर्मळ मनाने आपल्या गायवासरांत रमलेल्या दिसतात.

बहिणाबाईंच्या पतीच्या रागीट स्वभावाबरोबरच त्याच्या संशयी स्वभावाची ओळख पटते, ती जयरामस्वामींच्या कीर्तनप्रसंगावरून. जयरामस्वामींच्या कीर्तनाहून परतण्यास रात्री उशीर झाला असता, दुसऱ्या दिवशी एका चुगलखोर स्त्रीने बहिणाबाईंच्या पतीचे कान भरल्यावर पत्नीवर संशय घेऊन त्यांनी बहिणाबाईंना बेदम मारले. हरिकथेत अप्रतिष्ठा करावयास जाते, पुराण वगैरे सगळे बहाणे आहेत, असे म्हणून तो बहिणाबाईस मारत होता.

बहिणाबाईंच्या ईश्वरप्रेमाची कदाचित ही पहिली परीक्षा होती. 'बिचाऱ्या बहिणाबाईने केवळ भगवत्प्रेमासाठी एवढ्या लहान वयात इतका छळ सोसला, हे ऐकून परम भागवत प्रल्हादाची आठवण कोणास होणार नाही? आपल्या ईशप्रेमात अंतराय आणणाऱ्या भ्रताराचा त्याग करण्याची कल्पनाही बहिणाबाईंच्या मनात आली नाही व आली असती, तरी त्या कालात तसे करणे तिला शक्यही नव्हते. शिवाय अकरा वर्षांच्या मुलीच्या मनात असले विचार कुठून येणार? पती हाच परमेश्वर आणि तो करील ते प्रमाण, ही तत्कालीन स्त्रियांची समजूत.'[२८] बहिणाबाईंच्या पतीस सोडून न

जाण्याच्या विचारांनी त्या भक्तीच्या पहिल्याच परीक्षेत उत्तीर्ण होतात. प्रपंच, परमार्थ दोन्ही साध्य करण्याच्या दृष्टीने ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

बहिणाबाईंचा सद्‌गुरुविषयीचा कळवळा अभंगांतून वारंवार व्यक्त झाला आहे. 'मत्स्य जैसा जळावाचुनि चरपुडी । तैसी ते आवडी तुकोबाची ।।' असे सद्‌गुरुविषयी म्हणून एखाद्या गोष्टीचा ध्यास घेण्याची वृत्ती त्या दर्शवितात.

बहिणाबाई जातिभेदमूलक श्रेष्ठत्वकनिष्ठत्वाच्या कल्पनांपासून योजने दूर होत्या, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उजळ बाजू आहे. ब्राम्हण समाजात जन्म झाला असता, तुकोबांना आपले गुरू मानणे, ही त्या काळातल्या रीतिरिवाजांच्या मानाने धाडसाचीच गोष्ट आहे. रामदासस्वामी, रंगनाथस्वामी, जयरामस्वामी, वामन, आनंदमूर्ती, केशवस्वामी इत्यादी अनेक ब्राम्हण संत महाराष्ट्रात त्यावेळी कार्यरत असताना या ब्राम्हण स्त्रीने त्यापैकी कोणाचेही शिष्यत्व न स्वीकारता तुकोबांचेच शिष्यत्व पत्करले. यावरून जातिभेदाची कल्पना त्यांच्या मनाला कधी शिवली नाही, हेच सिद्ध होते.

याविरुद्ध बहिणाबाईंचा भ्रतार जातिसंकल्पनेने प्रभावीत असल्याने तुकारामांनी बहिणाबाईंना दृष्टांत दिला असता, आनंदी न होता रागाने त्या दोघांचीही निर्भर्त्सना करताना दिसतो. बहिणाबाईंना आध्यात्मिक उन्नतावस्थेत जाताना पाहून त्याचा जळफळाट होतो. 'आपण वेदपाठ करणारे ब्राम्हण आणि तुकाराम हा शूद्र. त्याने माझ्या बायकोस स्वप्नात दर्शन दिले, त्यामुळे ती बिघडली', अशी दूषणे देतो. मत्सराने पेटून बहिणाबाईंचा त्याग करून वनात जाण्याचे जाहीर करतो.

या त्याच्या वर्तनावरून तो अगदी अरसिक आणि ग्राम्य असून पारमार्थिकतेचा त्याच्या ठायी लवलेशही नव्हता, हे कळून येते. या उलट बहिणाबाई आध्यात्मिक वृत्तीने भारलेल्या, वत्सल, प्रेमळ, त्यागी, सहनशील, मर्यादाशील, शांत अशा गुणांनी परिपूर्ण दिसतात. त्यांच्या स्वभावाची खरी ओळख तेव्हाच होते, जेव्हा त्यांचा पती 'परमार्थ किंवा मी' असे पर्याय त्यांच्यासमोर ठेवतो. एकीकडे सद्‌गुरूची लागलेली ओढ, जळाशिवाय तडफडणाऱ्या माशासारखे होत असलेले मन तर दुसरीकडे असा भ्रतार, ज्याने आतापर्यंत तिचा छळ केला आहे, तिच्या परमार्थमार्गात जो धोंडा बनून उभा आहे, अशी द्विधा मनःस्थिती होते. तेव्हा बहिणाबाई पतीचा

तिरस्कार न करता, पतीशिवाय पत्नीच्या आयुष्याला अर्थ नाही, प्राणाशिवाय देहास जशी शोभा नाही, अशी स्वतःच्या आयुष्यातील पतीची जागा अधोरेखित करीत सद्‌गुरूचा ध्यास सोडण्याचा निर्णय घेतात. त्यांची ही कृती कोणत्याही पतिव्रतेसमोर आदर्श ठेवणारी आहे.

बहिणाबाईंची श्रद्धा होती की, आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या यातना हा आपल्या जीवनाचाच एक आविभाज्य भाग आहे. तो कसा चुकेल, याची त्यांना भ्रांत नव्हती. उलट असे प्रसंग वारंवार यावेत म्हणजे आपली भक्ती दृढ होईल असा त्या विचार करीत. बहिणाबाईंची परीक्षा घेऊन कदाचित ईश्वराला दया आली असावी; म्हणून त्यांच्या पतीला शारीरिक दाह निर्माण करून विचार करण्यास भाग पाडले. ब्राम्हणाचे रूप घेऊन त्याला दृष्टांत दिला आणि त्याचे मन वळविण्यात यशस्वी झाले. बहिणाबाईंची तपःसाधना इतकी दृढ होती, की त्यांच्या मदतीसाठी ईश्वरालाही कार्यरत व्हावे लागले.

बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल झाला तो तुकारामांचे दर्शन होऊन त्यांचा वरदहस्त लाभल्यावर. त्यांचे अंतरंग जणू सुखाने डोलू लागले. शिवाय त्यांना झालेली कवित्वाची स्फूर्ती. यामुळे आपले अनुभव त्यांनी अभंगरूपात साठवून ठेवण्यास सुरुवात केली. हे अभंग म्हणजेच बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्वाने आकार देण्यास कारणीभूत ठरले.

मंबाजीने बहिणाबाईंच्या भक्तिमार्गात आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. 'बहिणाबाईने सहकुटुंब-सहपरिवार आपले शिष्यत्व पत्करावे, अशी त्याची इच्छा होती. आपण तुकोबांचे स्वप्नानुग्रहित आहोत, असे बहिणाबाईंनी सांगितल्यावर त्याचा तिळपापड झाला. त्याने ब्राम्हणाने शूद्र गुरू करावा का, असा मूलभूत प्रश्न करून पाहिला. बहिणाबाई ब्राम्हणच नाहीत, असा प्रचार करून पाहिला. 'स्वप्नीचा अनुग्रह गुरु केला शूद्र । तोही बळिभद्र ज्ञानहीन ।। तुम्हास वाळीन ब्राह्मणांचे पंक्ती ।' (अभंग क्र. ४६, ओ. ९, १०) अशी धमकीही त्याने दिली. परंतु महादजीपंत कुलकर्णी, कोंडाजीपंत हे ब्राम्हणच तुकोबांचे चाहते असल्याने ही मात्रा लागू पडेना. तेव्हा त्याने पुणे येथे आपाजी गोसावी नामक राजयोगी होते, त्यांच्याकडे तक्रार नोंदविली. अर्थात आपाजी गोसावी पुरेसे हुशार असल्याने 'होय यथाकाले कार्यसिद्धी' असे खास प्रशासकीय उत्तर त्यांनी मंबाजीला धाडले.'[२९] बहिणाबाईंनी याही

संकटाला धीराने तोंड दिले. मंबाजीसारख्या प्रसिद्ध ब्राम्हणासमोर त्या डगमगल्या नाहीत. आपल्या प्रारब्धातच हे लिहिलेले आहे हे जाणून देवालाच यातून सोडविण्याची विनंती करतात. गायीचे हरण करून तिला कोंडून तिला मारले असता त्या माराचे वळ तुकारामांच्या पाठीवर उमटणे यातून तुकारामांचे बहिणाबाईंशी असलेले निकटत्व दिसून येते.

बहिणाबाईंच्या समग्र अभंगांत त्यांचे आत्मवृत्तपर व निर्याणपर अभंगांचे स्थान विशेष महत्वाचे आहे. बहिणाबाईंनी आपले जे व्यक्तिचित्र उभे केले आहे ते अतिशय हृद्य व त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न करणारे आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू या अभंगांच्या द्वारे आपल्यासमोर उभे राहतात. 'कोणत्याही रसिकाचे हृदय हलवून सोडणाऱ्या करूण रसाच्या प्रभावामुळे या आत्मवृत्ताला वाङ्मयीन आकर्षकता प्राप्त झाली आहे. त्यांच्या निर्याणपर अभंगात बहिणाबाई कवयित्री म्हणून नव्हे, संत म्हणूनही नव्हे तर महायोगिनी म्हणून प्रगट झालेल्या आहेत. पुनर्जन्माच्या अभ्यासाचे एक विश्वसनीय साधन म्हणून त्यांचे निर्याणपर अभंग अतिशय उपयुक्त आहेत.'[३०] बहिणाबाईंनी वर्णन केलेल्या बारा पूर्वजन्मकथनामुळे त्यांच्या चरित्राला अलौकिक छटा लाभलेली आहे. देवाच्या चित्रात त्यांच्या मस्तकामागे असलेला प्रकाश जसे त्यांना अलौकिकत्व प्राप्त करून देतो. तसे बहिणाबाईंचे हे कथन त्यांना सामान्यांपासून असामान्यांकडे नेऊन सोडतात.

बहिणाबाई केवळ आध्यात्मिक दृष्टीनेच उन्नती पावलेल्या नाहीत तर त्यांच्या सामाजिक जाणिवाही तेवढ्याच प्रगल्भ आहेत. तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर त्या कोरडे ओढतात. तसेच मुसलमानी राज्याची 'कलियुग' म्हणून संभावना करतात. पाखंडी साधूंवरही आपल्या कठोर वाणीने प्रहार करतात; परंतु 'महारापोराचा पहिला कैवारी म्हणून, समाजाच्या उपेक्षित वर्गात जाऊन पोचणारा पहिला माणूस म्हणून, त्या पिचलेल्यांच्या भाषेत बोलणारा पहिला वक्ता म्हणून, त्यांची दुःखं जगापुढे मांडणारा पहिला वकील म्हणून'[३१] जसे संत एकनाथांकडे पाहिले गेले, किंबहुना त्यांच्या कार्यकर्तृत्वात जशा उपेक्षितपीडितांच्या संदर्भातील सामाजिक जाणिवा प्रखरेतेने येतात, तशा बहिणाबाईंच्या काव्यात मात्र दिसत नाहीत, हेही खेदाने नमूद करावे लागते.

एक स्त्री म्हणून बहिणाबाईंनी स्त्रियांना विशेष जिव्हाळ्याने उपदेश केला आहे. स्वतःच्या चरित्रातून त्यांनी प्रपंचाचे महत्त्व पटवून दिलेले आहेच. सोबतच पतिव्रतांना उपदेश, तुळशीचे महात्म्य, परपुरुषाचा ध्यास असे

अनेक विषय हाताळून त्या स्त्रियांशी हितगूज करतात. 'प्रपंच व परमार्थ दोन्ही एकाच वेळी करून जीवन्मुक्त स्थिती प्राप्त करून घेणाऱ्या योगमार्गाने देह ठेवणाऱ्या ज्यांचा सासर व माहेरचाही वंश परंपरेने अद्यापही चालू आहे व अभंग वाङ्मयाचा वारसा मागे ठेवून महाराष्ट्र सारस्वतात ज्या अमर झाल्या, अशा सर्व गोष्टी ज्यांच्या ठिकाणी एकवटल्या आहेत, अशा बहिणाबाई एकमेव संत-स्त्री आहेत.'[३२]

बहिणाबाईंच्या पतिनिष्ठेविषयी जितके लिहावे, तितके थोडेच. पतिनिष्ठेमुळेच त्यांच्या चरित्राला वेगळे महत्त्व प्राप्त झाले. पतीचे मतपरिवर्तन हा त्यांच्या पतिव्रताधर्माचा विजय आहे. त्यांच्या सेवाधर्मामुळे कर्मठ पतीला त्यांच्यासमोर नमावे लागले. तीनशे वर्षांपूर्वीच्या सामाजिक परिस्थितीत एका अल्पवयीन स्त्रीने दाखविलेले हे कर्तृत्व म्हणजे अखिल स्त्रीजातीची विजय पताका आहे.

बहिणाबाईंची गुरुपरंपरा अतिशय उच्च दर्जाची आहे. त्याची सुरुवाततर प्रत्यक्ष परमेश्वरापासून - आदिनाथापासून झालेली आहे. गुरुपरंपरेतील सुरुवातीचे गुरू नाथ संप्रदायी आहेत. मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ या सर्वच व्यक्ती नाथ संप्रदायातील कर्तृत्ववान व्यक्ती आहेत. त्यामुळेच बहिणाबाईंच्या वाङ्मयात नाथ संप्रदायी तत्त्वज्ञानाचे पडसाद थोड्या प्रमाणात का होईना, उमटलेले दिसतात.

नाथपंथीयांमध्ये प्रथमतःच स्त्रीशूद्रादिकांना समान पातळीवर गणल्या गेले. त्यांच्यातील भेदाभेद नष्ट केल्या गेला. सर्व मनुष्य समान असतात, मग ते स्त्री असो की पुरुष असो, ब्राम्हण असो की चांडाळ असोत. नाथ संप्रदायाचे हेच तत्त्वज्ञान बहिणाबाईंच्या वाङ्मयात आढळते. त्याचमुळे ज्या काळात स्त्रीला परमार्थ मार्गातील अडथळा समजला जात असे, त्या काळात बहिणाबाई परमार्थमार्गातील उच्च पायऱ्या चढून गेल्या.

नाथ संप्रदायातील द्वैत व अद्वैत यांचा योग्यप्रकारे साधलेला समन्वय बहिणाबाईंनी आपल्या वाङ्मयातून आविष्कृत केला. आधी भक्तिरूपाने परमेश्वराशी द्वैत साधून परमेश्वर साक्षात्कारानंतर आत्मानंदात मग्न झालेल्या बहिणाबाई परमेश्वराशी पूर्णतः अद्वैत साधतात. नाथ संप्रदायात कर्मठ, कठीण आचारधर्माचे पालन करणारे, तापसी, नग्नव्रती, जप, तप, अनुष्ठान करणारे या सर्वांना 'दुःखभारनिरत' म्हणजे दुःखाची ओझी वाहणारे असे संबोधले आहे. बहिणाबाईंनी आपल्या अभंगांतून जप, तप, व्रत,

अनुष्ठान आदी करणाऱ्यांवर टीका केली आहे. अशा मार्गाने देव कधीही प्राप्त होत नाही, असे त्यांनी ठासून सांगितले आहे.

बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील पुढील गुरू म्हणजे निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सच्चिदानंदबाबा, विश्वंभर हे वारकरी संप्रदायातील गुरू होते. त्यातील निवृत्तिनाथांनी दीक्षा जरी नाथपंथीयांकडून घेतली, तरी कार्य मात्र वारकरी संप्रदायाचे केले. मध्ये राघवचैतन्य, केशवचैतन्य व बाबाजीचैतन्य या चैतन्यसंप्रदायी गुरुंनंतर पुन्हा तुकोबा, बहिणाबाई, विठ्ठल व दीनकवी अशी वारकरी परंपरा सुरू होते.

बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील राघवचैतन्य, केशवचैतन्य व बाबाजीचैतन्य या गुरूंविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. ते चैतन्य संप्रदायी अथवा नागेश संप्रदायी असतील की नाही, हेही निश्चित सांगता येत नाही. तरी चैतन्यसंप्रदायाशी त्यांचा संबंध जोडून चैतन्य संप्रदायाचे तत्त्वज्ञान अभ्यासल्यास त्यात श्रीकृष्ण हे मूळ तत्त्व मानल्याचे दिसते. श्रीकृष्णाच्या ठिकाणी अनंतशक्ती राहतात, अशी त्यांची श्रद्धा आहे. चैतन्य संप्रदायात भक्तीचा मार्ग अनुसरला जातो. समाजसेवेला विशेष महत्त्व आहे.

बहिणाबाईंनीही आपल्या अनेक अभंगांत कृष्णभक्तीचे दर्शन घडविले आहे. त्यांची हिंदी पदे तर कृष्णलीलांनीच रंगली आहेत. याशिवाय अनेक पदे, आरत्या, श्रीकृष्णवर्णन करणाऱ्या आहेत. बहिणाबाईंमध्ये असलेला श्रीकृष्णभक्तीचा ओढा कदाचित नागेश शाखा चैतन्य संप्रदायी गुरूंचीच देणगी असावी.

बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील वारकरी गुरूंचा बहिणाबाईंवर किती मोठा प्रभाव आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. वारकरी संप्रदायाची धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर पेलून बहिणाबाईंनी आपले वारकरी संप्रदायित्व सिद्ध केले आहे. तुळशीमहात्म्य, पंढरी, चंद्रभागामहात्म्य, पुंडलिकमहात्म्य अशा वारकरी संप्रदायातील पूज्यनीय गोष्टी बहिणाबाईंच्या अभंगांत वेळोवेळी दृष्टोत्पत्तीस पडतात. वारकरी संप्रदायाचा कणा असलेला भक्तिमार्ग, नाममहात्म्य आपल्या आचरणातून अवलंबित बहिणाबाई भक्तीचे व नामाचे अनेक आदर्श उभे करतात. यावरूनच बहिणाबाईंवर वारकरी संप्रदायाचा किती खोलवर परिणाम झाला होता, हे दिसून येते.

अशाप्रकारे बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील विविध गुरूंचा व त्यांच्या विविध संप्रदायांचा काही ना काही प्रभाव बहिणाबाईंच्या वाङ्मयावर पडलेला दिसून येतो.

एकंदरीत बहिणाबाईंचे व्यक्तिमत्त्व आणि त्याचा त्यांच्या वाङ्मयावर पडलेला प्रभाव पाहता त्यांचे अभंग म्हणजे हृदयाकडून हृदयाकडे प्रवास करणारे वाटतात. स्वानुभवाने उमललेली ही फुले रसिकांच्या मनाला सुगंधित करतात. करुण रसाने ओथंबलेली त्यांची वाणी संवेदनशील मनाला कारुण्याने भारून टाकते. विविध प्रसंगांतील त्यांची मनःस्थिती, जसे भ्रमंतीकाळात तीर्थक्षेत्रांच्या पवित्र व प्रसन्न वातावरणात त्यांचे चित्त रमून जाई; पण काही काळाने पुन्हा करंटे अदृष्ट त्यांना भलत्याच दिशेला फरफटत नेई. अशा वेळी मनाची जी तडफड होई, तिचे चित्र बहिणाबाईंनी आपल्या आत्मचरित्रात उत्कटपणे रेखाटले आहे. कथाकीर्तनापायी पतीकडून छळ झाला असता, अशाही स्थितीत आपण स्वतःचा व आपल्या पतीचा उद्धार कसा केला, याचे अत्यंत रसाळ कथन त्यांनी केले आहे. कोल्हापूरला त्यांना ज्या जयरामस्वामींच्या दर्शनाचा लाभ झाला, त्यांचे व्यक्तिचित्र अत्यंत आदरपूर्वक असे त्यांनी आपल्या अभंगांतून रेखाटले आहे. पंढरीस पांडुरंग दर्शन घेताना त्या म्हणतात,

‘पांडुरंग-मूर्ति देखोनी पवित्र । संतोषले नेत्र इंद्रियेसी ।।
वाटे मनामाजी राहावे येथेची । परी प्राक्तनाची दशा नाही ।।’
(अभंग क्र. ९, ओ. ८, १०)

अशी आनंद आणि व्यथा दर्शविणारी संमिश्र अवस्था त्यांच्या अभंगांत वेळोवेळी प्रकटली आहे. आवडते वासरू सोडून गेल्यावर त्यांच्या मनात आणि जीवनात निर्माण झालेली पोकळी तुकोबांच्या दर्शनासाठी हेलावणारे त्यांचे अंतरंग आणि प्रत्यक्ष तुकोबांचे दर्शन झाल्यावर ‘आनंद हा चित्ता सामावेना’ अशी सुखावस्था ही सारी भावस्पंदने त्यांनी आपल्या अभंगांतून अतिशय हळुवारपणे टिपली आहेत.

‘बहिणाबाईंची एकंदर रचनाशैली प्रौढ, सुसंस्कृत अवस्थेची द्योतक आहे. तिच्या काव्यातील भावोत्कटता अनुभवातून आलेली आहे आणि तिचे अनुभव एका उच्चवर्णीय घरंदाज स्त्रीच्या लोकविलक्षण जीवनातले आहेत. यामुळे बहिणाबाईंच्या रचनांना एक आगळे वैभव प्राप्त झाले आहे.

मराठी संतांच्या काव्यरचनेची 'फडकती ध्वजा' म्हणूनही बहिणाबाईंचा उल्लेख मराठी साहित्याच्या इतिहासात होणे क्रमप्राप्त आहे.'[३३]

एकंदरीत, असंख्य अडचणी, समस्या यांमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत दुःख, वेदना, अन्याय यांवर मात करीत बहिणाबाईंचे व्यक्तित्वाची जडणघडण होत गेली. पांडुरंगाकडे आणि पर्यायाने अध्यात्माकडे आकर्षिल्या गेलेल्या पतिव्रता बहिणाबाईंचे व्यक्तिमत्त्व अन्यायाच्या भट्टीत तावूनसुलाखून निघाले आणि सोज्ज्वळता, पवित्रता, सहनशीलता अशा गुणांनी फुलत गेले. साहित्यशास्त्राच्या नियमानुरूप त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्यांच्या वाङ्मयनिर्मितीवर पडत गेला आणि जगापुढे एक आगळावेगळा आविष्कार त्यांच्या अभंगांच्या रूपाने साकार झाला.

# ७. संत बहिणाबाईंचे आध्यात्मिक व तत्त्वज्ञानपर अभंग :

'संतसाहित्य' आणि 'आध्यात्म' यांना वेगळं करून चालत नाही. संतवचनांमध्ये किंवा संतांच्या साहित्यनिर्मितीत 'आध्यात्म' हे अपरिहार्यपणे येते. त्याचे प्रमाण सर्वाधिक असते. संतप्रवृत्तीनुसार हे प्रमाण कमीअधिक असू शकते. संत हे समाजप्रबोधनासाठी जन्माला आले, असे म्हटले जात असले तरी त्यांच्या समाजप्रबोधनाचा पाया 'आध्यात्म' हाच आहे. संत बहिणाबाईही याला अपवाद नाही. त्यांच्या अभंगांत आध्यात्मिक अभंगांचे प्रमाण अधिक आहे. तत्त्वज्ञान व अध्यात्म यांचा परस्परसंबंध जोडून बहिणाबाईंनी आपल्या अभंगांतून तो मांडलेला आहे. त्यांच्या अध्यात्मपर अभंगांतच त्यांची तत्त्वज्ञानात्मक भूमिका मिसळून गेल्याचे लक्षात येते. जे अभंग तत्त्वज्ञानपर म्हणून वर्णावे, त्यात अध्यात्म आहे आणि जे अध्यात्मपर म्हणावे, त्यात तत्त्वज्ञानाचेच अंश अधिक आहेत; आणि म्हणूनच आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानपर अभंगांची एकत्र चर्चा केलेली आहे.

बहिणाबाईंची वेदनिष्ठा त्यांच्या अभंगांतून ठायीठायी जाणवते. त्यांनी सांगितलेले वेदमहात्म्य, वेदोत्पत्ती, वेदांचा मथितार्थ त्याचप्रमाणे कर्मयोग यांचे वर्णन करून त्या आपली वेदनिष्ठा सिद्ध करतातच; परंतु माया, ब्रम्हनिरूपण, सगुणनिर्गुण परमेश्वरी स्वरूप, ईश्वरजगत संबंध, जिवाचा बंधमोक्ष असे अनेक वेदान्तपर मुद्दे हाताळून त्यांनी या विषयातील आपले वर्चस्व दाखवून दिले.

आत्मा म्हणजे देह नव्हे. आत्मा म्हणजे इंद्रिय नव्हे. आत्मसत्ता काय असते, आत्म्याचे स्वरूप काय असते, पूर्णद्वैत अद्वयानंदवैभव काय असते, हे बहिणाबाईंच्या ज्ञानयोगपर अभंगांतून कळते. सद्गुरुकृपेपासून सिद्धावस्थेपर्यंत, एवढेच नव्हे तर जीवन्मुक्तावस्थेपर्यंतचे मार्गदर्शन त्यांच्या 'तत्त्वज्ञानपर अभंगां'तून होते.

## ७.१. बहिणाबाईंचे ब्रम्हकर्मपर अभंग :

संत बहिणाबाईंना तुकोबांच्या अभंगवाणीची भुरळ पडली. तुकोबांचा अनुग्रह व्हावा, या अखंड तळमळीने त्यांनी धावा केला असता, त्यांना तुकोबांचा स्वप्नानुग्रह लाभला. तुकोबा शूद्र म्हणून त्यांना बराच विरोध झाला. तरी बहिणाबाईंनी तुकोबांप्रती एकनिष्ठा कायम ठेवली. देहूस तुकोबांचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर तुकोबांच्या ठायी आदर्श ब्राम्हणत्व बाणले आहे, याची खात्री बहिणाबाई व त्यांच्या पतीलाही झाली. मंबाजीने आपला अनुग्रह घ्यावा, म्हणून त्यांच्याकडे आग्रह धरला. त्यावेळी तुकोबा शूद्र व मंबाजी ब्राम्हण, त्यामुळे मंबाजीलाच गुरू मानावे का, असा प्रश्न त्यांना पडला नाही. बहिणाबाईंचे पती संस्कृतचेही जाणकार होते. त्यांनी अभ्यासिलेले 'वज्रसूचिउपनिषद' बहिणाबाईंनाही शिकविले असावे. म्हणूनच त्यातील जन्मजात ब्राम्हण्यावर आघात करणारी विचारसरणी बहिणाबाईंच्या अभंगांतून दिसते.

' 'वज्रसूचिकोऽपनिषद' हे जन्मजात ब्राम्हण्यावर कठोर आघात करणारे उपनिषद आहे. ते नव्य उपनिषदात मोडत असले तरी त्याची प्राचीनता इसवीसनाच्या नवव्या शतकाच्या मागे जाते. याचा रचनाकार कोण, हे समजण्यास साधन नाही. इ.स. १८२९ मध्ये याची एक प्रत हडसनला नेपाळात उपलब्ध झाली. हडसनला तिथे अशी पारंपरिक माहिती ऐकायला मिळते, की याचा कर्ता अश्वघोष (इ.स.चे दुसरे शतक) आहे. इ.स. १७१० मध्ये नकललेली एक प्रत नाशिक येथे उपलब्ध झाली. हे उपनिषद आद्यशंकराचार्यांनी रचले आहे, अशी समजूत महाराष्ट्रात आढळते. इ.स. ९७३–९८१ या काळात याचा चिनी भाषेत अनुवाद झाला होता. तिथे त्याचा कर्ता धर्मकीर्ती असल्याचे सांगतात. निर्णयसागर, खेमराज, श्रीकृष्णदास आणि सर्वहितैषी कंपनी (काशी) या संस्थांनी प्रकाशित केलेल्या उपनिषत्संग्रहात या उपनिषदाचा समावेश आहे. हे उपनिषद गद्यात असून आकाराने अगदी छोटे (क्राऊन १ पान) आहे. 'ब्राम्हण कोण?' हा या उपनिषदाचा प्रतिपाद्य विषय आहे. जीव, देह, जाती, ज्ञान, कर्म वा धर्म यांनी ब्राम्हणत्व सिद्ध होते. असा याचा मथितार्थ आहे. याची भाषा अत्यंत तीव्र असली, तरी तर्कशुद्धता ढळलेली नाही.'[३४] या उपनिषदाचा आधार घेऊन बहिणाबाईंनी ब्राम्हणत्वावर अनेक अभंग रचले. त्यांचे ब्रम्हकर्मपर अठरा अभंग उपलब्ध आहेत.

ज्याप्रमाणे संत तुकोबा म्हणतात, 'महारासि शिवे । कोपे, ब्राह्मण तो नव्हे ।।' किंवा 'ब्राह्मण तो एक । चोखामेळा महार ।।' किंवा 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ।।' हीच विचारसरणी बहिणाबाईंच्या 'ब्रम्हकर्मपर अभंगां'तून त्यांनी सांगितली आहे. 'ब्रह्म जाणे तोचि ब्राम्हण बोलिजे । येर ते सहजे ब्रह्मबीज ।।' (अभंग क्र. २८८, ओ. २) तसेच 'जेथे विकल्प तुटला । तेथे वर्णभेद मिथ्या बोला ।।' (अभंग क्र. ६०१, ओ. ९) एकंदरीत वर्णभेदाबद्दल अथवा जातिभेदाबद्दल त्यांच्या मनात कुठलाही किंतु राहिला नव्हता. शूद्रांस किंवा स्त्रीजातीस गुरुत्व नाही, असे म्हणणाऱ्यांशी स्वप्नांतही संभाषण करू नये, असे त्या सांगतात.

## ७.२. बहिणाबाईंचे वेदोत्पत्तीपर अभंग :

वेदांची उत्पत्ती सांगताना बहिणाबाईं थेट ॐकारापाशी जाऊन पोचतात. वेदांचा जन्म, त्यांची प्रगती, विस्तार, त्यांच्या शाखा, त्यांचे स्वरूप हे सगळे सांगताना बहिणाबाई सुंदर शब्दप्रयोग करताना दिसतात.

'ॐकारब्रह्मीचा बिंदु । तेथुनी उपजला वेदू ।
त्रिगुणेसी वाढला भेदू । ब्रह्मांडाकारे ।।
ऊर्ध्वमूळ अधोशाखा । प्रसवला वेद देखा ।
खांद्या पत्रपुष्प सर्वथा । निर्माण जाल्या ।।
छंदपदजटाक्रम । आरण्य ब्राह्मण जाण ।
विस्तारला वेद आपण । ब्रह्मस्वरूप ।।'

(अभंग क्र. ३८७, ओ. ३ ते ५)

वेद किती व्यापक प्रमाणात विस्तारला आहे, हे बहिणाबाई अतिशय खुबीने सांगतात. त्याचे अमर्याद असणे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे पटवून दिले आहे. त्यांच्या मनात वेदांचे महात्म्य इतके खोलवर रुजले आहे, की त्याची थोरवी गाताना त्यांना पंचमहाभूतेही कमी पडतात.

'पृथ्वी आप तेज वायू पै गगन । विस्तार हा जाण वेदान्वये ।।
अणूच्या प्रमाण नाही वेदावीण । एवढे ब्रह्म जाण कोठे वसे ।।
एकवीस स्वर्गे दश दिशा पाताळ । अवघा भूगोल वेद जाणा ।।
बहेणि म्हणे वेद सर्वांचे हे मूळ । स्वरूप केवळ वेद होय ।।'

(अभंग क्र. ३८३, ओ. १ ते ४)

वेद हे ज्ञान आहे. वेदांचे स्वरूप आणि आत्म्याचे स्वरूप एकच आहे. या सगळ्यांना प्रमाण म्हणजे वेदच आहे. ब्रम्हस्वरूप असे वेद स्वतःप्रमाण व स्वसंवेद्य आहेत. वेदप्रामाण्य सर्वांनी मानले पाहिजे. वेदांचे माहात्म्य ज्याच्या स्वरूपाकारातच सिमित नाही, ते सर्व प्राणीमात्रांसाठी पूजनीय आहे.

'बहेणि म्हणे देव ॐकार सर्वांचा । तेथेचि वेदांचा पसारा दिसे ।।'

(अभंग क्र. ३८२, ओ. ४)

म्हणजे शेवटी ॐकार हाच खरा सर्वांचा देव आहे; म्हणूनच या ॐकाराच्या ज्ञानाने ब्रम्हज्ञान प्राप्त होईल.

एकंदरीत 'बहिणाबाईंना वेदप्रामाण्य मान्य होते. वेदांची निंदा करणाऱ्यांची त्या चांडाळ, खळ, दुष्ट अशा शब्दांत निर्भर्त्सना करतात. वेद मानणाऱ्यांना सद्‌गती मिळते, असे त्यांना वाटते. 'वेद तेचि ज्ञान', 'वेद तो स्वरूप आत्मयाचे' अशा शब्दांत त्या वेदांना ब्रम्हरूप मानतात. वेद हे स्वतः प्रमाण व स्वसंवेद्य आहेत, म्हणून त्यांचे प्रामाण्य सर्वांनी मानले पाहिजे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अन्वयदृष्टीने पहिल्यास आहे, ते सर्व ब्रम्हच आहे आणि व्यतिरेकाने पाहिल्यास ब्रम्हाशिवाय दुसरे काही नाही. अशा दृष्टीने केवळ एकमेव ब्रम्ह सत्य आहे, असे त्या म्हणतात.'[३५]

बहिणाबाईंनी सांगितलेले हे वेदांचे माहात्म्य पाहता त्यांचा पारमार्थिक अधिकार किती श्रेष्ठ दर्जाचा होता, याचा प्रत्यय येतो. त्यांनी वर्णन केलेले वेदांचे माहात्म्य शेवटी ॐकारापाशी येऊन थांबते. ॐकाराचे ज्ञान हेच ब्रम्हज्ञान असे सांगून बहिणाबाई मोक्षाचे साधन किती सुलभ तऱ्हेने उलगडून दाखवतात. यावरून त्या स्वतः किती त्यात रममाण झाल्या असतील, याची कल्पना येते.

## ७.३. बहिणाबाईंचे वेदनिष्ठापर अभंग :

बहिणाबाईंना भक्तिमार्गाचा अवलंब केला; पण वेदांनाही नाकारलेले नाही. तुकोबांच्या विचारसरणीचा पगडा त्यांच्यावर होताच. वेदनिष्ठा हे बहिणाबाईंच्या अभंगांतील एक महत्त्वाचे अंग आहे. 'बहेणि म्हणे वेदान्वये । ज्ञान ते निखळ लाहे ।।' असा वेदांप्रतीचा आदर त्या आपल्या अभंगांतून ठिकठिकाणी व्यक्त करतात. 'वुमेन इन वर्ल्ड हिस्ट्री' या संकेतस्थळावर यासंदर्भात म्हटले आहे, 'The possibility of Bahinabai's Vedic training, or training in Hindu religious hymns, comes to the fore in her 17th century poetry, in that she consistently refers to the Vedas and their regulations on married life. In this abhanga, a song that accompanied women's work, readers become aware of Bahinabai's anguished decision-making process. The Vedas are clear on the duties of women toward their husbands, particularly women's deference to their husband's wishes. But Bahinabai is called to a different life, a different object of affection and duty than her husband, namely, reverence and affection toward her teacher, the low-caste poet-saint Tukaram. Bahinabai's husband initially scorned Tukaram and stressed the invincibility of the Vedas and Vedic rituals over and against Tukaram's message of devotion over ritual.'[35]

वास्तविक स्त्रीजन्मामुळे त्या काळात वेदांपासून वंचित राहण्याचे दुःख त्यांच्या वाट्याला आले होते. स्वतःबद्दल त्या म्हणतात,

'लाधले नरदेह स्त्रियेचेनि रूपे । असंख्यात पापे फळा आली ।।
अधिकार नाही वेदार्थश्रवणी । गायत्री ब्राह्मणी गुप्त केली ।।
करू नये मुखे प्रणवाचा उच्चार । बीजाचा संचार ऐको नये ।।
बोलो नये बोल पराचिया संगे । भ्रतार तो अंगे जमदग्नी ।।
बहिणी म्हणे होतो जीव कासावीस । न ये देवाजीस करुणा माझी ।।'
(अभंग क्र. ५७९, ओ. २ ते ६)

स्त्रीजन्म म्हणजे जणूकाही पाप आहे, अशाप्रकारे वेदांपासून स्त्रियांना दूर ठेवले गेले, याचे दुःख बहिणाबाईंना परोपरीने वाटते, म्हणून त्या देवालाही दोष देतात. संत बहिणाबाईंच्या घरात त्यांच्या पारमार्थिक उन्नतीला सहाय्यभूत व्यक्ती नव्हतीच. बहिणाबाईंच्या आईवडिलांचे अस्तित्व

जावयाच्या संतापी, शीघ्रकोपी स्वभावापुढे धुसर झालेले होते. पतीला तर त्यांच्या पारमार्थिक उन्नतीपेक्षा आपला अहं जपण्यातच धन्यता वाटत होती. दिलीप पुरुषोत्तम चित्रे म्हणतात, 'बहिणाबाईंच्या पतीने सुरुवातीला बहिणाबाईंचा अनन्वित छळ केला. का? तर एक तर स्त्री असून (जिला वेदांचा अधिकार नाही असं त्या काळात महाराष्ट्रात मानलं जाई.) धार्मिक बाबतीत ती लक्ष घालते म्हणून आणि दुसरं म्हणजे ज्याला स्वतःला वेदांचा अधिकार नाही, अशा तुकारामासारख्या शूद्राला ती गुरू मानते म्हणून.'[३६]

अशा विपरीत परिस्थितीत छोट्या छोट्या गोष्टींसाठी मोठा संघर्ष करून त्यांनी अनन्यसाधारण वेदनिष्ठा जपली. त्यामुळेच स्त्रीजन्माविषयीची हळहळ त्या अनेकदा व्यक्त करतात, यासाठी आपल्या पूर्वकर्माला दोष देत स्वतःची समजूत काढतात; पण स्त्रीला वेदाधिकार का नाही, म्हणून बंड करून उठत नाहीत. त्यांचा मवाळ स्वभाव त्यांना याची परवानगी देत नसावा. याच कारणाने कदाचित 'वेदांचा तो अर्थ आम्हासिच ठावा' असे छातीठोकपणे म्हणणारे तुकारामांचे अभंग त्यांना आकर्षित करतात. अशाप्रकारे तुकारामांनी वेदांना आत्मसात केल्याचे सांगितले. वेद संपन्न असूनही कृपण आहेत, असे ज्ञानेश्वर म्हणतात. वेदांमधील तत्त्वज्ञान जीवनव्यापक व सर्वसमावेशक असले, तरीही त्याचे आंधळे अनुकरण करू नये, असे ते स्पष्टपणे सांगतात. त्यांना वेदांचे निरपवाद प्रामाण्य अमान्य आहे. ज्ञानेश्वरांनी संतांना वेदांप्रती क्रांतिकारक विचार प्रदान केला आहे. तुकाराम व बहिणाबाई मात्र वेदप्रामाण्याला विरोध करीत नाहीत. उलट वेदांवरच्या अमीट श्रद्धेमुळे वेदांविरुद्ध वागणाऱ्यांची बहिणाबाई कानउघडणी करतात.

'वेदासी विरुद्ध म्हणे आत्मज्ञानी । पडला तो पतनी रौरवाचे ।।
ऐसे ते चांडाळ न पडावे दृष्टी । ज्यांच्याने हे कष्टी उभय कुळे ।।
वेदासी विरुद्ध असता सर्वथा । अनर्थ परमार्था हाचि येकू ।।
बहेणि म्हणे त्याचे जळो आत्मज्ञान । त्याने नारायण वैरी केला ।।'

(अभंग क्र. ३८०, ओ. १ ते ४)

हा अभंग पाहून तुकारामांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. वेदविरोधी लोकांची अशा आक्रमकपणे संभावना करून बहिणाबाई तुकारामांच्या पावलावर पाऊल टाकतात.

## ७.४. बहिणाबाईंचे वेदमहात्म्यपर अभंग :

वेद न मानणाऱ्यांचे ज्याप्रमाणे अकल्याण होईल, असे बहिणाबाई सांगतात, त्याचप्रमाणे वेदमार्ग अनुसरणाऱ्यांचे कसे भले होते, याचेही त्या वर्णन करतात.

'बहेणि म्हणे जया वेद मान्य जाला । ब्रह्मी होऊन ठेला तोचि एक ।।'

(अभंग क्र. ३८१, ओ. ६)

ज्याला वेद मान्य आहेत, त्याला सद्गती मिळते. तो ब्रह्मरूप होऊन उरतो. वेदांचे महात्म्य असे आहे, की ज्याप्रमाणे आईबाप आपल्या भल्यासाठी प्रयत्न करतात, आपल्या उन्नतीचा ते आधार बनतात, त्याप्रमाणे वेद आपल्याला विवेक शिकवितो, तोच आपल्याला मोक्षप्राप्तीसाठी मदत करतो.

'वेदां ऐसी नाही माउली आणिक । प्राणिया विवेक सांगितला ।।<br>
वेदा ऐसा कैचा बाप या जगासी । कर्मेचि मोक्षासी पाववितो ।।'

(अभंग क्र. ४७५, ओ. १, ३)

## ७.५. वेदांचा मथितार्थ सांगणारे बहिणाबाईंचे अभंग :

जेव्हा 'मी-तू'चा भेद संपेल, जेव्हा सर्वव्यापक असा विस्तारीत दृष्टिकोण मनुष्यमात्रांत निर्माण होईल, एक अद्वैत तत्वज्ञान जाणून घेतले जाईल, तेव्हा मनुष्याची प्रगती व्हावयास वेळ लागणार नाही. बहिणाबाई 'एकमेवाद्वितीयम् ब्रह्मम्' हे तत्वज्ञान सांगताना ब्रम्हाचा आधार घेतात. त्या म्हणतात, अन्वयाने सांगितल्यास हे सर्व ब्रम्हच आहे. व्यतिरेकाने पाहिल्यास ब्रम्हाशिवाय दुसरे काहीच नाही. सर्व भूतांमध्ये वास करणारा तो ब्रम्ह आहे, चराचरसृष्टीत, सजीव-निर्जीव विश्व ज्याने व्यापले आहे, तो ब्रम्हस्वरूप आहे. या सर्वत्र व्यापलेल्या ब्रम्हाचे निखळ ज्ञान म्हणजेच स्वानुभवाचे सुख, संसारदुःखाचे निरसन होय.

'अद्वय ऐसे हे वचन । दुसरे ते नव्हेचि जाण ।
स्वसंवेद्य अथवा आपण । सर्वी सर्वत्र ।।
भूतमात्री व्यापक । तोचि तू वर्ततू देख ।
व्यतिरेकान्वये सुख अनुभवे पाहावे ।।
बहेणि म्हणे वेदान्वये । ज्ञान ते निखळ लाहे ।
वरकड ते मलिन होये । अंधाचे परी ।।'

(अभंग क्र. ३८७, ओ. ८ ते १०)

असे हे सर्वत्र व्यापलेले ब्रम्ह आपण सगळ्यांनी जाणून घ्यावे, त्याचे सुख अनुभवावे, निखळ ज्ञान प्राप्त करून घ्यावे, असे बहिणाबाईंचे म्हणणे आहे. बहिणाबाईंनी हे ब्रम्हस्वरूप स्वतः जाणून घेतले होते. स्वतःचा दुःखमय संसार कदाचित त्यामुळेच त्यांना सुसह्य झाला असावा. बहिणाबाईंची ही ज्ञाननिष्ठा सामान्यजनांना मार्गदर्शन करणारी आहे.

## ७.६. योगसाधनांचा पुरस्कार करणारे अभंग :

'योगसाधनेविना संत तो कैसा ।' संत बहिणाबाईंची योगसाधना मागील काही जन्मांपासून सुरू होती, ती या जन्मी पूर्ण झाली. त्यांनी योगसाधनापर अभंगांतून आपले अनेक अनुभव सांगितले आहेत. स्वानुभवाचे अधिष्ठान असलेले हे अभंग योगसाधनेची तत्त्वे विस्तृतपणे सांगतात. एका सुंदर रूपकाद्वारे योगसाधनेचा उपदेश केला आहे -

'आणिले उसने पाचांचे शरीर । साधावया सार मोक्षपंथ ।।
येथे तुवा जरी मांडिला आळस । होईल तरी नाश स्वहिताचा ।।
भाड्याचे घोडे करूनी आणिले । पाहिजे साधिले कार्य त्वरे ।।
बहेणि म्हणे ज्याचे नेईल तो धनी । होईल ते हानि स्वहिताची ।।'
(अभंग क्र. १४९, ओ. १ ते ४)

येथे बहिणाबाई म्हणतात, 'पंचमहाभूतांचे तुझे शरीर म्हणजे भाड्याने घोडे आणावे, असे आहे. ते जाण्यापूर्वी तू या शरीराकडून मोक्षपंथाची साधना करून घे. ब्रम्हसाक्षात्कार करून घे. तू जर आळस केला, तर हे शरीर ज्याचे आहे, तो घेऊन जाईल व तुझ्या हिताचा मात्र नाश होईल.'

या साधनेची प्राप्ती कशी करावी, हे त्या सांगतात -

'पाचही मुद्रा । लाविती नेत्री । भाळ विलाकिति रे बापा ।
दशनादी प्राण । गोवुनी राहति । तेथे चित्त विरे रे बापा ।।
बहेणि म्हणे तुज । सद्गुरु वरदा-। विण ते दुर्जय रे बापा ।
ते सुख साधुनि । घे नरदेही । पुढील धाव पुरे रे बापा ।।'
(अभंग क्र. ५३१, ओ. ३, ४)

योगसाधनेचा मार्ग अशाप्रकारे सांगून बहिणाबाई मुमुक्षूंची वाट सोपी करतात. 'आरती आत्मारामाची' यात आत्माराम कसा प्राप्त होईल, हे सांगताना बहिणाबाई योगसाधनेचे स्पष्टीकरण देतात. चित्ताचा निरोध करून षड्चक्रांचे शोधन करून काकिमुखाचा भेद करावा, असे त्या सांगतात.

योगमार्गाचा असा सोपा मार्ग सांगितला तरी सद्गुरुकृपेशिवाय हा मार्ग दुर्गम आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी त्या प्रथम गरुकृपा प्राप्त करण्यास सांगतात. गुरुकृपा प्राप्त करण्यासाठी गुरूचा

शोध घेणे आवश्यक आहे. योग्य गुरूचा शोध घेण्यासाठी त्या गुरुपरीक्षा सांगतात. हा गुरू कसा असावा, तर -

'तोचि रे भवरोग फेडील अंगीचा । जयासी शांतीचा भाव देही ।।
तोचि रे निरसील भवपाश सर्वही । जया बोध देही सर्वकाळ ।।
तोचि रे दवडील माया अंधकार । जयासी विकार नाही स्वप्नी ।।
बहेणि म्हणे ऐसी करावी परीक्षा । पावसी अपेक्षा सहजगुणे ।।'
(अभंग क्र. २५०, ओ. १, ३, ४, ६)

याप्रमाणे 'उघडपणे व जोरदारपणे आपल्या अभंगवाणीद्वारा गुरुकृपांकित योगसाधनांचा पुरस्कार व मार्गदर्शन करणाऱ्या बहिणाई या एकमेव संत स्त्री आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नये. मुक्ताबाई, जनाबाई वगैरे सर्व संतांच्या अभंगांत योगानुभव आहे; पण योगपुरस्कार क्वचितच आढळतो.'[३७] उलट 'योगयागविधी । येणे नोव्हे सिद्धी ।।' असे सांगून त्यांनी योगमार्गाचा निषेधच केलेला दिसतो. संत बहिणाबाईंनी मात्र योगाचे महत्त्व मान्य करून त्याची माहिती व वेदान्त तत्त्वज्ञान आपल्या काव्यात सुबोध व सविस्तर सांगितले आहे.

## ७.७. बहिणाबाईंचे कर्ममहात्म्यपर अभंग :

वेदांना जाणल्यावर, ॐकाराला आत्मसात केल्यावर हे ब्रम्हरूप व्यक्तीला कल्याणकारी मार्गाकडे नेईल; पण हे साधावयाचे कसे? मनुष्याने प्रयत्न केल्याशिवाय हे साधणे शक्य नाही. यासाठी बहिणाबाई कर्मयोगाचे महात्म्य पटवून देतात. दैनंदिन जीवनात कर्मयोगाचे पालन कसे करावे, हे त्या स्पष्ट करतात.

'वेदे प्रतिपाद्य केले असे कर्म । मोक्षाचे हे वर्म पाहोनिया ।।
परी ते नेणती करिता चुकले । तेणेचि पावले जन्म-मृत्यु ।।
ब्रह्मचर्य आणि गृहस्थ वानप्रस्थ । आणिक संन्यास वेदमते ।।
बहेणि म्हणे वेद बोलिला नेटके । क्रियेपाशी सुखे दुःखे येती ।।'
(अभंग क्र. ४७४, ओ. १ ते ४)

वेदांनी प्रतिपाद्य केलेले कर्म आपण आचरणात आणावयाचे. हे कर्म करण्यास चुकलेला मनुष्य जन्ममृत्यूच्या फेऱ्यात अडकतो; म्हणूनच वेदांत सांगितल्याप्रमाणे सुखदुःख यांपासून मनुष्य मुक्त होतो. अचेतन कर्माने चेतन ब्रम्ह साधायचे कसे, याची युक्ती सांगताना त्या ॐकाराचा आधार घ्यावयास सुचवितात.

'ॐकारे आदरी । तत्कारे समर्पी ।
सत्कारे स्वरूपी । ऐक्य करी ।।'
(अभंग क्र. ५६१, ओ. ३)

'ॐ तत् सत्' या ब्रम्हनामाचा कर्माच्या ठायी असा विनियोग करावा, कर्माची सुरुवात ॐकाराच्या ध्यानाने व उच्चाराने करावी. कर्म पूर्ण झाले की, तत्स्वरूपी ब्रम्हानंद कर्माचे फळ समर्पण करावे, म्हणजे कर्म ब्रम्हरूप होते; परंतु असे केल्यावरही कर्तामात्र शिल्लक उरतो. म्हणून शेवटी तत्स्वरूपाचा उच्चार करून आपल्या कर्तृत्वासह सर्व कर्मफळ ईश्वराला अर्पण करावे व आपण ब्रम्हमात्र व्हावे, हीच ती कर्म करून कर्मफळात न अडकण्याची गुरुकिल्ली. अशाप्रकारे कर्माचे आदी, मध्य व अंती ब्रम्हभाव ठेवून सर्व कर्मे करण्याची युक्ती ज्यांना साधली, बहिणाबाईंच्या मते तेच ब्रम्हरूप होण्यास पात्र आहेत. ज्यांना कर्म आणि ब्रम्ह वेगळे भासत नाहीत, जे आपल्या कर्माला ब्रम्हरूप मानतात, अशांना मोक्षप्राप्ती काही कठीण नाही.

असे करणे ज्यांना जमत नसेल, ज्यांचे मन त्यांच्या कर्मात गुंतून पडत असेल, ब्रम्ह आणि कर्म यांची सांगड घालताना ज्यांना अपयश येत असेल, तर त्यांचे अधःपतन कोणी थांबवू शकत नाही. अशांची जन्ममरण परंपरा चालूच राहील. ह्या जन्ममरणाच्या फेऱ्यातून स्वतःला सोडविण्यासाठी बहिणाबाई पुनःपुन्हा विनंती करतात.

'वेदार्थ हा पाहुनि वर्तती जे । वर्णाश्रमी आश्रम त्यासि साजे ।।
मोक्षासि हा कारण प्राणियासी । बहेणि म्हणे वेद मना उपासी ।।'
(अभंग क्र. ४७६, ओ. १)

वेदांवरील असीम निष्ठा वेळोवेळी पटवून देताना बहिणाबाई परोपरीने वेदांना अनुसरण्याची विनंती करतात. खरे पाहता स्त्रियांना वेदांपासून दूर ठेऊन त्यांच्यावर फार मोठा अन्याय झाला आहे. बहिणाबाई या स्त्री असूनही त्यांनी वेदांना समजून घेतले. त्यांचे महत्त्व जाणले. सर्वांना त्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी कळकळीने प्रयत्न केले, अशा गुणग्राही व्यक्तीला वेद समजून घेण्यासाठी संघर्ष करावा लागला, ही खरंच खेदाची बाब आहे. ज्ञानाला कोणतेच बंधन नसते. वय, लिंग, जात, धर्म या सर्वांपासून दूर ज्ञानाला फक्त एका जिज्ञासू मनाची आवश्यकता असते. असे जिज्ञासू मन स्त्रीचेही असू शकते, हे आपल्याला बहिणाबाईंवरून सहजपणे पटण्यासारखे आहे.

वेदांवरच्या या निष्ठेमुळे बहिणाबाईंना प्रपंच व परमार्थ या दोन्ही डगरींवर पाय ठेवता आला. स्वतःला आलेल्या वेदांच्या या अनुकूल अनुभवामुळे बहिणाबाईंना सर्वांनाच याप्रमाणे उपरती व्हावी, ही मनापासूनची इच्छा होती. म्हणूनच 'वेदनिष्ठ रहा', असा संदेश त्या देतात. वेदांचा जरी असा पाठपुरावा केला, तरी वेदार्थ समजून घेणे ही महाकठीण गोष्ट आहे, याची त्यांनाही जाणीव आहे. यावर उपाय म्हणजे सद्गुरूला शरण जाणे होय.

'सात्त्विक बुद्धीने सद्गुरूची कृपा । वेदार्थ घेई पा विवेकेसी ।।'
(अभंग क्र. ४८६, ओ. २)

सात्त्विक बुद्धीने, सद्गुरुकृपेने कोणीही वेदांच्या जवळ जाऊ शकतो. सद्गुरू ही वेदांपर्यंत पोचण्याची शिडी आहे; किंबहुना त्या संतांची व्याख्याच अशी करतात, 'संत ते जाणावे पूर्ण वेदमूर्ती ।' संत म्हणजे

जणूकाही वेदांचे चालतेबोलते रूपच, 'जेणे हा वेदार्थ साठविला ।' ज्यांनी हा वेदार्थ आपल्यामध्येच रुजविला आहे, तेच खरे संत आहेत.

भागवत धर्म व वेद यांनाही बहिणाबाई परस्परांशी जोडतात. हरिभक्ताचे वर्णन करताना, वेधविधींचा मार्ग न उल्लंघिता भागवत धर्माप्रमाणे वागणारे व सर्व भूतांच्या ठायी आस्था ठेवणारे, तेच खरे हरिभक्त, असे त्यांचे म्हणणे आहे. वेदांपुढे बहिणाबाईंना सर्व नगण्य वाटते. वेदांमुळे आपला संतापी, संकुचित मनोवृत्तीचा असा पतीही पुरुषार्थाधिकारी वाटू लागतो.

'धर्म अर्थ काम मोक्षासी अधिकारी । भ्रतार साचार वेद बोले ।'

(अभंग क्र. ३५, ओ. ७)

आपला पती वेदांच्या कसोटीला उतरल्यामुळे बहिणाबाईंना त्याच्याबद्दल आदर वाटतो. त्यांची ही अनन्य वेदनिष्ठा त्यांना एका वेगळ्या आध्यात्मिक उंचीवर नेऊन ठेवते, ज्यामुळे त्या इतर संतांत विशेष लक्षवेधक ठरतात.

## ७.८. बहिणाबाईंचे वेदान्तपर अभंग :

## ७.८.१. मायाब्रम्हनिरूपण :

येथे बहिणाबाई माया, तिचे स्वरूप, उगमस्थान, तिची जागा या सर्वच गोष्टींची चर्चा करतात.

'गुरुकृपा पूर्ण जयासी लाधली । माया ही निरसली तया मनी ।।
येर ते अज्ञान पडिले भ्रमणी । संसार-जाचणी अनिवार ।।
जयांचा हा हेत निरसला देहीचा । रावो ब्रह्मांडीचा तोचि एक ।।
बहेणि म्हणे काय सांगावे कवणा । मायेचा देखण विरुळा असे ।।'
(अभंग क्र. ९५, ओ. १, २, ५, ६)

ज्यांना गुरुकृपा पूर्णपणे प्राप्त झाली, ज्यांना मायेचा अर्थ कळला, ज्यांच्या मनातील विकल्पभाव नष्ट झाला, ज्यांच्या अंतरंगातली वासना निमाली, ज्यांनी देहाच्या हेतूचा त्याग केला, असे सर्व मायेची महती समर्थ झाले. असे लोक फार विरळे असतात. बहिणाबाई मायेच्या 'देखण्या' होत्या. म्हणजेच त्यांनी माया पूर्णपणे जाणली होती.

'सूर्याचिये घरी राहाणे जयासी । अंधकार त्यासी स्वप्नी नाही ।।
तैसे स्वानुभवी न देखे तो माया । ब्रह्म तो अद्वयानंद अंगे ।।
परिस तो जाणे काय सोने लोह । निर्ममते मोह कदा नाही ।।
बहेणि म्हणे नलगे तृषा ते जीवना । पूर्णत्वे भावना भावशुद्धी ।।'
(अभंग क्र. ९६, ओ. १ ते ४)

सूर्याच्या घरी राहणाऱ्यांना अंधकार स्वप्नातही ज्ञात नसतो; तसेच ब्रम्हज्ञान प्राप्त झालेल्यांना मायेचे स्वरूप न कळणे शक्य नाही. परिसाला जसे लोखंड समानच असते, तसेच आयुष्यात सर्व मोहांपासून दूर गेलेल्यांना जीवनात कोणतीही तृषा उरत नाही. ज्याने निराकाराला आपलेसे केले, ज्याने निर्गुणाला जाणून घेतले, त्यानेच खरी माया जाणली, असे त्या स्वतःचा अनुभव म्हणून सांगत नाहीत, तर हा संतांचा अनुभव आहे, हे त्या स्पष्ट करतात.

परब्रम्हा जर निर्गुण, निराकार, निर्विकार आहे, तर त्याच्या ठिकाणी हा विकार, ही तळमळ का व कशी निर्माण झाली, असा प्रश्न उपस्थित करून बहिणाबाई त्याचे उत्तर देतात,

‘स्फूर्तिरूप तेथे मायेचा उद्‌भव । प्रपंचासी ठाव मूळ तेथे ।।
ब्रह्म एकले ते गमेना म्हणोनि । स्फूर्ती हे चिंतनी स्वसंवेद्य ।।
आम्रवृक्षी होय कावरे निर्माण । तयासीच जाण आच्छादले ।।
बहेणि म्हणे तैसी माया आच्छादित ।सद्‌गुरूचा हस्त नाही तरी ।।’
(अभंग क्र. ४८७, ओ. १, २, ७, ८)

मायेची उत्पत्ती कशी झाली, तर एकमेवाद्वितीय असल्यामुळे ब्रम्हाला आपल्या एकटेपणाचा कंटाळा आला. आता काय करावे, असे चिंतन करीत असता, त्याच्या ठिकाणी एकदम स्फूर्ती झाली. ‘एकोऽहं बहुस्यां प्रजायेय ।’ (तैत्तिरीय उपनिषद १८/६) ‘मी एकटा आहे. मीच अनेक होईन’ हा आदीसंकल्प ज्या क्षणी ब्रम्हाच्या ठायी स्फुरला, त्याच क्षणी मायेची उत्पत्ती झाली व प्रपंच निर्माण झाला. या मायेची रूपे कशी कशी विकसित होत गेली, तर एखादे बांडगूळ जसे मृत्तिकेच्या स्पर्शाविनाही वाढते, तसेच ही माया सद्‌गुरूच्या हस्ताशिवायच उगम पावली व विकसित झाली. ही जी परमात्म्याची इच्छाशक्ती, हिलाच माया म्हटले असून ती प्रपंचाचे मूळ आहे व आश्रयस्थानही आहे. हिच्यामुळेच विश्वोत्पत्ती झाली.

मायेची अफाट कर्तृत्वशक्ती वर्णन करताना बहिणाबाई अतिशय सुंदर उदाहरण देतात.

‘सुवर्ण कांकण नाममात्र भिन्न । ज्ञानदृष्टी जाण वोळखावे ।।
तोय तरंग भेद नाममात्र ऐक्य हे सर्वत्र ज्ञानदृष्टी ।।
सूत वस्त्र दोन्ही ऐक्यता सहजे । ज्ञानदृष्टी वोजे पाहिलिया ।।
बहेणि म्हणे ऐसा पाहाता विवेक । सहजची ऐक्य मायाब्रह्म ।।’
(अभंग क्र. ९२, ओ. ३ ते ६)

सुवर्ण आणि कांकण, तोय आणि तरंग, सूत आणि वस्त्र हे सर्व जसे अभिन्न आहेत, एकमेकांपासून आपण त्यांना वेगळे करू शकत नाही, तशीच ब्रम्हाने निर्माण केलेली ही माया त्यापासून वेगळी असूच शकत नाही. त्या अर्थी तिची सत्यता अजून काय सांगावी?

ज्ञानेश्वरांनी वर्णन केले आहे की ‘जगदुन्मीलनाविरल केलिप्रिय’ (‘ज्ञानेश्वरी’ १८/६) म्हणजे जगद्रूपाने सतत प्रकट होण्याचा खेळ परमात्म्याला प्रिय आहे. यालाच स्फूर्तिवाद अथवा चिद्‌विलासवाद म्हणतात. मग माया ही असत्य आहे, असे कसे म्हणणार?

ज्ञानेश्वरांनी वेदांचे केलेले चिंतन त्यांच्या या उक्तीतून दिसते. पण बहिणाबाईंनी 'ज्ञानेश्वरी', 'तैत्तिरीय उपनिषद' या सर्वांचेच आकलन केले होते. या सर्व माहितीतून यथायोग्य ज्ञान निवडून नेटक्या सुबक, सुलभ शब्दांत सांगणे, हे त्यांचे कसब निश्चितच दाद घेऊन जाते.

## ७.८.२. मायेची आवरणशक्ती :

ब्रम्हाने आपल्या खेळासाठी म्हणून ही माया निर्माण केली; पण ही मायाच त्याला झाकोळून टाकते. मायेची ही ब्रम्हाला झाकोळून टाकण्याची शक्ती म्हणजेच बहिणाबाईंच्या मते मायेची आवरणशक्ती होय. या शक्तीचे वर्णन करताना त्या 'ज्ञानेश्वरी'चा आधार घेतात. 'ज्ञानेश्वरी'तील रूपके, उपमा त्या वापरतात. जसे - ज्ञानेश्वर म्हणतात,

'परी उदकी झाली बाबुळी । तें उदकाते जैसी झांकोळी ।।'

('ज्ञानेश्वरी' अध्याय ७, ओ. ६०)

तर बहिणाबाई म्हणतात,

'उदकी बाबुळ होऊनी निर्माण । तेणेचि ते जाण आच्छादिले ।।

(अभंग क्र. ४८७, ओ. ३)

पुढे ज्ञानेश्वर म्हणतात,

'तैसीं हे माझीच बिंबली । त्रिगुणात्मक साउली ।।
कीं मजचि आड वोडवली । जवनिका जैसी ।'

('ज्ञानेश्वरी' अध्याय ७, ओ. ६३)

तर बहिणाबाई म्हणतात,

'बहेणि म्हणे तैसी माया आच्छादित । सद्‌गुरुचा हस्त नाही तरी ।।'

(अभंग क्र. ४८७, ओ. ७)

वरील दोन्ही उदाहरणांत बहिणाबाईंवर असलेला ज्ञानेश्वरांचा प्रभाव दिसून येतो. ज्ञानेश्वरांची पाणी व बाभूळ ही कल्पना उचलून बहिणाबाई मायेची आवरणशक्ती यथायोग्य शब्दांत वर्णन करतात. तसेच ज्ञानेश्वरांची जवनिका ही कल्पना मायेचे आच्छादन म्हणून बहिणाबाई वापरतात.

# ७.८.३. मायेची विक्षेपशक्ती :

या मायेची करणी कशी आहे, तर मायेच्या विक्षेपशक्तीने नसलेल्या द्वैताचा व नानात्वाचा आभास निर्माण होतो.

'आकारले जे जे मायिक ते खरे । शब्द तो निर्धारे मायारूप ।।
ज्ञान तेही माया ध्यान ते मायाचि । मायेविण कैची दृष्टी वाढे ।।
जोवरी हे द्वैत मनामाजी वसे । तोवरी मायांशे लोकत्रय ।।
बहेणि म्हणे माया लटकी म्हणो नेदी । करोनी वेवादी पहा बरे ।।'
(अभंग क्र. १६४, ओ. ३ ते ६)

अशा या ब्रम्हापासून निर्माण होऊन ब्रम्हाला झाकून टाकणाऱ्या व नानात्वाचा आभास निर्माण करणाऱ्या मायेचे खरे स्वरूप तरी काय? ती सत्य की असत्य? की सत्यासत्यातीत? यावर बहिणाबाई म्हणतात, माया सत्य म्हणावी, तर ज्ञानाने तिचा नाश होतो. असत्य म्हणावी, तर जगद्रूपाने ती दिसते. म्हणून मायेचे स्वरूप सत्य की असत्य हे शोधणे म्हणजे शब्दांचे जाळे तयार करणे आहे. शब्दांनी मायेचे वर्णन करणे केवळ अशक्य आहे. ती शब्दांत बांधली जाण्याइतकी स्थिर नाही की आकलनात येऊ पाहणारी तरल नाही. तिच्या स्वरूपापेक्षा तिचा अनुभव हाच अधिक ज्ञानदायी आहे. तिच्याशी कोणताही संबंध आपण प्रस्थापित करू शकत नाही आणि तिच्याशिवाय जगूही शकत नाही. अशी ही माया सत्यासत्याच्या पलीकडे आहे.

'बहेणि म्हणे वाचा खुंटली वर्णिता । कोण तो तत्त्वाचा शोध करी ।।'
(अभंग क्र. ४८८, ओ. ४)

ही सद्सद्विलक्षण अनिर्वचनीय अशी माया कोठून निर्माण झाली?

'ब्रह्मापासुनिया जाली म्हणो माया । उपाधी हे तया केवी घडे ।।'
(अभंग क्र. ९१, ओ. १)

ब्रम्ह हा निरुपाधिक, मग ब्रम्हाच्या ठिकाणी मायेची उपाधी झाली, असे कसे म्हणावे? असे म्हणून बहिणाबाई मायेच्या मुळावरच आघात करतात; पण त्यांचे हे मत तात्त्विकदृष्ट्या अतिशय योग्य आहे. या शंकेचे समाधान त्या अशाप्रकारे करतात, 'ब्रम्हापासून माया निर्माण झाली, असे म्हटले तर ब्रम्ह निरुपाधिक राहत नाही. माया ब्रम्हापासून निर्माण झाली नाही, असे म्हटले तर तिला स्वतंत्र असे स्थान द्यावे लागेल. श्रुतींनी

म्हटल्याप्रमाणे ब्रम्हाचे स्थान एकमेकाद्वितीय असे आहे. त्यामुळे माया स्वतंत्र नाही. मग हा प्रश्न सोडवायचा कसा? मायेचे स्वरूप अजूनपर्यंत थोरामोठ्यांनाही अवगत झालेले नाही. तिचे स्वरूप कळावयासाठी शूर ज्ञानवंत व्हावयास हवे. अद्वय असे ब्रम्ह द्वैताला कोणामुळे आले? ब्रम्हा, हरी, हर इत्यादी अवतारांच्या पंक्ती कोणामुळे आल्या? शिव एकटा असूनही अनेक कसा झाला?

या सर्वांवर एकच उत्तर आहे, ते म्हणजे 'अंबा'. या सर्व गुंतागुंतीमागे अंबेचा हात आहे. ही 'अंबा' कोण? बहिणाबाईंना येथे 'अमृतानुभवा'तील जगाची मायबाप जे देवोदेवी म्हणजे शिवशक्ती हीच अभिप्रेत आहे. मायेलाच 'अंबा' असे संबोधून हे विश्व म्हणजे ब्रम्हा व अंबेचा विलास आहे. अंबा ही त्याच्याशी एकत्वात असलेली त्याची अंगभूत चित्‌शक्ती आहे. हे जगत त्या दोघांनी मिळून निर्माण केले. त्यांच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान होण्याकरिता अंबेला शरण जाणे महत्त्वाचे आहे.

'एकी हा अनेक अनेकी हा एक । अन्वय व्यतिरेक कैसा सांग ।।
बहेणि म्हणे याची केली ब्रह्मकळा । म्हणोनि अंबेला शरणांगत ।।'
(अभंग क्र. ४११, ओ. ६, ७)

प्रत्यक्ष अंबेला शरण जाऊन खरे स्वरूप जाणून घेण्याविषयी बहिणाबाई म्हणत असल्या तरी ही शरणागती सर्वांना जमण्यासारखी नाही. अशा वेळी सद्‌गुरूचा आधार घ्यावा. मायेचे संदेह तोच निरसन करील. तरीही मायेचे स्वरूप खालच्या म्हणजे अज्ञानाच्या पातळीवरून दृश्य जगताची व्यवस्था लावण्यासाठी वर्णन करतात. वरच्या म्हणजे ज्ञानाच्या पातळीवरून त्यांनी चिद्‌विलासवाद मांडला आहे.

एकंदरीत, बहिणाबाईंच्या मते 'ब्रम्हाला एकटेपणाचा कंटाळा आला, म्हणून ते अनेक झाले व त्याची स्फूर्ती म्हणून मायेचा उद्‌भव झाला. परमात्म्याची इच्छाशक्ती हीच जणू माया असून ती प्रपंचाचे मूळ व आश्रयस्थान आहे. ज्ञानदेवांचा स्फूर्तिवाद किंवा चिद्‌विलासवाद असाच वाटतो. ब्रम्हाला झाकून टाकणाऱ्या व नानातत्त्वाचा आभास निर्माण करणाऱ्या मायेला सत्य म्हणावे की असत्य, असा प्रश्न करून त्या म्हणतात, माया सत्य म्हणावी, तर ज्ञानाने तिचा नाश होतो आणि असत्य म्हणावी तर जगद्रूपाने ती दिसते. ब्रम्ह निरुपाधिक असल्याने ती ब्रम्हापासून उत्पन्न झाली, असे समजता येत नाही आणि तसे नसले तर तिला स्वतंत्र समजावे लागेल; पण ती

आधाराशिवाय असू शकत नाही. म्हणजे ती सत्यासत्यातीत आहे की काय याची उकल करताना त्यांनी म्हटले आहे, की ब्रम्ह, माया यांचा संबंध शिव - शक्तीसारखा असला पाहिजे. माया ही ब्रम्हाची चिच्छक्ती असून विश्व हे त्या दोघांचा विलास आहे, असे म्हणून त्यांनी मायेलाच 'अंबा' म्हटले आहे. त्यांच्या मते, मायेच्या संदेहाचे निरसन फक्त सद्गुरूच करू शकतो. म्हणजे ब्रम्हज्ञानाच्या अभावी ज्याला मायावाद म्हणतात, तोच ब्रम्हज्ञानप्राप्तीने चिद्विलासवाद होतो.'[३८]

सगुणरूप हे नामरूपातील निराकार, निर्विकार, सच्चिदानंद-स्वरूप शाश्वत चैतन्याचे प्रतीक आहे. केवळ तेच एक ब्रम्ह नव्हे, तर समग्र विश्व हे त्याचे व्यक्त रूप आहे. 'विश्वी विश्वंभर विस्तारला जाण, विश्वाकार ब्रह्म विस्तारले सर्व' असे सांगणाऱ्या बहिणाबाईंचे मायाब्रम्हनिरुपणातील हे सखोल विवरण पाहून विदर्भातील प्रख्यात प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज म्हणतात, 'बाईंचे वेदान्तज्ञान पाहून स्वतःच्या ज्ञानाच्या आकुंचितपणाबद्दल लाज वाटते.'[३९] अर्थात हा बहिणाबाईंच्या वेदान्तज्ञानाचा गौरव असला तरी संत गुलाबराव महाराजांच्या मनाचा मोठेपणा आहे, हेही लक्षात घ्यावे लागते.

## ७.९. ईश्वर, जग व जीव यांच्यातील संबंध दर्शविणारे अभंग :

### ७.९.१. सगुण ब्रम्ह :

'अक्षर ते क्षरले रूपासी आले । निर्गुण ते जाले सगुणचि ।।
पैल भीमातीरी उभा विटेवरी । स्वरूपे साजिरी दिव्यमूर्ति ।।
विजातिया कैसे जाले कुळनाम । निःसीमासी सीम नवल मोठे ।।
अशोभ तो शोभा पावलाहे कैसा । बहेणि म्हणे दिशा व्यापूनिया ।।'
(अभंग क्र. १४०, ओ. १ ते ४)

या सर्व अलौकिक ब्रम्हाचा पसारा वर्णन करता करता त्या या ब्रम्हाला सगुण रूपामध्ये कधी सजवतात, ते आपल्यालाही कळत नाही. सगुण ब्रम्हाचे वर्णन करताना त्या सांगतात, की अक्षर म्हणजे नष्ट न होणारे असे ते त्याने रूप धारण केले. हे रूप कोणते, तर भीमातीरावर विटेवर उभा असलेला साजरी दिव्यमूर्ती असलेला असा तो विठ्ठलच अवघ्या देश-दिशा व्यापून उरला आहे. असे का घडले असावे? तर भक्तिसुख मिळविण्यासाठी ब्रम्ह हा विठ्ठलवेशात गोठून आला.

'घनःश्याम मूर्ति सावळी डोळस । उभी सावकाश विटेवरी ।।
नामरूपातीत चैतन्य शाश्वत । आत्मस्वरूपस्थित प्रगटली ।।
वेदा अगोचर श्रुतीहूनी पर । निर्गुण निर्विकार पहाते गे ।।
अखंड चिद्घन दिसे सर्वसाक्षी । बहेणि तया लक्षी हृदयामाजी ।।'
(अभंग क्र. ४२८, ओ. २ ते ५)

अशाप्रकारे विठ्ठलाचे वर्णन करताना त्यांच्या शब्दांना विशेष माधुर्य प्राप्त होते. त्या म्हणतात, की ही सावळी डोळस घनश्याम मूर्ती म्हणजेच शाश्वत चैतन्य आहे. दृष्टीच्या पलीकडले आणि श्रुतीच्या आवाक्यात नसलेले असे ते वेद आणि निर्गुणनिराकार ब्रम्ह यांना बहिणाबाई घनश्याम मूर्तीच्या रूपाने हृदयात सामावून घेतात.

## ७.९.२. सगुणनिर्गुण एकच :

सगुण आणि निर्गुण यांचे अद्वैत सांगून त्या म्हणतात, की सगुण आणि निर्गुण रूपात एकच गोष्ट सामावली असल्यामुळे आपण सगुण रूपात त्याची पूजा केली, किंवा निर्गुण रूपात त्याची उपासना केली, तरी एकाच ठिकाणी आपला पूज्य भाव पोचणार आहे. सगुण रूप हे नामरूपातीत, निराकार, निर्विकार, सच्चिदानंदस्वरूप, शाश्वतचैतन्याचे प्रतीक आहे. सगुणाच्या उपासनेने निर्गुणस्वरूपाची प्राप्ती करून घेणे, हेच मानवाचे ध्येय आहे.

पांडुरंगाचे खरे रूप निर्गुण आहे. त्यापासून देव, तीर्थ जन्मले. वेद व शास्त्रे यांचे मूळ असा जो ॐकार, त्याचाही पाया पांडुरंगच आहे. ही परमार्थाची खूण ज्याला कळली, त्याचे जीवन धन्य होय. पुढे त्या म्हणतात, हे निराकार ब्रम्ह नुसते ईश्वराच्या सगुणरूपानेच अवतरले आहे, असे नव्हे, तर अखिल ब्रम्हांडाच्या रूपाने ते प्रगटले आहे. हे तत्त्व बहिणाबाईंनी आपल्या अभंगांतून वेळोवेळी मांडले आहे. कधी त्या म्हणतात, की ब्रम्हानेच सारे आकार धारण केले आहेत, तर कधी त्यांना वाटते, आत्मारूपाने जगाचा विस्तार झाला आहे. कधी विश्वात विश्वंभराचाच (ब्रम्हाचा) वास आहे, असे जाणवते, तर कधी ज्ञानदृष्टीनेच हा विश्वात पसरलेला विश्वंभर दिसू शकतो, असे त्या म्हणतात.

'विश्वी विश्वंभर पाहे ज्ञानदृष्टी । घेऊनी कसोटी वेदशास्त्रे ।।
काय उणे मग आपुल्या स्वसुखा । होऊनिया मुका राहे तेथे ।।
पुष्पामाजी वास नेणती ते नेत्र । घ्राणेविण श्रोत्र व्यर्थ सर्व ।।
बहेणि म्हणे देवे व्यापियले जग । ज्ञानदृष्टि चांग पाहिजे ते ।।'
(अभंग क्र. ४५९, ओ. १ ते ४)

विश्वव्यापी परमतत्त्वाला पाहण्यासाठी ज्ञानदृष्टी हवी. फुलातला सुगंध अस्तित्वात असतोच; पण घ्राणेंद्रियांनी ग्रहण केल्याशिवाय तो आपणांस समजत नाही. तेथे श्रुतींचे काम नसते. म्हणजेच योग्य गोष्टींची जाणीव होण्याकरिता विशिष्ट गोष्टींचीच आवश्यकता असते. तद्वतच ही ज्ञानदृष्टी आपल्याला ब्रम्हस्वरूप दर्शविण्यासाठी अतिशय आवश्यक असते. ती प्राप्त होण्याकरिता सात्त्विक मन हवे. निर्द्वंद्व असलेल्या अशा या मनात एकनिष्ठतेचा सद्गुण हवा. या गुणांनी सद्गुरूला प्रसन्न केले तर

बाह्यअंतरंगात ओतप्रोत भरलेल्या हरीची जाणीव आपल्याला होईल. ज्याक्षणी सद्‌गुरूची कृपा होईल, त्याक्षणी आपण जनीजनार्दनाला ओळखायला लागू.

ज्ञानदृष्टीने सकलविश्वाचे परिभ्रमण होत असले, तरी बरेचसे अज्ञानी जन गुरुकृपेची प्रतीक्षा करीत आत्मज्ञानाच्या शोधार्थ फिरत राहतात. ही गुरुकृपा प्राप्त होईपर्यंत प्रत्येक मानवातील आत्मतत्व जीवदशा भोगीत असते.

'अहंकारे देह धरी जीवदशा । मग तो पडे सोसा संसारिका ।।
तेणेचि अंतर पडिले मुळाशी । मग भोग सोसी नाना योनी ।।
अहंकारे वाढे स्त्री धनाचा लोभ । माया ते स्वयंभ वाटली त्या ।।
बहेणि म्हणे याचा करावा विचार । आत्मज्ञान-सार सापडेल ।।'
(अभंग क्र. २५६, ओ. १ ते ४)

ज्याला प्रत्यक्ष ब्रम्हरूप जीवाचे ज्ञान नाही, त्याला या जीवाच्या अविनाशी स्वरूपाचीही जाणीव नाही. आज जो देह आपला आहे. तो उद्या दुसऱ्या जीवाचा, आत्म्याचा असणार आहे. हा क्षणभरासाठी मिळालेला देह म्हणजे आपले संपूर्ण जीवन नाही; पण जीव आपले हेच खरे स्वरूप विसरतो आणि क्षणभंगूर अशा देहाच्या सुखाच्या पाठीमागे लागतो. मी कर्ता, मीच भोक्ता, देह म्हणजे मी अशा कल्पनेत रममाण होतो. हा जीव अहंकारी झाल्यामुळे त्याला स्वपलीकडे काहीही दिसत नाही. अशा खोट्या 'मी'पणामुळे जन्मोजन्मीचा संसार त्याच्या पाठीमागे लागतो. जन्ममरणाचे फेरे करून करूनही मनुष्याला आत्मरूपाची जाणीव होत नाही. आपल्या पूर्वसंचितामुळे आज आपल्याला दुःख सोसावे लागत आहे, हेही त्याला कळत नाही.

'बहेणि म्हणे येथे लटिके मीपण । करी जन्ममरण वेरझारा ।'
(अभंग क्र. ३३०, ओ. ४)

पुन्हा जन्म, पुन्हा मरण या फेऱ्यातून सुटका करून घ्यावयाची असेल, तर जीवाने आपले मूळचे अविनाशी ब्रम्हस्वरूप ओळखले पाहिजे. जगताकडे ब्रम्हरूपाने पहायला शिकले पाहिजे. ईश्वर, जग व जीव यांचे खरे स्वरूप एकमेवाद्वितीय ब्रम्हच आहे. अशाप्रकारे बहिणाबाईंनी त्यांच्यातील परस्परसंबंध उलगडून दाखवले आहे.

या तत्वज्ञानाची प्रचिती घेण्याचे मुख्यतः तीन मार्ग सांगितले जातात, ते म्हणजे कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग.

## १. कर्ममार्ग :

भगवंताला जाणण्यासाठी घरादाराचा त्याग करून रानावनात जाऊन तपश्चर्या केली पाहिजे, असे नाही. एक सांसारिक मनुष्य, गृहस्थाश्रमी असलेला कुटुंबकबिल्यातील व्यक्तीही त्या परब्रम्हाला जाणू शकतो. स्त्रीपुरुष अशा दोघांनाही प्रपंचात राहूनही परमार्थ साधता येतो. प्रपंच करणे म्हणजेसुद्धा स्वधर्मपालन करणे होय. आपला हा धर्म जर व्यवस्थितपणे पार पाडला तर धर्मदृष्ट्या आपण कर्तव्यपालनच करीत असतो. म्हणूनच स्त्रीपुरुष दोघांनाही प्रपंचात राहून परमार्थ कसा करावा, याचे उत्तम मार्गदर्शन बहिणाबाई करतात.

मनुष्याला इच्छा असेल की आपल्या संसाराचे सर्व दुःख नासून जावे व परब्रम्ह 'मुसावे' म्हणजे आपल्या जीवनात मूर्तिमंत अवतरावे, अशी कामना असणाऱ्याने सर्वप्रथम गीतेला शरण जावे. गीतेमध्ये सांगितलेले तत्वज्ञान स्वतःमध्ये रुजवून घ्यावे. असत्याला आपल्या जीवनातून हद्दपार करावे. सत्याचेच दिवसरात्र भजन करावे. सत्याचा आदर करावा. या गोर्ष्टीनीही तुझ्या जीवनात सुखाचा संचार होईल व दुःखाचा नाश होईल.

'गीतार्थ पाहोनी असत्य त्यजावे । सत्यासी भजावे आदरेंचि ।।
मग तू सहज पावसील सुख । संवसारीचे दुःख सर्व नासे ।।'
(अभंग क्र. ४७१, ओ. १, २)

आपल्या धर्माचे पालन केले म्हणजे अनेक गोष्टी आपल्याला प्राप्त होतात. यात सुख, समाधान, शांती यांचा अंतर्भाव तर आहेच, पण मोक्षाचीही याद्वारे गवसणी होऊ शकते. स्वधर्म म्हणजे काय, हे सांगताना -

'वर्णाश्रमसेवा या वेदाचेनि मते । कर्म करी त्याते मोक्ष साधे ।।
चित्तशुद्धि होय विरक्ति सबळ । ज्ञानेचि प्रबळ नाश त्याचा ।।
यथोचित कर्म, फळाचा तो त्याग । कर्तृत्व-विभाग अहंत्यागे ।।
बहेणि म्हणे कर्मत्याग नाही कदा । करावे मर्यादा नुल्लंघोनी ।।'
(अभंग क्र. ४७३, ओ. १ ते ४)

यथोचित म्हणजे आपापल्या वर्णाश्रमाप्रमाणे वाट्याला आलेले वेदविहित कर्म शास्त्राची मर्यादा न ओलांडता करावे, फलाशा धरू नये, अहंकाराचा त्याग केला की कर्तृत्वाचा त्याग आपोआप घडतो. अशी

बहिणाबाईंनी कर्मयोगाची चतुःसूत्री सांगितलेली आहे. वैराग्याचे महत्त्व विशद करताना त्या म्हणतात,

'आश्रमाचे धर्म चालविल्यावरी । शुद्ध ते अंतरी चित्त होय ।।
तेणेचि वैराग्य मनासी ठसावे । श्रवण मनने होय मोक्ष तया ।।'
(अभंग क्र. ५६५, ओ. १, २)

आपल्या वाट्याची कर्मकर्तव्ये केल्यावर मिळणारे समाधान आपले अंतःकरण शुद्ध करण्यास मदत करीत असते. या समाधानातच वैराग्य लपलेले असते. कालांतराने हेच वैराग्य आपल्या मनाचा ठाव घेते. एकनिष्ठपणे आपल्या कर्तव्यपालनामुळे बऱ्याच गोष्टी घडून येतात. त्याच्याने सर्वसिद्धी प्राप्त होते. या आश्रमधर्मात काय नाही? त्यायोगे जीवनातली सर्व सुखे पायाशी लोळण घेतात.

बहिणाबाई वारंवार वर्णाश्रमाच्या वाट्याला येणाऱ्या कर्तव्यांचे वर्णन करतात. ब्राम्हण धर्माचेही यथायोग्य शब्दचित्र काढून ब्राम्हणधर्मातील ब्रम्हनिष्ठेने जो वागेल, त्याला वैकुंठप्राप्ती नक्कीच होईल, असे त्या सांगतात.

'गृहस्थाश्रमी तू सुखे नांद पा रे । स्वरूपस्थितीसी बरे राहि पा रे ।।
जेणे ज्ञानवैराग्य ते आंदणी रे । असे वर्म ते बहेणिसी फावले रे ।।'
(श्लोक ३५२)

बहिणाबाईंच्या चरित्रात डोकावले, तर एक सफल गृहस्थाश्रमी म्हणून त्या नजरेत भरतात. त्यांच्या जीवनात प्रसंगी परमार्थ सोडून त्यांनी संसाराला महत्त्व दिले. त्यांच्या आत्मचरित्रपर अभंगांतून हे वारंवार दिसून येते. त्यामुळे स्वानुभवावरून गृहस्थाश्रम सांभाळावयाला विशेष महत्त्व देतात, हे साहजिकच आहे. त्यांनी स्वतः गृहस्थाश्रमाचे पालन करून स्वरूपस्थितीला जाणले, याचे परिणाम काय झाले, हे ज्ञातच आहे. अशा वेळी त्यांनी केलेला उपदेश मनाला सहजच पटून जातो; कारण त्यांचे उदाहरण डोळ्यांसमोरच असते. 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः' हे गीताप्रणीत तत्त्व त्यांनी आपल्या अध्यात्मपर अभंगांतून मांडले. हाच बहिणाबाईंनी सांगितलेला कर्ममार्ग होय.

## २. ज्ञानमार्ग :

आत्म्याची विवंचना करून, मनाला सर्व इच्छांबाबत मारून देहाची दुर्दशा करून आत्मतत्त्व समजणार नाही. मायेचे निरसन जोवर करीत नाही, तोवर आत्मतत्त्वाचे स्वरूपही कळणार नाही. द्वैताचा ऱ्हास, कल्पनेचा नाश व भ्रांतिच्छेद करून देहाहंकार नष्ट केल्याशिवाय आत्मज्ञान होणार नाही.

'कवण याची माता कवण याचा पिता । अमुकची तत्त्वता कवण जाणे ।
बहेणि म्हणे कोणा पुसो याची कथा । ऐसे विवंचिता कल्प गेले ।'

(अभंग क्र. १६३, ओ. ५, ६)

आत्मज्ञानाची जिज्ञासा बहिणाबाईंना फार मोठ्या प्रमाणात आहे. बहिणाबाईंची ही जिज्ञासा त्यांना ज्ञानाकडे प्रवास करण्यास प्रवृत्त करते. शेवटी सद्गुरूच्या म्हणजेच तुकारामांच्या आशीर्वादाने त्या ज्ञानमार्गाला जाऊन पोचतात. सद्गुरूने निरूपण केलेले ज्ञान प्राशन करून त्या म्हणतात, 'तुकाराम कृपादान तरियले साचे ।'

तुकारामांच्या कृपाप्रसादाने ज्ञानी झालेल्या बहिणाबाई मग अधिक आत्मविश्वासाने आत्म्याचे निरूपण उद्बोधक व मनोरंजक रूपाने सादर करतात.

'बहिणाबाईंनी प्रवृत्तीनिवृत्तीची योग्य सांगड घालून सामान्यांना आदर्श भक्ती शिकवली. त्यांना वर्णकर्मानुसार समाजरचना पसंत होती. म्हणूनच त्यांनी आपल्या भक्तांना 'स्वधर्मपालन हे परमश्रेष्ठ' याचा सतत उपदेश केला. आध्यात्मिक साधना व सामाजिक शूचिता यांवर भर दिला. त्यांनी सतत योगसाधनांचाही पुरस्कार केला. अध्यात्माच्या तर त्या अधिकारी होत्याच; पण त्यांनी आपले तत्त्वज्ञान क्लिष्ट होऊ दिले नाही. त्या दृष्टीने त्यांचा 'पंचतत्त्वाचा पाळणा' मुळातून वाचायला हवा.'[४०] आत्मा म्हणजे देह नव्हे, हा महत्त्वाचा विचार बहिणाबाईंनी 'पंचतत्त्वाचा पाळणा' ह्या रूपकात मांडला आहे. साधकरूपी बालकाला पंचमहाभूतात्मक देहरूपी पाळण्यात निजवून बहिणाबाई त्याला 'जो जो रे बाळा वेल्हाळा' असे म्हणून जोजवीत आहेत. त्यांच्या हातात सोऽहमरूपी दोरी आहे. अंगाईगीत गाताना त्या 'तत्त्वमसी'चा उपयोग करीत आहेत. हेतू हा की या बालकाला उन्मनी अवस्थारूपी झोप लागावी व तो ज्ञानी व्हावा, त्यांच्या या अंगाईगीतात पंचमहाभूते, त्यांचे प्रत्येकाचे पाच गुण, त्यांचे पंचीकरण आणि कार्य सांगितले आहे. तसेच स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण हे चार देह, त्यांचे स्वरूप व

कार्ये यांचे सविस्तर वर्णन करून त्या सांगतात, 'हे बाळा, हे तरी तू नव्हेसी, तू या वेगळा जाण ।' हे वेगळेपण कशात आहे?

'तू तव यासी साक्षीभूत । तू तया अलक्ष सकळा ।।'

(पाळणा ६१२, क. ९)

पंचमहाभूतात्मक देह म्हणजे तू नव्हेस, तर त्यांना पुरून उरणारा द्रष्टा, साक्षी असा तू आहेस. हे जाणून घेणे हीच ज्ञानाची गुरुकिल्ली आहे.

'प्रपंच नाशवंत याचा नाही रे भरंवसा ।
कन्यापुत्रगृहदारा हा तव भवबंध-फासा ।
दृश्य हे मायाजाळ हा तव काळाचा वळसा ।
सावध होई बाळा परतोनी पाहे कैसा ।।
जो जो रे जो जो बाळा ।।धृ।।'

(पाळणा ६१२, क. १)

या प्रपंचाकडे पाठ फिरविल्यास तुझे स्वरूप तुला तात्काळ कळेल. हा प्रपंच, नाशवंत आहे. कन्या, पुत्र, पत्नी हे तुला यात अडकवणारे फास आहेत. आजूबाजूचे भौतिक जग फक्त मायाजाळ आहे. म्हणून तू सावध हो. परत फिरून पाहू नकोस आणि ज्ञानाच्या दिशेने वाटचाल कर. जशी नदी सागरात मिळते, तशा पाचही अवस्था तुझ्यात निमाल्या आहेत. हेच तुझे खरे स्वरूप आहे.

बाळाला झोपवता झोपवता त्या आत्मानुभव हळूच त्याच्या कानात सांगतात. 'तुकारामे निजविले बहिणी प्रेमे डोलताहे ।' तुकारामांनी आपल्याला ज्ञानद्वार उघडे करून दिले. त्यामुळे त्यांना सुखचसुख प्राप्त झाले. अशा या ज्ञानाच्या प्रकाशात समाधानाच्या लाटांवर डोलत बहिणाबाई आनंदाने झोपी गेल्या, असे वर्णन आले आहे.

आत्मा व देहाचे भिन्नत्व दर्शविण्यासाठी त्या अजून एक रूपक मांडतात, ते म्हणजे 'आत्माकाया भांडण'. हे पती-पत्नीचे भांडण रंगवून बहिणाबाईंनी आत्मा देहात प्रतिबिंबरूपाने राहतो, हे पटवून दिले आहे. काया श्रेष्ठ की आत्मा श्रेष्ठ? पत्नी श्रेष्ठ की पती श्रेष्ठ? असे पती-पत्नीचे भांडण जुंपल्यावर कोणीच हार मानायला तयार होईना. दोघेही आपापल्या जागी श्रेष्ठ. शेवटी जेव्हा या गोष्टीची जाणीव झाली, तेव्हा आत्मा कायेला म्हणाला,

'तुजमज संगतीच मूळ । जैसा चंद्र उदकीच सोज्ज्वळ ।।
भासे परी अभिन्न केवळ । तैसा कायेमध्ये हा गोपाळ ।।
ऐसा आत्मा बोलता आपण । मग कुडी पडियेली जाण ।।
आत्मा आहे व्यापक परिपूर्ण । देही आहे परी विलक्षण ।।'
(अभंग क्र. ४५२, ओ. १५, १६)

चंद्राचे प्रतिबिंब पाण्यात पडले असता पाणी व चंद्र एकच असल्यासारखे भासतात पण ते खरे नसते. त्याचप्रमाणे आत्मा व काया यांचे एकरूपत्व असेच आभासात्मक असते. कायेचे अस्तित्व क्षणभंगूर असते तर आत्मा हा सर्वगत व सर्वव्यापक असतो.

आत्मा देह नव्हे; पण देह इंद्रियांद्वारे सर्व कार्ये करीत असतो म्हणून इंद्रिये म्हणजे आत्मा, असाही अज्ञानी लोकांचा समज होईल. कारण देह हा सर्व इंद्रियांद्वारे कार्य करीत असतो. अज्ञानी लोकांचे हे अज्ञान दूर करण्यासाठी बहिणाबाई म्हणतात, पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, शब्दस्पर्शादी पाच विषय, अंतकरण, मन, बुद्धी, चित्त, अहंकार व पंचप्राण या पंचवीस तत्त्वांपैकी एकही आत्मा नव्हे. आत्मतत्त्व यामध्येच राहणारे पण याहून वेगळे आहे. त्याचे स्वरूप 'आत्मा तो सम्यक् वेगळाचि ।' असे आहे. देह व आत्मा यांच्यातील वेगळेपण दाखविण्यासाठी बहिणाबाई एक उदाहरण देतात.

'आकाशीचा सूर्य जळात बिंबला । तरी काय बुडाला तयामाजी ।।
तैसा या शरीरी अलिप्तचि असे । इंद्रियसमरसे असोनिया ।।
चुंबकदर्शने लोखंडा चळण । आत्मा देही जाण तैसा असे ।।'
(अभंग क्र. १६२, ओ. १, २, ३)

आकाशातील सूर्य जळात दिसेनासा झाला, म्हणजे तो काही जळात बुडाला, असे नव्हे. चुंबकाला पाहून लोखंड आकर्षिले जाते. पूर्णचंद्र झाल्यावर सिंधूला भरती येते. वसंत आल्यावर जशी पुष्पे, फळे येतात, तसे देहामुळे आत्म्याला मोह, कामना, इच्छा, आकर्षण या सर्व गुणांनी लिप्त व्हावे लागते. एकाचे प्रदीपन दुसऱ्याला चेतविते. म्हणून बहिणाबाई म्हणतात, 'आत्मा सर्वांच्या अतीत आहे; पण देहाच्या अनुभवाने त्याला सर्व पदार्थांशी जोडल्या गेले आहे. तरीही हे सगळे भोग भोगून तो अलिप्त असतो. जसे पाण्यात कमलिनीचे पान, ताकात लोणी, काष्ठात अग्नी हे अलिप्त असतात, तसा आत्मा देहांद्रियांत असून अलिप्त असतो. आत्म्याविना

देह अचेतन असतो. आत्म्याच्या प्रभावाने हा अचेतन देह सचेतन होतो, कारण आत्मा हा चैतन्यस्वरूप आहे.

‘चुंबक चालवी लोखंडा प्रत्यक्ष । क्लेश हे तयास जेवी नाही ।।
तेवी आत्मा सर्व करोनि अकर्ता । पाहे तू स्वचित्ता वोळखोनि ।।
सूर्याचेनि जेवि भासे मृगजळ । जनक्रिया सकळ सूर्ययोगे ।।
बहेणि म्हणे आत्मा ऐसा जया कळे । तयाचा मावळे जन्ममृत्यु ।।’
(अभंग क्र. ४८४ ओ. १ ते ४)

चुंबकामुळे लोखंडाला चालना मिळते पण यासाठी चुंबकाला काही प्रयत्न करावे लागत नाहीत. सूर्यामुळे मनुष्याला मृगजळाचा भास होतो. मनुष्यजीवन सूर्यावरच अवलंबून असते. सूर्य हा जीवनदाता आहे; पण सूर्याला याचे काही सोयरसुतक नाही. तसेच आत्मा हा सर्व जीवनाला कारणीभूत असूनही आत्म्याला त्याचे काही बंधन नाही. आत्मा या सर्वांपासून दूर आहे. हेच तत्त्व पटवून देण्यासाठी बहिणाबाई अजून एक सुंदर उदाहरण देतात.

‘देहयंत्र वाहे हरी । निजसत्ते वाजवी कुसरी ।।
वाचा-तारा लाविल्या हारी । येके स्वरे वाजवी चारी ।।
इंद्रियरंध्रे केली प्रगट । मनसारी लाउनी नीट ।।
ॐकारध्वनि सूक्ष्मनाद । मातृका पिळोनी शुद्ध ।।
बहेणि म्हणे अनुभव घ्यावा । वाजवी कोण तो पहावा ।।’
(अभंग क्र. ४१२, ओ. १ ते ५)

देहरूपी तंबोरा आहे. त्याला परा आदी चार वाचारूपी चार तारा आहेत. त्या एकस्वराने कोण वाजवीत आहे. इंद्रियरूपी रंध्रे मोकळी करून, मणके नीट बसवून, मातृकारूपी खुंट्या पिळून ॐकार ध्वनीचा सूक्ष्म नाद कोण काढीत आहे? याचे उत्तर देताना बहिणाबाई म्हणतात की, हरीच हे देहयंत्र वाजवीत आहे. हा हरी म्हणजेच आत्मा होय. आत्म्याचे ज्ञान डोळ्यांना किंवा ज्ञानेंद्रियांना होत नाही. मन हे चिन्मय झाले, की मनाला आत्म्याची जाणीव होते. अर्थात अशा वेळी मनाचे अचेतनत्व जाऊन ते ब्रम्हत्वाला प्राप्त होते. ‘चित्तं चित् विजानीयात् तकाररहितं यदा ।’ मन हे जड व चेतन दोन्ही स्वरूपाचे असते. त्यातले जडत्व म्हणजे तकार निघून गेला की तेच चित्‌रूप होते व आत्मज्ञानास योग्य होते.बहिणाबाईंनी हा महत्त्वाचा विचार ‘होय मना बोध ब्रह्मपणी’ यातील ‘ब्रह्मपणी’ या शब्दांत

उलगडून सांगितला आहे. असा आत्मबोध झाला, की सर्व दुःखे नाहीशी होतात, असे सांगितले आहे. 'जीवात्मा स्वतःचे खरे स्वरूप विसरतो. मी कर्ता, भोक्ता व देह आहे, असा भ्रम तो करून घेतो व दुःखात अडकून पडतो. त्याला बहिणाबाई 'लटिके मीपण' म्हणतात. आत्मा हा देह, इंद्रिये, मन, बुद्धी, चित्त, अहंकार यांच्यापैकी काही एक नसून तो या सर्वांपेक्षा वेगळा व अलिप्त आहे. तो प्रत्येकाच्या हृदयात अंतर्यामी असतो. तो साक्षीभावाने जाणावयाचा असतो.'[४१]

आत्मस्वरूप सांगताना त्या म्हणतात, ज्याचा बोध करून घ्यायचा, तो आत्मा प्रत्येकाच्या जवळ त्याच्या हृदयात भरलेला आहे आणि जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीनही अवस्थांमध्ये साक्षीरूपाने तो सदा वर्तत असतो. त्याच्या सत्तेनेच सर्व इंद्रियव्यापार चालतात. तो अविनाशी आणि त्रिगुणातीत आहे.

'त्रिगुणापरते आहे तेची एक । भावने भाविक जाणती ते ।।
सर्वामाजी असे सर्वांही वेगळे । इंद्रिया नाकळे अखंडत्वे ।।
आहे म्हणो तरी न दिसेच डोळा । नाही तो आगळा तो भास याचा ।।
बहेणि म्हणे नाही नामरूप गुण । सर्वांठायी पूर्ण सदोदित ।।'

(अभंग क्र. १५६, ओ. १ तें ४)

आत्मा म्हणजेच ब्रम्ह, आत्मा म्हणजेच नामरूपगुणातीत अखंड एक रस आहे. इंद्रियांना तो अगोचर आहे. तो सर्वव्यापी सदासर्वकाळ असणारा, पूर्णस्वरूप व सर्वांतर्यामी आहे.

आत्मबोधासाठी बहिणाबाईंना विवेक, वैराग्य व सद्‌गुरुकृपा या सर्व गोष्टी आवश्यक वाटतात. हे सर्व असल्यास आत्मबोध सुलभ व लवकर होईल, असे त्या निक्षून सांगतात. विवेकामुळे काय साध्य होते?

'बहेणि म्हणे आता विवेकाचा दीप । घेवोनी स्वरूप पाहे डोळा ।।'

(अभंग क्र. ४६९, ओ. ४)

या विवेकरूपी दीपाने अविद्यारूपी अज्ञानअंधकाराचा नाश कर, म्हणजे तू निर्वाण मिळवशील असे सांगून पुढे बहिणाबाई म्हणतात, 'नित्य काय, अनित्य काय, याला विवेक म्हणतात. विवेकाचे सार कोणते? सत्य हे विवेकाचे सोलीव सत्य आहे. हे सत्य कुठे सापडेल? गीतेत सापडेल.

'गीता तारक कलियुगी जाणती अनुभवी ते ।
गीता-पाठक होती हरीरुप जाणा ते ।।

(आरती क्र. ४४१, क. ३)

म्हणूनच बहिणाबाई गीताप्रणीत तत्त्वज्ञानावर भर देतात. त्यानुसार वागल्याने मनुष्याला विवेक व वैराग्य प्राप्त होते. चित्तशुद्धी होते व अखेर ज्ञानप्राप्ती होते. वैराग्य प्राप्त होण्यासाठीही विवेकाची मदत होत असते. विवेकाची मदत कशाप्रकारे होते, हे स्पष्ट करण्यासाठी त्या स्वतःचा अनुभव सांगतात. आपल्या मनाचे उदाहरण देतात. साधकावस्थेतील बहिणाबाईंना प्रपंचाकडे ओढणाऱ्या आपल्या मनाशीच मन कठोर करून भांडण करावे लागले. आपल्या मनःपर अभंगांत त्यांनी मनाशी संवाद केलेला आहे. त्यात त्या म्हणतात, 'हे मना, मी विवेक हा मंत्री जोडला आहे. या विवेकाची बेडी तुझ्या पायात बांधते आणि तुझ्या सर्व खोड्या मोडते. विवेक हाच माझा सांगाती, कैवारी आहे. विवेकपूर्वक मी वेदान्ताचे श्रवण करून ब्रम्हप्राप्ती करून घेईन. हे मना, हा माझा निश्चय असल्याने 'मना तू इंद्रियासमवेत होय शरणागत अच्युताचा ।'

मन शेवटी मनच. ते इतक्या सहजासहजी मानणारे नाहीच. विवेकाच्या बेड्या पायात घातल्या तरी मनाची अनिर्बंध धाव काही कमी होत नाही. तेव्हा बहिणाबाई पुन्हा त्याची विनवणी करतात, 'माझ्या सज्जन मना, मी तुला प्रार्थना करते,

'माझिया रे मना सखया सज्जना । ऐक तू प्रार्थना विनवितसे ।।
सांडी हे मीपण अहंतालक्षण । निवांत आपण सुखी राहे ।।
किती वणवण करिसी भ्रमण । व्यर्थ वायाविण श्रम देही ।।
मायामृगजलापाठी का लागसी । कष्ट का भोगसी चौऱ्यांशीचे ।।
येणे काय हित घडो पाहे तुज । धरी काही लाज सज्जनांची ।।
बहेणि म्हणे गेले संत जया वाटा । पावले ते निष्ठा सुखरूप ।।'

(अभंग क्र. ३४८, ओ. १ ते ६)

त्या मनाची विनवणी करून त्याला अहंकाराचा त्याग करावयास सांगतात, तुझ्या मोहमायेमुळे तू चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यात अडकून पडशील. त्याने तुझे काय हित होणार आहे? संत सज्जन ज्या वाटेने गेले, तेथेच खरे सुख, समाधान आहे.

बहिणाबाई अशातऱ्हेने मनाला परेपरीने समजावतात, तरीदेखील मन काही ऐकायला तयार होत नाही. एखाद्या वारे घुसलेल्या

वासराप्रमाणे ते इकडेतिकडे धावतच आहे. शेवटी बहिणाबाईंना त्याला धाक दाखवावा लागतो.

'मना तुझी सर्व वहने हिरोनी । नेली ती बांधोनी विवेके हो ।।'

(अभंग क्र. ७५, ओ. १)

विवेकाने, माझ्या मंत्र्याने तुझी वहने म्हणजेच इंद्रिये केशवाच्या सेवेला बांधून टाकली आहेत. ती आता विषयसेवन करू इच्छित नाहीत.

'दहाही इंद्रिये होऊनी पारखी । विवेकाची सखी सर्व जाली ।।
बहेणि म्हणे तुज रूप नाही नाव । मना तुझी धाव पारुषली ।।'

(अभंग क्र. ७५, ओ. ३, ४)

बहिणाबाईंच्या या धाक दाखवण्यावर मन त्यांना हसून चिडवते. ते म्हणते, जेथे इंद्र, ब्रम्ह, मोठमोठे ऋषी यांचा माझ्यासमोर पाड लागला नाही, या सर्वांनाच मी ठकविले, नारदाला माझ्यासमोर नाचविले, शिवाला रानोरानी हिंडविले, विष्णू, व्यास हे माझ्याविरुद्ध वागू शकले नाहीत, तेथे तू माझे काय बिघडवणार? मनाने असे प्रतिशब्द वापरून बहिणाबाईंना घाबरविले, तरी मनाच्या या आविर्भावासमोर घाबरून जाणाऱ्या बहिणाबाई नव्हत्या. त्याच्या प्रश्नावर बहिणाबाई ठामपणे उत्तर देतात, हे मना, ज्यांना तू ठकविले, ते सर्व आपल्याच कामनेने कामाधीन झाले होते. इंद्र, ब्रम्ह, नारद, शिव, व्यास हे सर्वच वासनेच्या आहारी गेले होते, अशांना तू बांधून ठेवलेस, यात काय मोठेसे केले? यात तुझे कोणतेही कर्तृत्व नाही. माझ्या मनात आता भोगाला स्थान उरले नाही. सर्व वासना जिंकून मी निर्वाणाची वाट पाहते आहे. इतकेही करून तू मला ठकविणार असशील, तर त्यावरही उपाय माझ्याजवळ आहे. हा उपाय अवलंबिला, म्हणजे तुझे अस्तित्वही उरणार नाही. हा श्रेष्ठ उपाय म्हणजे, सद्‌गुरूची कृपा होय. सद्‌गुरूकृपेपुढे तुझे काहीही चालणार नाही.

गुरुकृपेमुळे बहिणाबाईंना विश्वास आहे, की त्यांच्या वैराग्याला पूर्णत्व मिळेल. मनाची कोणतीच इच्छा पूर्ण होणार नाही. म्हणून त्या मनाला म्हणतात, गुरुकृपा झाल्यावर तू एवढेसे तोंड करून कोपऱ्यात बसलेला असशील. एखाद्या अनाथासारखी तुझी स्थिती होईल.

बहिणाबाईंची ही युक्ती मनावर एकदम लागू पडते. सद्‌गुरूचे नाव ऐकून आतापर्यंत चंचल असलेले, सगळे ब्रम्हांड पालथे

घालणारे मन एकदम शांत होऊन जाते. बहिणाबाईंचे हे मनःपर अभंग म्हणजे साधकांना 'मनाला कसे आवरावे?' याविषयी मार्गदर्शन करणारे अभंग आहेत.

## सिद्धावस्थापर अभंग :

सद्गुरुकृपेने विवेक वैराग्य प्राप्त होऊन चित्तशुद्धी होते व शुद्ध चित्तात आत्मबोध होतो. हा आत्मबोध कसा होतो हे सांगताना बहिणाबाई सद्गुरुचे महत्त्व विशद करतात. सद्गुरुच्या मुखाने श्रवण केलेले वाक्य हे अग्निस्वरूपच असते. आपल्या वासनारूपी समिधांचा त्यात होम केला की अविद्या, अस्मिता, कामक्रोधादी विकारांतून मनुष्य मुक्त होतो. हीच खरी मनाची पूर्णाहुती असते. असा होम करणाऱ्या ज्ञानी माणसाला विरक्ती हीच भार्या प्राप्त होते व शांती, दया, क्षमा व निजबोध ही अपत्ये प्राप्त होतात.

बहिणाबाईंना जो ब्रम्हज्ञ आहे तोच ब्राम्हण आहे असे वाटते. अन्य कोणीही ब्राम्हण या संज्ञेला प्राप्त नाही. जे जन्माने ब्राम्हण जातीत जन्मले ते वीर्यमात्र ब्राम्हण होय.

'अवभृतस्नान केले ज्ञानगंगे । शेष ते विभागले सेवियेले ।।
बहेणि म्हणे ऐसे चिन्ही जे चिन्हित । ब्राह्मण निश्चित तेचि एक ।।'
(अभंग क्र. ३००, ओ.४, ५)

किंवा

'परब्रह्म जाणे तोचि की ब्राह्मण । देव तो आपण प्रत्यक्षचि ।।
बहेणि म्हणे एक वीर्यमात्र द्विज । ऐसे ते सहज सांगितले ।।'
(अभंग क्र. ३०१, ओ.२, ४)

जन्मावर ब्राम्हणत्व ठरत नसून परब्रम्ह जाणणारा तोच खरा ब्राम्हण, असे परखड वेगळे विचार बहिणाबाईंनी आपल्या अभंगांतून मांडले आहेत. पुढे त्या म्हणतात की, सद्गुरुमुखाने श्रवण केलेल्या महावाक्यांचा बोध ज्याला झाला, जीव-शिव, पिंड-ब्रम्हांड यातील ऐक्य ज्याला प्रतीतीस आले, तोच खरा ब्राम्हण.

असे खरेखुरे ब्राम्हणत्व बहिणाबाईंना तुकारामांच्या ठिकाणी प्रत्ययास आले. शुद्र जातीत जन्म होऊनही कठोर साधना यामुळे आध्यात्मिक ब्राम्हणत्व प्राप्त करून घेतलेल्या तुकोबांपुढे केवळ जन्माने ब्राम्हण असलेल्या पण बहिणाबाईंना अभिप्रेत असे एकही ब्राम्हणत्वाचे चिन्ह नसलेल्या, तरीही ब्राम्हण म्हणून मिरविणाऱ्या मंबाजीसारख्या खोट्या ब्राम्हणांवर बहिणाबाई आपल्या वाणीने कोरडे ओढतात. ब्राम्हणत्वाचे खरे स्वरूप पटवून देण्यासाठी त्या वेदांचा आधार घेतात.

'ब्रह्मची ब्राह्मण बोलताती श्रुती । वचनासी वंदिती लोकत्रय ।'
(अभंग क्र. २७७, ओ. २)

'बहेणि म्हणे तैसे ब्रह्म जेथे नांदे । ब्राह्मण तो वेदे प्रतिष्ठिला ।।'
(अभंग क्र. २९५, ओ. ४)

'ब्रह्म जाणे तोचि बोलिजे ब्राह्मण । वेदींचे वचन साक्ष यासी ।।
पहा अनुभव आपुलिया देही । शास्त्रासीही ग्वाही करोनिया ।।'
(अभंग क्र. २९६, ओ. १, २)

'भक्ति, ज्ञान आणि वैराग्य मानसी । जाण वेद ज्यासी प्राप्त जाले ।।
तोचि रे ब्राह्मण जाण ब्रह्मवेत्ता । आणिक तत्त्वता द्विजोत्तम ।।'
(अभंग क्र. २९८, ओ. १, २)

'बहेणि म्हणे ऐसे ब्राह्मण ते सत्य । वेदार्थ निश्चित हाचि खरा ।।'
(अभंग क्र. २९९, ओ. ४)

अशाप्रकारे बहिणाबाईंनी वेदशास्त्रांचा आधार ठिकठिकाणी दिला आहे. संत बहिणाबाईंच्या सिद्धावस्थापर अभंगांत कवित्वशक्तीचा उत्कट व अत्युच्च विलास आढळतो. श्रेष्ठ अध्यात्मानुभावाचे दर्शन घडते. भाषेला कोवळीक लाभून आशय व अभिव्यक्ती एकरूप होऊन जातात. अरूपाला रूप लाभते. अतींद्रिय अनुभवाचा इंद्रियांकरवी भोग घेता येतो.

## 'वज्रसूचि-उपनिषद' यावरील भाष्यपर अभंग :

ब्राम्हणत्वासंबंधीचे आपले विचार स्पष्ट करण्यासाठी बहिणाबाई पुढे 'वज्रसूचि-उपनिषद' यावर भाष्य करताना दिसतात. अभंग क्र. २७७ ते २९४ मध्ये या उपनिषदाचा अनुवाद केला आहे. तसेच अभंग क्र.

२९५ ते ३०२, ३०६ ते ३०८, ३७४, ५६२ ह्यांत ब्राम्हणत्वावरील आपले स्वतंत्र विचार बहिणाबाईंनी मांडले आहे. जन्मजात ब्राम्हण्यावर वज्राप्रमाणे आघात करणारे म्हणून याला 'वज्रसूचि' हे सार्थ नाव ठेवले आहे. यांत सर्वात प्रथम प्रश्न उपस्थित केला आहे, की 'ब्राम्हण' कोणाला म्हणावे?

'जीव हा ब्राह्मण म्हणावे इत्यर्थ । तरी येथे अर्थ सापडेना ।।
सर्वाठायी जीव सारिखाचि एक । पशु पक्षी देख चांडाळादी ।।
पुढे जीव होती मागे बहु जाले । ब्राह्मणत्व आले नाही तया ।।
बहेणि म्हणे जीव प्राणिमात्री एक । ब्राह्मणत्व देख म्हणो नये ।।'
(अभंग क्र. २७९, ओ. १ ते ४)

सर्वांमध्ये सारखाच जीव असतो. पशू, पक्षी, चांडाळ अशा सर्वांत एकच जीव आहे. देह, वर्ण, जाती, पांडित्य, कर्म व धर्म यांनी ब्राम्हणत्व सिद्ध होत नाही. मग ब्राम्हण कोणाला म्हणावे?

ब्राम्हण त्याला म्हणावे, ज्यांच्या मुखाने देव तृप्त होतात, ज्यांच्या मंत्राने पाषाणातही देव प्रगटतात, ज्यांचे तीर्थ प्राप्त झाले असता, सर्व पृथ्वीची तीर्थयात्रा केल्याचे पुण्य प्राप्त होते, ज्यांच्या दर्शनाने पापे जळतात, अशा ब्राम्हणांची एक क्षणभर जरी सेवा केली, तरी अंतरीची कामना पूर्ण होते. त्याच्यासाठी प्राण वेचल्यास इंद्रपदाची प्राप्ती होते. या ब्राम्हणांपाशी मोक्ष हा किंकर असतो. चारी मुक्ती त्याच्या आज्ञाधारक दासी असतात. त्यांच्या देहात मूर्तिमंत भगवंत असतो. त्यांचे शरीर विवेकरूप झालेले असते. 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' अशी वेदाज्ञा आहे. अशाच एका श्रेष्ठ ब्राम्हणाची म्हणजे भृगूऋषींची लाथ श्रीविष्णूंनी श्रीवत्सलांछन म्हणून मोठ्या आनंदाने भूषण म्हणून धारण केली आहे.

अशा ब्राम्हणांच्या पायाशी लोटांगण घालणे, एवढेच आपल्या हातात असते. मनुष्यांत वावरणारे हे देव म्हणजे सामान्य जनांना तारक असे आहेत.

बहिणाबाईंनी जे 'वज्रसूचि'वर भाष्य केले आहे, त्यात आध्यात्मिक किंवा पारमार्थिक ब्राम्हणत्व वर्णन करताना जन्मजात किंवा व्यावहारिक ब्राम्हण्यापेक्षा पारमार्थिक ब्राम्हण्य निःसंशय श्रेष्ठ सिद्ध केले आहे. ब्रम्हसाक्षात्कार झाल्यावर या ब्राम्हणत्वाची प्राप्ती होत असते. ही प्राप्ती करून घेण्याचा अधिकार सर्व थरांतील, सर्व वर्णांच्या, सर्व वयाच्या लोकांना, स्त्रीपुरुषांना आहे. 'ज्ञानेश्वरादी संतांनी परमार्थाचा मार्ग सर्वांनाच खुला केला.

फार मोठे असे हे कर्तृत्व त्यांनी गाजवले आहे. भारताच्या इतिहासात ते सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे. आध्यात्मिक उन्नतीच्या क्षेत्रातील मानवी हक्कांचा हा जाहीरनामाच होय. संतांनीच ही परमार्थाची सनद प्रथम अखिल जनसमाजाचे हाती दिली व मोठी क्रांती केली.'[४२]

## जीवन्मुक्तावस्थापर अभंग :

ज्ञानवंत लोक हे स्वतः जीवन्मुक्त होऊन दुसऱ्यासही जीवन्मुक्त करीत असतात. अशा अवस्थेला पोचविणाऱ्याचे स्वतःचे जीवन कसे असते? यावर बहिणाबाई उत्तर देतात, असे लोक देहधारी असूनही देहातीत असतात. 'असोनि संसारी देहातीत ।' शरीर हे प्रारब्धाधीन असते.

'प्राक्तन भोगवी भोगतो शरीरी । ज्ञानिया अंतरी सुखरूप ।।
बहेणि म्हणे देह प्राक्तन तोवरी । विचार अंतरी निश्चयाया ।।'
(अभंग क्र. २४१, ओ. ३, ४)

आत्मा हा शरीराहून भिन्न असल्याने आत्मरंगी रंगलेला ज्ञानी मनुष्य सुखरूप असतो. निःस्पृह अशा व्यक्तीला ज्याप्रमाणे दंड काही करू शकत नाही, त्याप्रमाणे निवृत्तीपुढे प्राक्तनाचे बळ टिकत नाही.

'नाही दंड जैसा निःस्पृही रायाचा । तैसा प्राक्तनाचा निवृत्तीसी ।।
बहेणि म्हणे पाहे प्राक्तन वरिष्ठ । प्रवृत्ति हे श्रेष्ठ मानी तया ।।'
(अभंग क्र. २४०, ओ. ३, ४)

परंतु प्रवृत्तीत रममाण होणाऱ्याला मात्र प्रारब्धाधीन व्हावे लागते. ज्याप्रमाणे अग्नी आपले दाहकत्व, पाणी आपले शीतलत्व व मन आपले चंचलत्व सोडीत नाही, त्याप्रमाणे शरीरही आपले प्रारब्ध टाकू शकत नाही.

प्रारब्ध हे शरीराचे उपादान कारण असते. जसे प्रारब्ध भोगायचे असेल, तसे शरीर प्राप्त होते. सुखदुःखाचे भोग त्या शरीराच्या वाट्याला येतात. ज्ञानी मनुष्य मात्र आत्मरत असल्याने सदैव स्वानंदातच असतो. प्रारब्ध कितीही प्रतिकूल असले, तरी मनाने निवृत्त असलेल्या जीवन्मुक्तकाचा आनंद हिरावून घेऊ शकत नाही. हीच ती जीवन्मुक्तावस्था.

अशा आत्मज्ञानी मनुष्याचे शरीर मृत्युमुखी पडेपर्यंत त्यास जीवन्मुक्त म्हणतात. त्याचे शरीर एकदा मृत्युमुखी पडले की त्याला पुन्हा जन्म येत नाही. असे का होते, हे बहिणाबाई पटवून देतात -

'जळाले ते वस्त्र कैसे पांघरेल । देठी का जडेल पक्वपत्र ।।
तैसे ज्ञानियाचे भासते शरीर । बाधील संसार केवी तया ।।'
(अभंग क्र. २४२, ओ. १, २)

जीवन्मुक्त मनुष्याला जळलेले वस्त्र किंवा पक्वपत्र अशी उपमा देऊन यांचे जसे पुन्हा जीवन नसते, तसेच जीवन्मुक्त मनुष्याचेही जीवन त्याच्या मृत्यूसोबत समाप्त होते, हे बहिणाबाई स्पष्ट करतात. त्याचीच अधिक उदाहरणे त्या देतात -

'भाजले ते बीज अंकुरेना कदा । न मिळेचि दुधामाजी लोणी ।।
पैसा तो ज्ञानिया जन्म न घे जाण । वासना भाजून वर्ततसे ।।'
(अभंग क्र. २४३, ओ. १, २)

आत्मज्ञानरूपी अग्नीत सर्व वासना भाजून निघाल्यामुळे भाजलेले बी पेरले तरी ज्याप्रमाणे पुन्हा अंकुरत नाही, त्याप्रमाणे ज्ञानी मनुष्य पुन्हा जन्मास येत नाही. दुधातून निघालेले लोणी पुन्हा दुधात मिसळू शकत नाही, परिसाच्या संगतीने सुवर्णरूप झालेले लोखंड पुन्हा लोहरूप घेत नाही, तसाच ज्ञानी मनुष्य पुन्हा जन्माला येत नाही. त्याचा जन्ममरण परंपरेचा ८४ लक्ष योनींचा फेरा त्याच्यासोबतच संपतो.

## ३. भक्तिमार्ग :

भक्ती ही चित्तशुद्धीचे एक साधन आहे. चित्तशुद्धीमुळे वैराग्य उत्पन्न होते. वैराग्यामुळे सर्व विषय मृगजळाप्रमाणे आहेत, याची जाणीव होते. विषयापासून मन विरक्त झाले, की प्रपंचाची आसक्ती सुटते.

'भक्ति हे कारण साधन वरिष्ठ । रोकडे वैकुंठ हाती वसे ।।
स्थिर करी चित्त प्रेम अखंडित । पावसी अच्युतपद पाहे ।।
भक्तीपासी ज्ञान वैराग्य आंदणे । सर्वही साधने लया जाती ।।
बहेणि म्हणे भक्ति विरक्तीचे मूळ । चित्त हे निश्चळ करी का रे ।।'
(अभंग क्र. ८०, ओ. १ ते ४)

सर्व साधनांत श्रेष्ठ असे साधन असणाऱ्या भक्तीचा महिमा सांगताना, बहिणाबाई भक्तीला वैकुंठप्राप्तीचे साधन म्हणतात. भक्तीमुळे अच्युतपद प्राप्त होते. भक्तीपाशी ज्ञान, वैराग्य यांचा वावर असतो. सर्व विरक्तीचे मूळ भक्तीतच आहे. ज्ञानप्राप्ती करून देणाऱ्या अशा या भक्तीचे स्वरूप कसे आहे, हे समजावून देण्यासाठी भक्तीची सुंदर व्याख्या करतात.

'संताचे वचनी दृढ जया भाव । भक्ती अभिनव हेचि खरी ।।
बहेणि म्हणे संतापायी जया आर्त । हाचि भक्तिपंथ वोळखावा ।।'
(अभंग क्र. ८१, ओ. १, ४)

संतांवर पूर्णपणे विश्वास टाकून त्यांच्या वचनांना अनुसरणे हीच खरी भक्ती. बहिणाबाईंना संतांवर एवढा विश्वास का आहे? कारण त्यांच्या मते, संतांजवळ असलेली ज्ञानाची निजशक्ती ज्यामुळे अज्ञानाची निवृत्ती होते, संतांच्या कृपेने विषयांचा नाश होतो आणि अविनाशी अशा परब्रम्हाचा आढळ होतो.

'संतांपासी असे ज्ञानाची निजशक्ती । अज्ञानिवृत्ति होय तेणे ।।
यालागी संतासी जावे लोटांगणी । रिघावे शरण मनोभावे ।।
संताचिये कृपे विषयमळा नाश । सापडे अविनाश परब्रम्ह ।।
बहेणि म्हणे संत देव हे प्रत्यक्ष । का रे न घ्या साक्ष मनामाजी ।।'
(अभंग क्र. ३२३, ओ. १ ते ४)

संतांना प्रत्यक्ष देवच संबोधून बहिणाबाई त्यांच्यावरील आपला विश्वास कसा सार्थ आहे, हे पटवून देतात. हे संत आपल्यातील विषय, मोह कसे दूर करतात, तर साधक म्हणजे जणू रोगी. या रोग्याला दुरुस्त करण्यासाठी हे वैद्य त्याला ॐकाराची अर्धमात्रा हाच रस पाजतात व विषयत्याग हेच पथ्य सांगतात. अशाच प्रकारचे दुसरे उदाहरण त्या देतात. पंचविषय रूपी पंचमुखी सर्पाचे विष ज्याला झोंबले आहे. अशा रोग्याला आपल्या केवळ दृष्टिपाताने वाचविणारे संत हे गारुडी आहेत, असे त्या म्हणतात.

संतांचा सहवास केवळ सामान्य जनांनाच आनंद देत नाही, तर प्रत्यक्ष देवसुद्धा संतसंगाची इच्छा करतात, म्हणूनच संतसंग निरूपम आहे. त्याला दुसरा पर्याय नाही. अशा संतांचा अनुग्रह प्राप्त केल्यावर

निश्चितच भक्तही उच्चपदाला पोचतात. अशा उच्चपदाला पोचलेल्या आदर्श भक्ताचे वर्णन करताना त्या म्हणतात -

'भक्ती आणि ज्ञान वैराग्य वोतले । प्रेम वोसंडले सर्वकाळ ।।
क्रिया कर्म जे जे अर्पी ईश्वरासी । अखंड वाचेसी रामराम ।।'
(अभंग क्र. ४२०, ओ. ३, ४)

ज्याच्यामध्ये भक्ती, ज्ञान, वैराग्य पुरेपूर सामावले आहे, ज्याने आपल्या सर्व कर्माचे फळ ईश्वराला अर्पण केले आहे, जो अखंड रामनामाचा जप करीत असतो, जो सर्वांविषयी मनात समान भाव धारण करतो, ज्याच्यात गर्वाचा लवलेशही नाही, जो सतत गुरूंच्या चरणांचे ध्यान करतो, असा भक्त हाच खरा आदर्श भक्त आहे. तो देवालाही नेहमीच आवडतो. अशा भक्ताला भवपाशही बांधू शकत नाही. त्यामुळे तो खरोखर मुक्त असतो. त्याला विष्णुपदाचीही प्राप्ती होते. असा भक्त अतिशय दुर्लभ आहे. कारण अशी भक्ती पंडित, वेदज्ञानी यांच्याही स्पर्शापलीकडची आहे. भक्तीचे सुख मनुष्य जीवन्मुक्त झाला तरी त्याच्यापासून दूर असते. ही भक्ती प्राप्त करून घेण्यासाठी मोठ्या साधनेची आवश्यकता असते. बहिणाबाईंच्या मते, भक्ती ज्याच्याजवळ नसेल, तो जिवंत राहूनही उपयोग नाही. एवढेच नव्हे, तर अशा अभक्तांचे आयुष्यात तोंडही पाहू नये.

आदर्श भक्ताला हरिभक्तीचे इतके वेड असते, की तो भक्तीशिवाय तडफडत राहतो. ज्याप्रमाणे पतिव्रतेला पतीशिवाय तीळमात्रही करमत नाही, तद्वतच भक्ताची स्थिती होते. तृषाक्रांताला पाणी, चकोराला चंद्रामृत, चातकाला मेघ जसा प्रिय असतो, तशी भक्ताला भक्ती प्रिय असते.

जो खऱ्या अर्थाने भक्तिमय झाला आहे, त्याला कोणत्याही गोष्टींची उणीव भासत नाही व हे बहिणाबाई स्वतःच्या अनुभवावरून सांगतात.

'भक्तिभाव आम्ही बांधिलासे गाठी । तेणे आम्हा तुटी कासयाची ।।
गाऊ नाचू प्रेमे हरिनाम कीर्तनी । भावोनिया जनी जनार्दन ।।
खाऊ वाटू लुटू उदारासारिखे । सरे ऐसे देखे नाही नाही ।।
कोणाचिया घरा जावे घ्याया देया । स्वप्नी भोगावया दैन्य नाही ।।
बहेणि म्हणे भक्ता कासयाची चिंता । गाठीसी असता पांडुरंग ।।'
(अभंग क्र. ३४६, ओ. १ ते ५)

गुरुमंत्र, देव व औषध ही भावबळानेच फळाला येतात. पाषाणाची प्रतिमा ही भक्तिभावाने भजल्यास इच्छिलेले फळ देते. म्हणजेच आपण कशाला पूजतो यापेक्षा आपण कोणत्या आणि किती तीव्र भावाने पूजतो, याला महत्त्व आहे. ज्याचा भाव शुद्ध त्याला वैकुंठप्राप्ती होते. अनेक ऋषींची उदाहरणे देऊन बहिणाबाई पटवून देतात. वाल्मीकी ऋषी, कौशिक, सप्तर्षी, पुंडलीक, द्रौपदी, सुदामा या सर्वांना त्यांच्या शुद्धभावाचेच फळ मिळाले. अशा शुद्ध भावाच्या ठिकाणी अफाट सामर्थ्य असते, हे बहिणाबाई पटवून देतात. भावार्थाची खुंटी करावी आणि भावतंतूंनीच देवाला बांधून ठेवावे, असे केल्यास कोणतीही शक्ती देवाला आपल्यापासून सोडवू शकत नाही. देवालाही या भक्तीच्या बंधनातच राहण्यात समाधान वाटते.

यावरूनच भक्तिभावाचे सर्व प्रकार देव जाणत असतो, हे सिद्ध होते. भक्तांच्या प्रेमबंधनाचा तो भुकेलाच असतो. हा भक्तीचा भाव अतिशय महत्त्वाचा तरी आधी तो मनात उत्पन्न होणे हीच मोठी कठीण गोष्ट आहे. देवाबद्दल चित्तात असे निरतिशय प्रेम उत्पन्न झाले व ते अखंड टिकले, म्हणजे भक्तीची प्राप्ती झाल्याशिवाय राहत नाही.

आदर्श भक्ताच्या व्याख्येत एक महत्त्वाची गोष्ट बहिणाबाईंनी सांगितली आहे. ती म्हणजे अखंड रामनामाचा जप होय. याचे महत्त्व सांगताना त्या स्वानुभवाचा आधार देतात. 'संचिताच्या पुरात सापडून अविद्येच्या डोहात मी बुडत असताना मला नामरूपी साधन सापडले आणि काय आश्चर्य! भ्रमरूपी भवऱ्याच्या सापळ्यातून मी सहज बाहेर पडले. यामुळेच मला तुझ्या नामातील वर्म कळले. त्याचे सामर्थ्य लक्षात आले. त्यासोबतच अनेक व्यक्तींना आलेल्या रामनामाच्या अनुकूल अनुभवांचे ज्ञान झाल्यावर माझा त्यावर पक्का विश्वास बसला. जसे अजामीळ व गणिका. तुला प्राप्त करून घेण्याची गुरुकिल्लीच मला सापडली.' (अभंग क्र. ४९९) अशाप्रकारे आपला स्वानुभव वर्णन करून बहिणाबाई नाममहिमा गाताना दिसतात. 'परमेश्वराचे नामस्मरण ही एवढी श्रेष्ठ गोष्ट आहे, की तिच्यापुढे मोक्षही कःपदार्थ होय. म्हणून परमेश्वराचे नाव श्रेष्ठ असते. नामस्मरण करणे सोपेही असते. योगमार्ग अवघड. पांडित्य परमेश्वरदर्शन घडवू शकत नाही. तीर्थयात्रा आणि कर्मकांड तर केवळ साधनरूपच. तेव्हा नामस्मरण हा एकच मार्ग उरतो आणि हाच श्रेष्ठ मार्ग होय. प्रपंचात राहूनही नामस्मरण करता

येते आणि परमेश्वरप्राप्ती होऊ शकते. म्हणून नामालाच येथे महत्त्व प्राप्त होते.'[४३]

साधकांना नाममहात्म्याविषयी मार्गदर्शन करताना त्यांनी कोणते नाम जपावे, याचाही उल्लेख बहिणाबाई करतात.

'श्रीबीज संयुक्त पांडुरंग-मंत्र । जपता पवित्र महापापी ।।
नाही या संदेह पहा वेदशास्त्र । गुह्य हे सर्वत्र सांगितले ।।'
(अभंग क्र. ५६३, ओ. १, २)

श्रीचे बीज ज्याच्यात आहे, असा पांडुरंग मंत्र जपल्याने कोणालाही देव सन्मुख होईल आणि त्याच्या अंतरीचे दुःख निवारण करील. हे नाम जपल्याने भवयातनांतून सुटका होईल आणि जीवाचे बंधनही तुटेल.

वेदोपनिषदांमध्ये 'नाममहात्म्य' सांगितले आहे. त्यात नाम व रूप यांचे अभिन्नत्व वर्णन केले आहे. नाम व रूप ही जुळ्या भावंडांसारखी आहे. नामापेक्षा रूप वेगळे आहे, असे मानणाऱ्याला यातील गुह्य समजलेच नाही, असे म्हणावे लागेल. यामागचा तत्त्वविचार हा की नाम ज्याचे घेतले जाते तो आणि जो नाम घेतो तो, म्हणजे नाम व नामी या दोघांत संपूर्ण ऐक्य म्हणजे अभिन्नत्व असते. जेथे नाम तेथे नामी हजरच असतो. त्यामुळे नामजपाने साक्षात्कारही होऊ शकतो.

खऱ्या भक्तांनाही या नामाचेच वेड लागलेले असते. आधी साधन असलेले हे नामजप त्यांचे साध्य बनून जाते. त्याच्याशिवाय भक्ताला चैन पडत नाही. वांझेला जशी पुत्राची आसक्ती तशी भक्ताला नामसुखाची आवड असते. यावरूनच भक्ताला असलेले नामजपाचे महत्त्व लक्षात येईल.

एकूणच नाममहात्म्यपर अभंगांमध्ये भक्ताची विविध रूपे पहावयास मिळतात. तसेच मुमुक्षू व्यक्तींना मार्गदर्शन करणाऱ्या अनेक गोष्टी या अभंगांतून वर्णन झालेल्या आढळतात. त्यामुळे भक्तिपर अभंगांची थोरवी निश्चितच वाढली आहे.

## देवाशी भांडणपर अभंग :

भक्तिसाधन हे सर्वात श्रेष्ठ व सुलभ साधन असले, तरी या भक्तांची परीक्षा पाहिल्याशिवाय देव त्यांना आपलेसे करून घेत नाही. संत

तुकारामांनी म्हटलेच आहे, ‘भक्ती ते सुळावरील पोळी ।’ मग बहिणाबाई या अनुभवापासून वंचित कशा राहणार? आपली साधना परिपूर्ण झाली, तरी देव कृपा करीत नाही, असे पाहताच, त्या चिडून जातात. शेवटी देवाशी भांडण करतात.

ज्यांचा पारमार्थिक अधिकार मोठा असतो, अशाच लोकांमध्ये देवाप्रती एक हक्काची भावना निर्माण झालेली असते. हीच भावना त्यांना देवाशी भांडण करण्याची हिंमत देते. बहिणाबाईंना आपल्या साधनेवर विश्वास होता. त्यांनी देवाची फार दिवस वाट पाहिली. देव कृपा करील, या प्रतीक्षेत त्यांचा जीव कासावीस होत राहिला. पुढे त्या देवातले दोष दाखवून म्हणतात, ‘तुम्ही-आम्ही एकाच निराकाराच्या गावी म्हणजे ब्रम्हरूपी सुखाने नांदत होतो; पण तेथे तुम्हाला करमेना, म्हणून स्वतःच्याच हौसेसाठी तुम्ही हा संसार मांडला. जगद्रूपी हा खेळ खेळताना तुम्ही मात्र मुक्तच राहिलात आणि आम्हाला तुमचे भक्त म्हणून बद्ध करून ठेवले. आमच्यावरच हा अन्याय का?’ (अभंग क्र. ५०१)

‘देवा, मी तुझ्याजवळ तुझे काहीच मागत नाही. माझीच ठेव जी तुझ्याकडे आहे, ती परत मागता मागता माझा तेरावा जन्म संपत आला. आता एक क्षणभरही धीर धरवत नाही. माझेच असून मला देत नाहीस, याचे दुःख आहे. तुझ्या पायाशी आता मी जीव देईन नाहीतर तुझा सर्व कारभारच बंद पाडीन. मग सगळा अनर्थ होईल. हे मागणे तू ज्ञानोबांना बावीस जन्म मागायला लावलेस, चांगदेवाला चौदाशे वर्ष जणू बंदीतच घातलेस.’ (अभंग क्र. ५१०) ‘एवढा अंत पाहूनही तू कोणाला स्वतःच्या हाताने मोक्ष प्रदान केला आहेस का? आमची तुझ्याजवळ असलेली ही ठेव तू कोणाच्यातरी माध्यमाने देत असतो. जसे ज्ञानदेवाला निवृत्तीच्या हाताने दिली. श्रीरामांना वसिष्ठांच्या हातून, चांगदेवांना मुक्ताबाईच्या हातून, अनेकांना नारदाच्या हातून, तुकोबांना बाबाजीच्या हातून दिलीस. तसे तुकोबांच्या हातून माझे ठेवणे मला दे.’ (अभंग क्र. ५२४)

एवढे बोलूनही पांडुरंग एका शब्दानेही त्यांना उत्तर देत नाही, हे पाहून बहिणाबाई पुन्हा म्हणतात, ‘आता मी जास्त वाट पाहणार नाही. चल चारचौघांपुढे खटला मांडून न्याय मागू. चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणेच याचा निवाडा करतील. (अभंग क्र. ५२२) श्रुतिशास्त्राने उदार म्हणून ज्याचे फार वर्णन केले, तोच का तू विटेवर उभा आहेस? तुझा

बाह्यवर्ण काळा दिसतोच आहे; पण अंतरंगानेही तू काळाच आहेस. मी तुला चांगलेच ओळखले तू कृपणाहून कृपण आहेस. तुझ्यासारखा लुच्चा देव खरोखरी तूच. गोऱ्या कुंभाराचे तू हात तोडलेस. चोखामेळ्याला सुळावर देऊ पाहिलेस. हरिश्चंद्र-तारामतीच्या संसाराची माती केली. गोपीचंदाचा गाव ओस पाडलास. एकनिष्ठ भक्त जो बळी, त्याला पाताळात गाडलेस. एवढेच बरे केलेस, की तू माझे अजून असले काही वाटोळे केले नाहीस.' (अभंग क्र. ६७९, ६८०)

'तुला दयाघना का म्हणतात, हेच कळत नाही. तू तर अगदीच कोरडा पाषाण आहेस. मोठ्या घराला पोकळ वासा असावा, तशी तुझी करणी आहे. तू एवढा लक्ष्मीपती तर तुझी थोरली मेहुणी दरिद्री का? शंख तुझा मेहुणा, पण तो अक्षयी कोरडा का? ज्याला दुसऱ्याची करुणा येते, त्यालाच आम्ही उदार म्हणतो.' (अभंग क्र. ६९२)

'तुला पतितपावन कोणी नाव दिले? आम्हा पतितांमुळेच 'पावन' या संज्ञेला पात्र होता आले. हे मुशाफिरा, तू येथे आलास. तुला कोणी थारा दिला? आम्हीच ना?' असे म्हणून बहिणाबाई शेवटी त्याच्यापुढे हात टेकतात व निर्वाणीचे शब्द म्हणतात, 'तू बऱ्याबोलाने मला दर्शन दे. माझे ठेवणे परत दे. आता अंत पाहू नकोस. तुला एवढी कसली भीती वाटते आहे? मला तुझे काहीही नको.' (अभंग क्र. ७०४)

'सुखे घाली तू वैजयंती । मज खंती नसे त्याची ।।
माणिक मोती घाली गळा । तुळसीमाळा पुरे आम्हा ।।
केशरकस्तुरीचा तुला टिळा आम्हा भाळा साममुद्रा ।।
थोर आयुधे तुझे हाती । आम्हा हाती टाळदिंडी ।।'
(अभंग क्र. ७०४, ओ. १ ते ४)

'शिरापुरी तू खा लाडू । भेटी गोडू आम्हासी ।।
नलगे काही तुमचे आन । भेटीवीण विठो एका ।।
पुरवा भेटीची गा आस । दुजे तुम्हास न मागे काही ।।
बहिणी म्हणे लवलाहे । भेटी द्या हे दासीसी ।।'
(अभंग क्र. ७०५, ओ. १ ते ४)

असे सांगूनही पांडुरंगाला दया येत नाही. तो मुकाच्या मुकाच राहतो. म्हणून रागावून बहिणाबाई म्हणतात, 'गोपगोपींसगे खेळून फार दमलास, म्हणून का तू भेट देत नाहीस. की तुला भक्त फार झाले, म्हणून

कंटाळलास? किंवा कृपाळूपणाची ख्याती आता मिळवलीच आहे, म्हणून बेपर्वा झालास का? तुझ्या दर्शनाने मला समाधान मिळेल, हेही तुला पाहावत नाही का?' (अभंग क्र. ७०६)

शेवटी बहिणाबाई म्हणतात, 'त्या पुंड्याच्या मदतीला कसा धावून आलास? आधीतर असंख्य भक्तांचा उद्धार केलास. मग माझ्याच वेळेस तुझ्या सहस्र डोळ्यांनी दिसेनासे झाले आहे का?' (अभंग क्र. ७०७)

अशातऱ्हेने देवाला नाना शब्दतीरांनी टोचून काढल्यावर रागाचा भर ओसरल्यावर बहिणाबाईंना आपण देवाशी फारच भांडलो, हे लक्षात येते. आपल्या अशा स्थितीवर दया येऊन त्या करुणपणे देवाला विनवितात,

'मूर्खपणे तुम्हा छळियेले भारी । तरी तू श्रीहरि माय माझी ।।
लेकुरे बोलिले काय त्याचा खेद । जननी आल्हाद मानी त्याचा ।।
अपराधाची क्षमा मागता मातेसी । प्रेमपान्हा तिजसी काय नुपजे ।।
बहिणी म्हणे ऐसी गोठी नायकीली । विठाई माउली तैसी मज तू ।।'
(अभंग क्र. ७०४, ओ. १ ते ४)

आपल्या कटू शब्दांबद्दल देवाला माफी मागून आपले अपराध पोटात घेण्याविषयी त्या विठ्ठलाला विनवितात.

हे सर्व अभंग पाहिले असता बहिणाबाईंच्या भक्तिमार्गातील चढउतारांचा प्रवास आपल्याला पाहावयास मिळतो. आर्त भक्ती व करुणरस यांनी परिपूर्ण असलेले हे अभंग देव व भक्त यांच्यातील प्रेमाच्या छटा व्यक्त करतात. भक्ताला देवाबद्दल वाटणारी ओढ, दर्शनाची आस, त्यासाठी होणारी मनाची तगमग, भेटीसाठी आतुर मन, निराश झाल्यावर येणारे वैफल्य, त्यापोटी निर्माण झालेला देवाबद्दलचा राग, उपहास, निंदा, कटुता, देवाचे वर्म काढून भांडण्याची वृत्ती आणि सरतेशेवटी या सर्वांवर मात करणारे भक्ताचे भगवंतावरील अनन्यसाधारण प्रेम, त्या प्रेमाने भगवंताशी जोडलेले लेकराचे नाते. या सर्वच भावना वाचकांच्या मनाला वेड लावणाऱ्या आहेत. देवाशी भांडणपर अभंग वाचताना वाचक त्यात हरवून जातो. बहिणाबाईंच्या मनातली हुरहूर, तगमग, निंदा, प्रेम, माया या सगळ्याच भावनांशी समरस होऊन जातो. विठ्ठलाला खळा, पाषाणहृदया असे संबोधले, तरी त्यांच्या भांडणातूनही त्यांच्या मनातले विठ्ठलप्रेम लपत नाही. इतर अभंगांप्रमाणे एका श्रेष्ठ मनस्विनीचे चित्रण या अभंगांतूनही वाचकांसमोर स्पष्ट होते.

# ८. बहिणाबाईंच्या आध्यात्मिक व तत्त्वज्ञानपर अभंगांतून आढळणारी वैशिष्ट्ये :

बहिणाबाईंच्या तत्त्वज्ञानपर अभंगांत विविध विषयांवर भाष्य केलेले दिसते. सर्वसामान्य घरात जन्मलेल्या, सर्वसामान्य वातावरणात वाढलेल्या बहिणाबाईंनी असे विविध विषयांचे ज्ञान कोठून प्राप्त केले, हा एक प्रश्नच आहे. ज्ञान मिळवण्याची आवड, कुतूहल, जिज्ञासा, चातुर्य, संवेदनशीलता अशा अनेक गुणांमुळे त्यांना सृष्टीतील ज्ञानकण वेचून आपले अनुभवविश्व संपन्न करता आले.

बहिणाबाईंचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना समाधिवस्थेत जाण्यासाठी विशेष प्रयास करावे लागत नसत. भक्ती त्यांच्या इतकी अंतर्यामी मुरली होती, की मनाला आज्ञा केल्यावर त्या समाधिस्थितीत जात. म्हणूनच सर्वांत असूनही त्या अलिप्त होत्या. एकप्रकारच्या अतींद्रिय अनुभवाचे सुख त्या घेत असत. प्रपंचात राहूनच त्यांचे हे कार्य चालत असल्यामुळे त्यांच्या सर्वच उपदेशांत कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग यांचा योग्य मेळ घातला आहे.

'इतर संतांप्रमाणेच बहिणाबाईंनी प्रवृत्ती-निवृत्तीची योग्य सांगड घालून सामान्यांना आदर्शभक्ती शिकवली. त्यांना वर्णकर्मानुसार समाजरचना पसंत होती. म्हणूनच त्यांनी आपल्या भक्तांना 'स्वधर्मपालन हे परमश्रेष्ठ' याचा सतत उपदेश केला. आध्यात्मिक साधना व सामाजिक शूचिता यांवर भर दिला. त्यांनी सतत योगसाधनांचाही पुरस्कार केला.'[४४]

संत बहिणाबाई अध्यात्मसागरात न्हाऊन निघालेल्या होत्या; पण इतरांना या अध्यात्माचे ज्ञान देताना त्यांनी आपल्या आध्यात्मिक अधिकाराचे दडपण येऊ दिले नाही. त्यांच्या क्लिष्ट तत्त्वज्ञानाने सामान्य साधक गुदमरून जात नाही. क्लिष्ट तत्त्वज्ञानही त्या साधकाला सोपे करून सांगतात. त्यासाठी 'पंचतत्त्वाचा पाळणा', 'देवाशी भांडण' अशी उदाहरणे देता येतील. या रूपकांतून कितीतरी गहन तत्त्वज्ञान, साधकांच्या, वाचकांच्या सहज पचनी पडते.

बहिणाबाईंच्या तत्त्वज्ञानपर व आध्यात्मिक काव्यातून वाचकांना अध्यात्माची जाण येतेच, त्याचबरोबर कविमनाची गूढरम्यताही जाणवते. काव्यासाठी काव्य या दृष्टीने संतांनी कधीच आपल्या वाणीचा

उपयोग केला नाही; पण पूर्वसुकृत म्हणा, गुरुकृपा, संवेदनशीलता, साधेपणा अशा कोणत्याही कारणाने म्हणा सर्व संतकवींचे शब्द काव्य होऊन जातात. त्याला बहिणाबाईही अपवाद नाहीत. त्यांच्या काव्यात आत्मानुभवाची मधुरता, साधेसोपे शब्द, नेहमीच्या वापरातील दृष्टांत यांमुळे सर्वसामान्य वाचकांच्या मनात तत्त्वज्ञानासारखे गंभीर विषय खोलवर प्रभाव करून जातो.

स्त्रीवादी विचार, स्त्रीमुक्ती चळवळ या गोष्टी आत्ता आत्ता आपल्या कानांवर यायला लागल्या आहेत. ज्या संस्कृतीने स्वतःला पुरुषकेंद्रित आणि पुरुषसत्ताक म्हणूनच निर्माण केले आणि टिकविले, त्या संस्कृतीत स्त्रियांना शूद्रांचा दर्जा मिळणे, म्हणजे काही आश्चर्य वाटण्याजोगे नव्हते. ‘भारतीय परंपरेत स्त्रीशूद्र हा द्वंद्वसमास प्रसिद्धच आहे. दोघांनाही वेदांचा अध्ययनाचा अधिकार नाकारण्यात आलेला होता. त्यामुळे त्यांना स्वतंत्र असे धार्मिक जीवन जगता येत नव्हते आणि धर्म हा पूर्वी मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी असलेला घटक होता, हे एकदा ध्यानात घेतले की स्त्रीशूद्रांना आपण पशुतुल्य कसे केले, हेदेखील समजून यावे. पशू आणि मानव यांना एकमेकांपासून बाजूला करणारा घटक म्हणजे धर्म. वेद हे धर्माचे प्रमाण आणि स्त्रीशूद्रांना वेदांचा अधिकार नाही अशी ही परिस्थिती होती.’[४५] स्त्रीजन्म म्हणजे जणूकाही पाप आहे, अशाप्रकारे वेदांपासून स्त्रियांना दूर ठेवले गेले, याचे दुःख बहिणाबाईंना परोपरीने वाटते, म्हणून त्या देवालाही दोष देतात. जिला वेदांचा अधिकार नाही, अशी ही स्त्री असून धार्मिक बाबतीत ती लक्ष घालते म्हणून आणि ज्याला स्वतःला वेदांचा अधिकार नाही, अशा तुकारामासारख्या शूद्राला ती गुरू मानते म्हणून बहिणाबाईंच्या पतीने सुरुवातीला बहिणाबाईंचा अनन्वित छळ केला; पण बहिणाबाई डगमगल्या नाहीत. त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले. वारकरी संप्रदायाने स्त्रियांना प्रारंभापासूनच स्थान दिले होते. ‘हे स्थान केवळ वाती वळून श्रवणभक्ती करण्यापुरते मर्यादित नव्हते, हा मुद्दा अधिक महत्त्वाचा आहे. जनाबाई, मुक्ताबाई, सोयरा इ. अगदी वारकऱ्यांच्या आदिकालातील अभंगरचना करणाऱ्या स्त्रियांची नुसती नावे लक्षात घेतली तरी पुरेसे आहे. या स्त्रिया जेव्हा अभंगांतून आत्माविष्कार करीत होत्या, याचा हिशोब मांडायला बसले, म्हणजे मराठीत काव्यरचना करणाऱ्या या स्त्रियांबद्दलचा आदरभाव वाढेलच; परंतु ज्या परंपरेने त्यांना अभिव्यक्तीसाठी अवकाश देऊ केला त्या परंपरेच्या

थोरपणाचाही विचार करावा लागेल.'[४६] कदाचित यामुळेच वेदनिष्ठ असूनही बहिणाबाईंची पावले वारकरी संप्रदायाकडे वळली असावीत.

बहिणाबाईंची वेदनिष्ठा वादातीत आहे; म्हणूनच त्यांचे वेदवर्णनपर अभंग त्यांच्या तत्त्वज्ञानपर अभंगातील प्रमुख भाग मानावयास हवे. ज्ञानेश्वरांना वेद कृपण वाटले, तरी बहिणाबाईंना वेदप्रामाण्य बिनशर्त मान्य आहेत. म्हणूनच वेदनिष्ठा, वेदमहात्म्य, वेदोत्पत्ती, वेदांचा मथितार्थ, वेदान्तनिरूपण असे अनेक वेदसंबंधातील विषय त्यांनी हाताळले आहेत. माया, ब्रम्ह, अंबा यांचाही परस्पर संबंध स्पष्ट करून त्या मायेबद्दलची संदिग्धता नष्ट करतात. ईश्वर, जगत व जीव यांचा संबंध लावून मनुष्यजीवनाचे सार्थत्व पटवून देतात.

'आत्माकायाभांडण' यामध्ये त्या कायेपेक्षा आत्म्याचे श्रेष्ठत्व सर्वांना मान्य करायला लावतात. 'वज्रसूचिउपनिषदा'सारख्या ग्रंथावर भाष्य करून ब्राम्हणत्वावरील परखड विचार मांडतात. शेवटी भक्तिमार्गाचे श्रेष्ठत्व विशद करून सर्व गोष्टींसाठी सद्गुरूंना शरण जावयास सांगतात. एकूणच बहिणाबाईंचे हे आध्यात्म व तत्त्वज्ञान वर्णन करणारे अभंग सर्वसाधकांच्या जीवनाला मार्गदर्शन करून भवचक्रातून सोडविणारे सांगाती आहेत.

❖ ❖ ❖

# संदर्भ


१. देशमुख, उषा माधव, 'अंकुरला गाभा विराटाचा', मराठी साहित्याचे आदिबंध, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मयगृह प्रा.लि., मुंबई, १९८२, पृ. २२७.
२. हर्डीकर, कल्याणी, 'पूर्वपीठिका : संतसाहित्य', स्त्रीसाहित्याचा मागोवा, खंड १, संपा. डॉ. मंदा खांडगे आणि इतर, प्रथमावृत्ती, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २००२, पृ. १०, ११.
३. घळसासी, विवेक, 'प्रवचन', संतज्योती बहिणाबाई, सोमलवार शिक्षण संस्था, नागपूर, दि. २९-३-२००५.
४. शेणोलीकर, ह.श्री., प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, तृतीय खंड, १६५० ते १८४०, सहावी आवृत्ती, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९८७, पृ. १६०.
५. जोशी, चंद्रहास, स्त्रीसंतचरित्रमाला, बहिणाबाई, प्रथमावृत्ती, गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. ३.
६. Sashital, Meera S., 'Bahinabai : More than a poetess', Samachar, 2004, 3 Oct. 2005, <http://www.samachar.com/features/10033/literature.html>
७. आजगावकर, ज.र., 'बहिणाबाई', प्राचीन मराठी संतकवी, खंड २, प्रथमावृत्ती, कोंकण मराठी डायलेक्ट्स रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई, १९७७, पृ. १९४.
८. कोतापल्ले, नागनाथ, भोसले, द.ता. (संपा.), 'तृषा लागलीया जीवनातें ओढी ।', अपार्थिवाचे गाणे (ज्ञानेश्वरांचे निवडक शंभर अभंग), द्वितीयावृत्ती, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. ८३.
९. आजगावकर, ज.र., 'बहिणाबाई', प्राचीन मराठी संतकवी, खंड २, उनि. , पृ. १९६.
१०. तत्रैव., पृ. २००.
११. सैंदाणे, आसाराम, 'बहिणाबाईंची ईश्वरभक्ती', संतांच्या बोधकथा, प्रथमावृत्ती, महाजन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००५, पृ. ५३.
१२. दाण्डेकर, गो.नी., 'पावन तो देश', श्री सन्त तुकाराम, द्वितीयावृत्ती, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८०, पृ. ३.

१३. Sashital, Meera S., 'Bahinabai : More than a poetess', Samachar, 2004, 3 Oct. 2005, <http://www.samachar.com/features/10033/literature.html>
१४. पोहोरेकर, भीमराव, 'संत बहिणाबाईंची जीवनगाथा', दै. पवना समाचार, भा.वि. कांबळे (संपा.), पिंपरी, पुणे, संत बहिणाबाई विशेषांक, वर्ष २५, अंक ८०, दि. ८-११-१९९८, पृ. ५.
१५. वाबगावकर, म.शं., 'वारकरी संप्रदाय : एक अभ्यास', संशोधन व आस्वादन, प्रथमावृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९७७, पृ. ४०.
१६. मोरे, सदानंद, 'बहिणा म्हणे तुक्या केवळ पांडुरंग', दै. पवना समाचार, संत बहिणाबाई विशेषांक, वर्ष २५, अंक ८०, उनि., पृ. १६.
१७. अहिरराव, प्र.रा., 'बहिणाबाईंची पावनभूमी', दै. पवना समाचार, संत बहिणाबाई विशेषांक, वर्ष २५, अंक ८०, उनि., पृ. ११.
१८. तत्रैव, पृ. १२.
१९. तत्रैव.
२०. चतुरकर, शंकर, 'साधन-विचार', मराठी संतांचा आध्यात्मिक विचार, प्रथमावृत्ती, पुं.कि. चतुरकर, दर्यापूर, १९७९, पृ. २६१.
२१. तत्रैव, पृ. २६३.
२२. जोशी, महादेवशास्त्री (संपा.), 'केशवचैतन्य', भारतीय संस्कृतिकोश, खंड दुसरा, प्रथमावृत्ती, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९६४, पृ. ५३१.
२३. जोशी, महादेवशास्त्री (संपा.), 'बाबाजीचैतन्य', भारतीय संस्कृतिकोश, खंड सहावा, प्रथमावृत्ती, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९७०, पृ. १२३.
२४. मोकाशी, पं.रा., 'वारकरी संप्रदाय', महाराष्ट्रातील पाच संप्रदाय, द्वितीयावृत्ती, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७५, पृ. १०९.
२५. नसिराबादकर, ल.रा., 'तुका झालासे कळस', प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, सहावी सुधारित आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७, पृ. १३३.
२६. सानप, किशोर, तायडे, मनोज (संपा.), 'तुकारामाची भूमिका : धर्मसुधारक की समाजसुधारक?', तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९५, पृ. १, ३९.
२७. मोरे, सदानंद, 'बहिणा म्हणे तुक्या केवळ पांडुरंग', दै. पवना समाचार, संत बहिणाबाई विशेषांक, वर्ष २५, अंक ८०, उनि., पृ. १५.

२८. आजगावकर, ज.र., 'बहिणाबाई', प्राचीन मराठी संतकवी, खंड २, उनि., पृ. १९१.
२९. मोरे, सदानंद, 'बहिणा म्हणे तुक्या केवळ पांडुरंग', दै. पवना समाचार, संत बहिणाबाई विशेषांक, वर्ष २५, अंक ८०, उनि., पृ. १६.
३०. देशपांडे, अ.ना., 'तुकारामांची प्रभावळ', प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पाचवा, प्रथमावृत्ती, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९८२, पृ. २१२.
३१. दाण्डेकर, गो.नी., 'धन्य ती समाधी', श्री सन्त एकनाथ, द्वितीयावृत्ती, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८०, पृ. ३.
३२. जावडेकर, शालिनी, 'प्रस्तावना', संत बहेणाबाईंचा गाथा, संपा. सौ. शालिनी अनंत जावडेकर, द्वितीयावृत्ती, वै.प्रा.शं.वा. दांडेकर धार्मिक व सांस्कृतिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे, १९८९, पृ. ९०.
३३. जोशी, ना.ग., 'स्फुट रचनाप्रकार', मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, भाग १, संपा. स.गं मालशे, प्रथमावृत्ती, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८२, पृ. ४०२.
३४. ढेरे, रा.चिं., 'बहिणाबाईंचे वज्रसूचिवरील भाष्य', दै. पवना समाचार, संपा. भा.वि. कांबळे, पिंपरी, पुणे, संत बहिणाबाई विशेषांक, वर्ष २५, अंक ८०, दि. ८–११–१९९८, पृ. ६.
३५. जोशी, गजानन नारायण, 'मराठी संतांची प्रभावळ', महाराष्ट्र संत (भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास, खंड सातवा) प्रथमावृत्ती, शुभदा–सारस्वत प्रकाशन, पुणे, वर्ष अनुपलब्ध, पृ. ३८५.
36. Mc Gee, Mary, 'Bhakti Poets : Poem Bahinabai', Women In World History, 2002, Centre For History and Media, George Mason University, (Source - Mc Gee, Mary 'The Ordinary Life Of An Exceptional Women', in 'Vaishnavi Women And Worship Of Krishna', Edited By Steven J. Rosen, Delhi : Motilal Banarasidas, 1996) 23 Oct. 2005, <//http://chnm.edu/wwh/p/196/html>
३७. चित्रे, दिलीप पुरुषोत्तम, 'वारकरी वाङ्मयाविरुद्धचा सांस्कृतिक कट', पुन्हा तुकाराम, प्रथमावृत्ती, एस.के. बेलवलकर पब्लिशिंग कंपनी, पुणे, १९९०, पृ. ३८२.
३८. जावडेकर, शालिनी, 'प्रस्तावना', संत बहेणाबाईंचा गाथा, संपा. सौ. शालिनी अनंत जावडेकर, द्वितीयावृत्ती, वै.प्रा.शं.वा. दांडेकर धार्मिक व सांस्कृतिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे, १९८९, पृ. ८५.

३९. जोशी, गजानन नारायण, 'मराठी संतांची प्रभावळ', महाराष्ट्र संत, भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास, खंड सातवा, प्रथमावृत्ती, शुभदा—सारस्वत प्रकाशन, पुणे, वर्ष अनुपलब्ध, पृ. ३८६.

४०. आजगावकर, ज.र., महाराष्ट्र संतकवयित्री, प्रथमावृत्ती, मुंबई, १९३९, पृ. १५९.

४१. भडभडे, सुमन 'परमभक्त संत बहिणाबाई', दै. पवना समाचार, संत बहिणाबाई विशेषांक, उनि., पृ. १३.

४२. जोशी, गजानन नारायण 'मराठी संतांची प्रभावळ', महाराष्ट्र संत (भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास, खंड सातवा), उनि., पृ. ३८६.

१०. जावडेकर, शालिनी, 'प्रस्तावना', संत बहेणाबाईंचा गाथा, उनि., पृ. १२५.

४३. कोतापल्ले, नागनाथ, भोसले, द.ता. (संपा.) , 'नाम आठवितां रूपीं प्रकट पैं झाला।', अपार्थिवाचे गाणे (ज्ञानेश्वरांचे निवडक शंभर अभंग), द्वितीयावृत्ती, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. ७४.

४४. भडभडे, सुमन, 'परमभक्त संत बहिणाबाई', दै. पवना समाचार, संत बहिणाबाई विशेषांक, वर्ष २५, अंक ८०, उनि., पृ. १३.

४५. मोरे, सदानंद, 'बहिणा म्हणे तुक्या केवळ पांडुरंग', दै. पवना समाचार, संत बहिणाबाई विशेषांक, उनि., पृ. १५.

४६. तत्रैव.

❖ ❖ ❖



View publication stats